



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, शनिवार ५ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०





# जिवंत राहिलो तर मोर्चात जाईन

## डीजे समर्थक पंतप्रधान मोदी, योगींनाही विरोध करतील- विद्यानंद बापट

**पुणे/प्रतिनिधी :** गणेशोत्सवात लाउडस्पीकर, ढोल-ताशांना विरोध करणा-या विद्यानंद बापट यांचे नाव आता राज्यभरात चर्चेत आहे. आधी पुणे महानगरपालिकेतील जनसभेतून त्यांची झालेली हकालपट्टी आणि त्यानंतर ३ सप्टेंबरला त्यांना झालेल्या मारहाणीमुळे मुख्यमंत्र्यांपासून सर्वच यंत्रणांना त्यांची दखल घ्यावी लागली. तत्पूर्वी विद्यानंद बापट हे त्यांच्या भाषिक आणि वैचारिक ज्ञानामुळे चर्चेत आले. सोशल मीडियावर त्यांचे अनेक मीम्स तयार होत असून त्याला लोकांकडून पसंती मिळत आहे. तसेच माध्यमांशी बोलताना तर्कावर आधारीत विचार मांडल्यामुळे त्यांच्या बोलण्याचे कौतुक होत आहे. आज त्यांनी पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेतही असेच महत्त्वाचे मुद्दे मांडले.

विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला झाल्याची घटना घडल्यानंतर आता बापट यांच्या समर्थनार्थ आणि डीजेमुक्तसाठी रविवारी पुणे महापालिकेवर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात सहभागी होण्याच्यासंदर्भात बोलताना विद्यानंद बापट म्हणाले, जर मी जिवंत असेन आणि मोर्चात जाण्यायोग्य परिस्थितीत असेन तर मी मोर्चात सहभागी होणार आहे. मला भिती वाटत नाही. पण डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचं काय झालं, ते मार्निंग वॉकला निघाले होते. त्यामुळे केव्हा काय होईल हे मी सांगू शकत नाही.



**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दिला दाखला-** विद्यानंद बापट यांना गणेश मंडळांनी विरोध केला असला तरी अनेकजण त्यांच्या बाजूने उभे राहत आहेत. याबद्दल त्यांना पत्रकार परिषदेत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, मला माझे महत्त्व वाढवायचे नाही. माझे मुद्दे जर पुढे रेटले जात असेल तर चालेल. पण माझे व्यक्ती माहात्म्य मला वाढवायचे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही संविधान सभेच्या भाषणातही हा मुद्दा मांडला होता. व्यक्ती माहात्म्य वाढवणे हे घातक असू शकते, असे ते म्हणाले होते. मला स्वतःचे महत्त्व वाढवून घ्यायचे नाही.

**पंतप्रधान मोदी आणि योगी आदित्यनाथांनाही विरोध होईल-** गणेश मंडळे आणि डिजे समर्थकांकडून बापट यांचा विरोध होत आहे. याबद्दल बोलताना ते म्हणाले की, पंतप्रधान मोदी आणि योगी आदित्यनाथ जरी माझ्यासारखे बोलले तरी त्यांनाही विरोध केला जाईल. काही लोकांना वाट्टेल ते करून फक्त धुडगूस घालायचा आहे. त्यांना सण-उत्सव याच्याशी काही घेणे देणे नाही. जे धार्मिक उत्सव प्रेमी आहेत, त्यांना हा धुडगूस आवडत नाही. खासदार मेधा कुलकर्णी यांनीही लाउडस्पीकरला विरोध केलेला आहे.

**भावना काय शरीराचा अवयव आहे का?** विद्यानंद बापट यांच्या विधानांमुळे आमच्या भावना दुखावल्या जात आहेत, असा आरोप काहींनी केला आहे. यावर बापट म्हणाले की, भावना म्हणजे छाती, पोट, डोके नाही, जे दुखायला लागेल. हा हास्यास्पद कांगावा आहे. भावना ही काही दुखायची गोष्ट नाही. तर्काचे उत्तर देता येत नसल्यामुळे हा फक्त कांगावा आहे.

# सोमवारी कंत्राटदारांचा राज्यभर एल्गार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये कामे करणा-या कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसह निविदा प्रक्रियेतील कथित हस्तक्षेप, छोट्या कामांच्या निविदा बंद करून मोठ्या रकमेच्या निविदा काढण्याची पद्धत आणि जीएसटीच्या आर्थिक भाराविरोधात राज्यातील कंत्राटदार संघटना आक्रमक झाल्या आहेत. या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना महाराष्ट्र आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटना यांच्या वतीने सोमवारी, ७ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये दुपारी ११ वाजता निषेध आंदोलन करण्यात येणार आहे. शासकीय विकासकामे पूर्ण केल्यानंतरही विविध विभागांकडून कंत्राटदारांची देयके मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असल्याचा दावा संघटनांनी केला आहे. या प्रलंबित देयकांमुळे कंत्राटदारांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असून, बँक कर्जावरील व्याज, कामगारांचे वेतन, बांधकाम साहित्याची देणी आणि अन्य खर्च भागविणे कठीण होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.



**निविदा प्रक्रियेवरही आक्षेप-** छोट्या-छोट्या कामांसाठी स्वतंत्र निविदा काढण्याऐवजी अनेक कामे एकत्र करून मोठ्या रकमेच्या निविदा काढल्या जात असल्याचा आरोप कंत्राटदार संघटनांनी केला आहे. त्यामुळे लहान कंत्राटदार, सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि मजूर संस्थांना शासकीय कामांच्या संधींपासून वंचित राहावे लागत असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. राज्यातील कंत्राटदारांच्या व्यवसायावरच यामुळे परिणाम होत असल्याचा दावा संघटनांनी केला आहे.

**राजकीय हस्तक्षेप टाळावा-** कामाच्या निविदा आणि ई-निविदा प्रक्रियेत विविध स्तरांवरून राजकीय हस्तक्षेप होत असल्याचा आरोपही संघटनांनी केला आहे. कामावरील प्रशासकीय प्रक्रियेमुळे कंत्राटदारांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलनाच्या आवाहनात नमूद करण्यात आले आहे.

**जीएसटीचा भार शासनाने घ्यावा-** शासनाकडून कंत्राटदारांच्या बिलांमध्ये जीएसटी देण्यास विलंब होत असतानाही कंत्राटदारांना वेळेत जीएसटी भरण्याची जबाबदारी पार पाडावी ➪(पान २ वर)

# सरकारी शाळांत बाहेरच्या व्यक्तींना आता 'नो एन्ट्री'

## सर्वोच्च न्यायालयाने जनहित याचिका फेटाळली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राजस्थान, उत्तर प्रदेशातील सरकारी शाळांमध्ये पत्रकार, युट्यूबर, समाजमाध्यमांशी संबंधित व्यक्ती तसेच नागरी समाज संघटनांच्या प्रवेशावर घालण्यात आलेल्या निर्बंधांविरोधातील जनहित याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे संबंधित राज्यांनी जारी केलेले आदेश सध्या कायम राहणार आहेत. १ सप्टेंबरच्या आदेशात न्यायालयाने, भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ अंतर्गत दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर सुनावणी घेण्यास आम्ही इच्छुक नाही, असे नमूद केले. राजस्थानमध्ये शाळा दुरुस्त करा मोहिमेअंतर्गत सरकारी शाळेची पाहणी करणा-या कार्यकर्त्यांवर अलीकडेच हल्ला झाला होता. या पार्श्वभूमीवर न्यायालयाचा हा निर्णय महत्त्वाचा आहे.



राजस्थानच्या माध्यमिक शिक्षण संचालकांच्या १६ ऑगस्टच्या परिपत्रकानुसार, सरकारी शाळेत प्रवेश करण्यासाठी बाहेरील व्यक्तींना मुख्याध्यापकांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले होते. तसेच छायाचित्रण, चित्रीकरण, मुलाखत, ध्वनिमुद्रण आणि थेट प्रक्षेपणासाठीही पूर्वलिखित परवानगी आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. याला या याचिकेत आव्हान देण्यात आले होते. याचिकेत अयोध्येच्या जिल्हा मूलभूत शिक्षण अधिका-यांनी १९ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या आदेशालाही आव्हान देण्यात आले होते.

**विधि विद्यार्थ्यांवर कारवाईचा बीसीआयला अधिकार नाही-** विधि विद्यार्थ्यांच्या वर्तनाचे नियमन वा त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा अधिकार बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय) व राज्य बार कौन्सिलला नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी दिला. विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा अधिकार संबंधित शिक्षणसंस्थेलाच असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. हैदराबादच्या नालसार विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी सरन्यायाधीशांच्या प्रस्तावित दीक्षांत समारंभातील सहभागाला आक्षेप घेतला होता. त्यावर बीसीआयने नालसारच्या विद्यार्थ्यांची वकील म्हणून नोंदणी तूर्तास थांबवण्याचे निर्देश दिले होते.

# पंतप्रधानांनी मेलोनी यांना दिल्या शुभेच्छा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांना सर्वात जास्त काळ सलग पंतप्रधान राहिल्याबद्दल शुभेच्छा दिल्या.मोदींनी सोशल मीडिया पोस्टमध्ये मेलोनी यांना आपली मैत्रीण संबोधत म्हटले की, ही उपलब्धी इटलीच्या लोकांचा त्यांच्या नेतृत्वावरील विश्वास आणि निष्ठा दर्शवते. पंतप्रधानांनी सांगितले की, मेलोनी यांची मैत्री भारत-इटली विशेष धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यातही महत्त्वाची ठरली आहे. त्यांनी दोन्ही देशांतील लोकांच्या समृद्ध भविष्यासाठी पुढेही एकत्र काम करण्याची आशा व्यक्त केली.मोदींनी मेलोनी यांना येणा-या वर्षांमध्ये यशासाठीही शुभेच्छा दिल्या.



**मेलोनी यांच्या सत्तेत सलग १४१३ दिवस पूर्ण-** मेलोनी यांच्या सरकारने शुक्रवारी सलग १,४१३ दिवस सत्तेत राहून नवा विक्रम केला. १९४६ मध्ये इटली प्रजासत्ताक बनल्यापासून, ➪(पान २ वर)

# नेपाळच्या महाप्रलयात 370 किमी दूर वाहून थेट बिहारच्या मुजफ्फरपूरमध्ये पोहोचली महिला!

**पाटणा/मुजफ्फरपूर/वृत्तसंस्था :** नेपाळमध्ये आलेल्या भीषण नैसर्गिक आपत्तीनंतर आणि महापुरामुळे संपूर्ण देशात विध्वंस झाला आहे. यादरम्यान, नेपाळमधून एक अत्यंत चक्रावून टाकणारी घटना समोर आली आहे. नेपाळच्या पुराच्या पाण्यात वाहून तब्बल ३७० किलोमीटर दूर असलेल्या बिहारच्या मुजफ्फरपूरमध्ये एक नेपाळी महिला अत्यंत भयभीत आणि संशयास्पद स्थितीत आढळली आहे. स्थानिकांनी तिला सुरक्षितपणे पोलिसांच्या स्वाधीन केले असले, तरी या महिलेचा प्रवास आणि तिचे येणे पोलिसांसाठी डोकेदुखी ठरले आहे.बिहारमधील मुजफ्फरपूरच्या मिठनपुरा पोलीस ठाणे परिसरात एका अज्ञात नेपाळी महिलेवर



स्थानिकांची नजर पडली. ही महिला प्रचंड घाबरलेली आणि सैरभैर झालेली दिसत होती. जेव्हा स्थानिकांनी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती केवळ नेपाळी भाषेतच बोलू लागली. स्थानिक लोकांना तिची भाषा अजिबात समजली नाही, ज्यामुळे ➪(पान २ वर)

# 114 वर्षांची अखंड अन्नदान सेवा ठप्प!

## *पुराच्या तडाख्यात ऐतिहासिक निर्मोही आखाड्याची इमारत खचली; संत-महंतांची सुरक्षा धोक्यात*

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** तीर्थक्षेत्रातील रामघाट परिसरात वसलेल्या ऐतिहासिक निर्मोही आखाड्यावर यंदाच्या महापुराने मोठे संकट ओढवले आहे. नदीचे पाणी ओसरल्यानंतर आता आखाड्याच्या अस्तित्वाचा आणि संतांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न समोर आला आहे. नदीच्या पाण्याच्या जोरदार प्रवाहामुळे झालेल्या जमिनीच्या धूपेमुळे प्रसादालय इमारतीच्या भिंतींना जागोजागी मोठे तडे गेले असून इमारत खचण्याची भीती निर्माण झाली आहे. गेल्या चार वर्षांपासून प्रशासनाकडे नदीकाठची धूप रोखण्यासाठी उपाययोजना ➪(पान २ वर)



# काही भोंगे दररोज त्रास देतात, मग गणेशोत्सवातच डीजेवर बंदी का?-आ.श्वेता महाले

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्याचे विद्यानंद बापट यांच्या डीजेमुक्त चळवळीची राज्यभर चर्चा सुरू असतानाच, बुलढाण्यात भाजप आमदार श्वेता महाले यांच्या एका वक्तव्याने आता नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बुलढाण्यात झालेल्या जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत डीजे आणि ध्वनीप्रदूषणाचा मुद्दा उपस्थित झाला. यावेळी श्वेता महाले यांनी डीजे बंदीच्या भूमिकेवर थेट सवाल उपस्थित केला. 'काही भोंगे दररोज त्रास देतात, मग गणेशोत्सवातच डीजेवर बंदी का?', असा सवाल महाले यांनी केला.

लग्नसमारंभ, वैयक्तिक कार्यक्रम आणि राजकीय कार्यक्रमांमध्येही डीजेचा वापर होतो. मग केवळ गणेशोत्सवाच्या काळातच डीजेवर निर्बंध घालण्याची चर्चा का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. डीजेचा त्रास होत असेल तर सरसकट बंदी घाला; केवळ गणेशोत्सवासाठीच नियम का? अशी रोखठोक भूमिका महाले यांनी मांडली.



एकीकडे विद्यानंद बापट यांच्या डीजेमुक्त चळवळीची राज्यभर चर्चा सुरू असताना, दुसरीकडे भोंग्यांचा संदर्भ देत डीजे बंदीवर सवाल करणा-या श्वेता महाले यांच्या वक्तव्याने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण येण्याची शक्यता आहे. आता त्यांच्या या वक्तव्यावर कोणत्या प्रतिक्रिया उमटतात आणि प्रशासन डीजे तसेच ध्वनीप्रदूषणाच्या नियमांबाबत काय भूमिका घेतं, याकडे लक्ष लागलं आहे.



**नागपुरात डीजे बंदीवरुन भाजप नेतेच आमनेसामने**

पुण्यात गणेशोत्सवाच्या काळात डिजे बंद करण्याची मागणी जोर धरू लागलीय. डिजेवर बंदी घालण्यावरून पुण्यात वाद सुरू असतानाच तिकडे राज्याची उपराजधानी नागपूरमध्ये डीजेवर बंदी घालण्यात आलीय. १ नोव्हेंबरपर्यंत ही बंदी लागू करण्यात आलीय. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर शहरात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांनी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. नियमांचं उल्लंघन करणा-यांवर कारवाई होणार असल्याचं पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील यांनी म्हटलंय.दरम्यान नागपुरातील डीजेबंदीवरून भाजप नेतेच आमनेसामने आलेय.. डीजेच्या दणदणाटाला एकीकडे भाजपचे माजी आमदार संदीप जोशी यांनी विरोध केला. तर दुसरीकडे त्यांच्याच पक्षाचे आमदार प्रवीण दटके आणि शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी यांनी वेगळी भूमिका घेतलीय. हिंदू सणांच्या काळातच ही बंदी का लावण्यात आली असा सवाल दोघांनीही उपस्थित केलाय.एकीकडे संदीप जोशी यांनी अगोदरच डीजे मुक्तीकरता जन आंदोलन उभारण्याचा सांगत आवाज उठवला. पोलीस आयुक्तांना फक्त दोन महिन्यांपुरती ही बंदी लागू केलीय. ही बंदी कायमची लागू करावी अशी मागणी करत संदीप जोशी यांनी पोलीस आयुक्तांनी भेट घेतली.. तर दुसरीकडे हिंदू सणाच्या वेळीच हे निर्बंध का? असा सवाल मध्यनागपूरचे भाजप आमदार प्रविण दटके यांनी उपस्थित केलाय..

# देशातील पहिल्या 'ईओएस-05' रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण

**श्रीहरीकोटा/वृत्तसंस्था :** देश झोपेत असताना भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने इतिहास रचला. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राच्या दुस-या प्रक्षेपण पॅडवरून जीएसएलव्ही-एफ १७




राकेटच्या मदतीने पृथ्वी निरीक्षण उपग्रह-०५ (ईओएस-०५) चे यशस्वी प्रक्षेपण केले. पृथ्वी निरीक्षण उपग्रह ईओएस-०५ ला जीएसएलव्ही-एफ १७ या प्रक्षेपण वाहनाने उप-भूस्थिर संक्रमण कक्ष(सब-जीटीओ) मध्ये अचूकपणे स्थापित केले. हे प्रक्षेपण ४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी २ वाजून ५५ मिनिटाला झाले. ईओएस-०५ हा पृथ्वीपासून सुमारे ३६००० किलोमीटर उंचीवरून फोटो काढणारा उपग्रह आहे. हा भारताचा पहिलाच असा कॅमेरा-उपग्रह आहे जो एवढ्या उंचीवरून फोटो काढेल. हा कॅमेरा एवढ्या उंचीवर असल्याने तो पृथ्वीच्या वेगानेच फिरतो. यामुळे भारतावर २४ तास सतत लक्ष ठेवणार. जीएसएलव्ही-एफ १७ या प्रक्षेपण वाहण्यात पाठवण्यात आलेला सर्वाधिक वजनाचा उपग्रह आहे. त्याचे वजन २३६७ किलो आहे.

**शेतीचे निरीक्षण करणार-** ईओएस-०५ हा कॅमेरा शेतीच निरीक्षण, चक्रीवादळ, पूर, ढगफुटी, सीमेवरील हालचाल अशा देशाच्या सुरक्षिततेसाठी महत्वाच्या माहितीचे लाईव्ह फोटो पाठवणार. आतापर्यंत आपले उपग्रह कमी उंचीवरून फोटो काढायचे. म्हणजे ६०० किमी अंतरावरून फोटो काढायचे. त्यामुळे २४ तासातून एकदाच आपल्याला फोटो मिळत होते. मात्र आता हा कॅमेरा ३६००० किमी वरून आपल्याला भारतावर २४/७ करडी नजर ठेवणार आहे. हे उपग्रह ९ वर्ष काम करणार. या उपग्रहाला 'आय इन स्काय' असे एका वरिष्ठ शास्त्रज्ञाने वर्णन केले आहे.

**भारताचा पहिला समर्पित इमेजिंग उपग्रह : डॉ. व्ही. नारायणन** ➪(पान २ वर)

# देशातील बँक कर्मचारी हे लोकसेवक नाहीत

**नागपूर/प्रतिनिधी :** भारतीय स्टेट बँकेचा कर्मचारी हा भारतीय दंड संहिता (आयपीसी) मधील कलम २१नुसार 'लोकसेवक' ठरत नसल्याने त्याच्यावर झालेल्या कथित हल्ल्याप्रकरणी कलम ३५३ अंतर्गत गुन्हा दाखल करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला. न्या. मेहरोझ पठाण यांनी अकोला येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाचा आदेश रद्द करताना हे निरीक्षण नोंदवले.



अकोला जिल्ह्यातील बार्शी टाकळी येथील प्रतिमा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मधुकर पवार यांनी या प्रकरणात फौजदारी पुनर्विचार अर्ज दाखल केला होता. अतिरिक्त सत्र न्यायालय, अकोला यांनी १ नोव्हेंबर २०२५ रोजी पवार यांचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळून त्यांच्याविरुद्ध आयपीसी कलम ३५३ अंतर्गत आरोप निश्चित केला होता. या आदेशाला पवार यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. त्यांचे म्हणणे होते की, या प्रकरणातील तक्रारदार हा भारतीय स्टेट बँकेचा कर्मचारी असून तो आयपीसी कलम २१नुसार लोकसेवक ठरत नाही. त्यामुळे कलम ३५३चा गुन्हाच लागू होत नसल्याचा युक्तिवाद करण्यात आला. पवार यांच्या वतीने दिल्ली उच्च न्यायालयाच्या रघुनाथ राय कुमार तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या एन. वाघुल प्रकरणातील ➪(पान २ वर)



# एमपीएससीच्या कारभाराविरोधात विद्यार्थी उतरले रस्त्यावर

## जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराविरोधात आज शुक्रवार ४ सप्टेंबर रोजी विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. पंचवटी चौकातून विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. शहीद भगतसिंग यांची छायाचित्रे हातात घेऊन विद्यार्थ्यांनी एमपीएससीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. 'महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुर्दाबाद', 'नहीं चलेगी, नहीं चलेगी, तानाशाही नहीं चलेगी' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.राज्य सरकारच्या विरोधातही विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा दिला.

पेपर फुटीची सखोल चौकशी करा आणि दोषींवर कठोर कारवाई करा, एमपीएससीच्या अध्यक्षांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढला. जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहचल्यानंतर त्याच ठिकाणी विद्यार्थ्यांनी ठिय्या मांडला. यावेळी विद्यार्थ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक, गट-ब या संवर्गासाठी घेतलेल्या परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे आरोप झाले होते. या प्रकरणी गुन्हे अन्वेषण शाखेने तपास करून त्या बाबतचा अहवाल 'एमपीएससी' ला सादर केला. त्यात पेपरफुटी झाल्याचे निष्कर्ष नोंदवण्यात आल्याने 'एमपीएससी'ने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला. या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले.आंदोलनामुळे शहरात पोलीसाचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला. एमपीएससीच्या पेपर फुटीप्रकरणी नैतिक जबाबदारी स्वीकारून अध्यक्षांनी राजीनामा द्यायला हवा, असे आंदोलकांचे म्हणणे आहे. लाखो विद्यार्थी एमपीएससीच्या परीक्षेची तयारी करतात. पेपरफुटीच्या प्रकरणामुळे या विद्यार्थ्यांचा विश्वासघात झाला आहे. एमपीएससीमार्फत अत्यंत पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेतल्या जातात, असा विश्वास विद्यार्थ्यांना होता, त्यालाच तडा गेला आहे. या प्रकरणात दोषींना कठोर शिक्षा व्हायला हवी अशी सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना अनेक तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागते. अशा प्रकारे परीक्षा घेते वेळी तांत्रिक बिघाड, पारदर्शकतेचा अभावा यामुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होते, असे मोर्चेकऱ्यांचे म्हणणे आहे. आमच्या मागण्यांचा शासनाने वेळीच विचार केला नाही, तर आंदोलन राज्यव्यापी आणि तीव्र करू, असा इशारा आंदोलक विद्यार्थ्यांनी दिला



मागणी करण्यात आली आहे.चुकीच्या परीक्षा पद्धतीमुळे ग्रामीण भागांतील तसेच आहे.स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे हजारो विद्यार्थी मोर्चात सहभागी झाले होते.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

- आरोपी व त्याच्या आईविरुद्ध गुन्हा
- तब्बल १०वर्षे शारीरिक शोषण केल्याचा आरोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन अवस्थेपासून एका तरुणीवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार परतवाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. पीडितेने लग्नासाठी तगादा लावल्यानंतर आरोपीने दुसऱ्या तरुणीशी विवाह ठरवून लग्नास नकार दिल्याचा आरोप आहे. या प्रकरणी २५ वर्षीय पीडितेच्या तक्रारीवरून पोलिसांनी मुख्य आरोपी युवकासह पीडितेशी शिवीगाळ करणाऱ्या त्याच्या आईविरुद्ध पॉक्सोसह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडिता आणि आरोपीची ओळख नोव्हेंबर २०१६ मध्ये इन्स्टाग्रामच्या माध्यमातून झाली होती. त्यानंतर डिसेंबर २०१६ मध्ये आरोपीने पीडितेला भेटण्यासाठी बोलावले. प्रेमसंबंध असल्याचे सांगत तसेच लग्नाचे आश्वासन देऊन त्याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यावेळी पीडितेचे वय अवघे १५ वर्षे असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानंतर आरोपीने लग्नाचे आश्वासन देत चिखलदरा तसेच विविध ठिकाणी पीडितेवर वारंवार अत्याचार केल्याचा आरोप आहे. हा प्रकार तब्बल मे २०२६ पर्यंत सुरू असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, १४ मे २०२६ रोजी आरोपीने पीडितेला कोणतीही माहिती न देता आपल्या समाजातील दुसऱ्या तरुणीशी विवाह ठरविल्याचे समोर आले. याबाबत पीडितेने आक्षेप घेत आरोपीशी चर्चा करून त्याला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी आरोपीच्या आईने पीडितेशी शिवीगाळ केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. लग्नाचे आमिष दाखवून अनेक वर्षे लैंगिक शोषण केल्याची तसेच नंतर लग्नास नकार दिल्याची तक्रार पीडितेने परतवाडा पोलिसांत दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी युवक आणि त्याच्या आईविरुद्ध पॉक्सो कायद्यासह अन्य संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास परतवाडा पोलीस करीत आहेत.

पान १ व १० वरून

## सोमवारी कंत्राटदारांचा राज्यभर

लागत असल्याचा मुद्दा संघटनांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे शासनाकडून बिलामध्ये जीएसटीची रक्कम मिळण्यापूर्वीच कंत्राटदारांना जीएसटी भरण्याची सक्ती होउ नये, अशी त्यांची मागणी आहे.

**काय आहेत मागण्या?-** प्रलंबित देयके तातडीने अदा करणे, निविदा प्रक्रियेत पारदर्शकता आणणे, छोट्या कंत्राटदारांना कामांची संधी उपलब्ध करून देणे, ई-निविदांमधील कथित हस्तक्षेप थांबविणे आणि जीएसटीसंदर्भातील अडचणी दूर करणे, या मागण्यांसाठी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये निवेदनही देण्यात येणार आहे. राज्यभरातील कंत्राटदार, अभियंते आणि संबंधित संस्था या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे कंत्राटदार महासंघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.शासन या आंदोलनाची दखल घेणार का, याकडे आता लक्ष लागले आहे.

## पंतप्रधानांनी मेलोनी यांना दिल्या

हे कोणत्याही एका मंत्रिमंडळाचा सर्वात लांब सलग कार्यकाळ आहे.मेलोनी यांनी माजी पंतप्रधान सिल्व्हियो बर्लुस्कोनी यांच्या दुस-या सरकारचा विक्रम मोडला आहे. बर्लुस्कोनी यांचे दुसरे मंत्रिमंडळ २००१ ते २००५ पर्यंत १,४१२ दिवस सत्तेत होते.मेलोनी २२ ऑक्टोबर २०२२ रोजी इटलीच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या होत्या. त्या उजव्या विचारसरणीच्या 'ब्रदर्स ऑफ इटली' पक्षाच्या प्रमुख देखील आहेत.

**इटलीमध्ये सरकारे सरासरी १३ महिनेच टिकतात-** इटलीमध्ये गेल्या अनेक दशकांपासून सरकारे वारंवार बदलण्याचा आणि राजकीय अस्थिरतेचा इतिहास राहिला आहे. ८० वर्षांपूर्वी प्रजासत्ताक बनल्यापासून देशात ६८ सरकारे स्थापन झाली आहेत.या सरकारांचा सरासरी कार्यकाळ सुमारे १३ महिने राहिला आहे. अशा परिस्थितीत, मेलोनींच्या तीन उजव्या विचारसरणीच्या आणि पुराणमतवादी पक्षांच्या युती सरकारचे सुमारे ४ वर्षे टिकणे ही एक मोठी उपलब्धी मानली जात आहे.

**मेलोनींचा पक्ष जल्लोष साजरा करेल-** मेलोनींनी त्यांच्या सरकारच्या दीर्घ कार्यकाळाला मोठे यश म्हणून सादर केले आहे. त्यांचा पक्ष शुक्रवारी संध्याकाळी दक्षिणेकडील बारी शहरात रॅली काढणार आहे. मेलोनीही या रॅलीत भाषण देतील.मात्र, समीक्षकांचे म्हणणे आहे की मेलोनी सरकारने दीर्घकाळ सत्तेत राहणे हीच आपली उपलब्धी मानली आहे.

**मोदींनी मेलोनींना 'मेलोडी' टॉफी दिली होती-** मे २०२६ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी इटलीच्या दौ-यावर गेले होते. यावेळी त्यांनी इटलीच्या पंतप्रधान जार्जिया मेलोनी यांना मेलोडी टॉफीचे पाकीट भेट दिले होते. मेलानीने नंतर याचा व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आणि मोदींना भेटवस्तूसाठी धन्यवाद दिले होते. मोदी आणि मेलानीच्या एकत्र फोटोनंतर सोशल मीडियावर #Melodi खूप लोकप्रिय झाले होते.

## नेपाळच्या महाप्रलयात 370 किमी

परिसरात विविध चर्चांना उधाण आले. अंदाजा लावला जात आहे की, नेपाळमधील भीषण महाप्रलयादरम्यान ही महिला पुराच्या प्रवाहामध्ये पाण्याच्या वेगाने येथे वाहून आली असावी किंवा या आपत्तीत ती आपल्या कुटुंबीयांपासून दुरावली गेली असावी.

**पोलिसांसमोर मोठे आव्हान-** सध्या पोलिसांनी त्या महिलेला सुरक्षितपणे पोलीस ठाण्यात आश्रय दिला आहे. मात्र, ती फक्त नेपाळी भाषा बोलत असल्यामुळे ती कोण आहे आणि मुजफ्फरपूरपर्यंत कशी पोहोचली, हे शोधण्यात पोलिसांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या प्रकरणाबाबत बोलताना उपविभागीय दंडाधिकारी पूर्व, आनंद उत्सव यांनी सांगितले की, मुजफ्फरपूरमध्ये एक परदेशी महिला सापडली असून तिला सुरक्षित ठेवण्यात आले आहे. ही महिला येथे कशी पोहोचली आणि यामागचे नेमके कारण काय, याचा शोध घेतला जात आहे. महिलेची भाषा समजून घेण्यासाठी आणि तिची पार्श्वभूमी तपासण्यासाठी पोलीस प्रयत्न करत आहेत, जेणेकरून या संपूर्ण रहस्यामागील सत्य समोर येउ शकेल.

## 114 वर्षांची अखंड अन्नदान

करण्याची मागणी संत करत होते. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अखेर पुराच्या तडाख्यात इमारतीचे अतोनात नुकसान झाले आहे.

**११४ वर्षांच्या मोफत अन्नसेवेला लागला तात्पुरता ब्रेक-** निर्मोही आखाड्याच्या प्रसादालयात गेल्या ११४ वर्षांपासून संत आणि भाविकांसाठी विनामूल्य भोजन व प्रसादाची सेवा अविरतपणे सुरू होती. मात्र महापुरामुळे या ऐतिहासिक परंपरेला तात्पुरता विराम द्यावा लागला आहे. या अन्नछत्रात दररोज सुमारे १,००० भाविक व संतांसाठी भोजनाची सोय केली जात होती. सेवा अखंड राहावी यासाठी ४ महिन्यांचे अन्नधान्य साठवून ठेवण्यात आले होते. आखाड्यात पाणी शिरल्यामुळे तब्बल ५० क्विंटल पीठ, १० क्विंटल तांदूळ आणि १०० लिटर तेल-तुपासह इतर सर्व किराणा माल पूर्णपणे भिजून सडला आहे. स्वयंपाकाची भांडी आणि इतर साहित्याचेही मोठे नुकसान झाले आहे.

गेल्या ११४ वर्षांत हजारो भुकेलेल्यांना अन्न देणा-या प्रसादालयातील संतांवर आणि सेवेक-यांवर आता स्वत? प्रशासनाकडून येणा-या जेवणाच्या पाकिटांवर दिवस काढण्याची वेळ आली आहे.

**इमारतीला तडे; दुस-या ठिकाणी रात्र काढतायत संत-** आखाड्याचे महंत मुन्ना शास्त्री यांनी सांगितले की, पुराचे पाणी संपूर्ण संकुलात शिरल्याने संतांचे अंथरुण-पांघरूण, गाद्या आणि कपडे वाहून गेले आहेत. पाणी ओसरल्यानंतर संत दिवसभर चिखल उपसणे आणि स्वच्छता करण्यात गुंतले असून, रात्र काढण्यासाठी त्यांना इतर ठिकाणी आसरा घ्यावा लागत आहे.

**प्रशासकीय दुर्लक्षावर संताप-** नदीकाठच्या जमिनीची धूप रोखण्यासाठी आणि सुरक्षा भिंतीसाठी गेल्या चार वर्षांपासून संबंधित विभागांना सातत्याने पत्रे दिली जात होती. नोव्हेंबर २०२५ मध्येही अधिका-यांना प्रत्यक्ष पत्र देउन संभाव्य धोक्याची जाणीव करून दिली होती. अधिका-यांनी घटनास्थळाची योग्य पाहणी न केल्यामुळे आज इमारतीची ही दुरवस्था झाली असून कधीही एखादा भाग कोसळण्याची भीती सतावत आहे.

**संकटातही ११४ वर्षांची 'अखंड रामनाम' साधना सुरूच!-** इमारत खचली, धान्य वाहून गेले आणि राहण्याची व्यवस्था कोलमडली तरीही निर्मोही आखाड्याची सर्वात मोठी आध्यात्मिक ओळख असलेला 'अखंड रामनाम' जप एका क्षणासाठीही थांबलेला नाही. गेल्या ११४ वर्षांपासून या आखाड्यात अविरतपणे सुरू असलेला रामनामाचा जप संत-महंतांनी या अत्यंत बिकट आणि विपरीत परिस्थितीतही चालू ठेवला आहे. एकीकडे ऐतिहासिक वास्तूचे संवर्धन करण्याचे आव्हान असताना, दुसरीकडे शतकोटी चालत आलेली धार्मिक परंपरा निष्ठेने जपण्याचा नवा आदर्श संतांनी घालून दिला आहे. स्थानिक प्रशासन आता या ऐतिहासिक आखाड्याच्या सुरक्षेसाठी तातडीने काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## देशातील पहिल्या 'ईओएस-05'

इस्रो प्रमुख डॉ. व्ही. नारायणन म्हणाले की, मला हे जाहीर करताना अत्यंत आनंद होत आहे की, जीएसएलव्ही-एफ१७ या प्रक्षेपकाने ईओएस-०५ या जिओ-इमेजिंग उपग्रहाला त्याच्या नियोजित आणि आवश्यक कक्षेत यशस्वीरीत्या व अचूकपणे स्थापित केले आहे. ईओएस-०५ हा कार्यान्वित झाल्यानंतर भूस्थिर कक्षेतून कार्य करणारा भारताचा पहिला समर्पित इमेजिंग उपग्रह ठरणार आहे. हे उपग्रह महत्वाचे स्ट्रॅटेजिक डाटा भारताला पुरवेल अशी अपेक्षा आहे.

**सर्वांत जड उपग्रह-** मिशन डायरेक्टर थामस कुरियन यांनी सांगितले की, जीएसएलव्ही-एफ १७ हे प्रक्षेपण वाहन ५१.७ मीटर उंच असून त्याचे लिफ्टऑफ वजन ४२०.५ टन आहे. त्यामुळे हे भारतातील कार्यरत असलेल्या सर्वात मोठ्या प्रक्षेपण वाहनांपैकी एक आहे. या ईओएस निअर रिअल-टाइम फोटो घेण्यास सक्षम आहे. जीएसएलव्हीद्वारे जीटीओ किंवा सब-जीटीओ कक्षेत प्रक्षेपित केलेला हा आतापर्यंतचा सर्वात जड उपग्रह आहे असेही त्यांनी नमूद केले.

**गुंतागुंतीचा उपग्रह : अहमद**

प्रकल्प संचालक इम्तियाज अहमद यांनी ईओएस-०५ चे वर्णन मल्टी-बँड कार्य करण्याची क्षमता असलेला एक अद्वितीय आणि वैशिष्ट्यपूर्ण उपग्रह असे केले आहे. त्याची रचना, यंत्रणा आणि कार्य क्षमता या दृष्टीने हा एक गुंतागुंतीचा उपग्रह आहे. प्रक्षेपणाची प्रक्रिया बुधवारी रात्री ११:३० वाजता सुरु झाली. २७ तासांची सुरळीत काउंटडाउन पूर्ण झाल्यानंतर सतीश धवन अंतराळ केंद्रावरील दुस-या प्रक्षेपण मंचावरून पहाटे २:५५ वाजता या राकेटने आपली झेप घेतली.

**पंतप्रधान मोदींकडून अभिनंदन-** पंतप्रधान नरेंद्र मोदींनी इस्रोचे अभिनंदन केले आहे. त्यांनी जीएसएलव्ही-एफ १७ आणि ईओएस-०५ ही मोहीम यशस्वी प्रक्षेपण झाली. ही कामगिरी देशासाठी अभिमान असल्याचे म्हटले आहे. भारताच्या अंतराळ क्षेत्रातील उत्कृष्टता, नवकल्पना आणि वाढत्या क्षमतांचे हे प्रतिबिंब असल्याचे मोदी यांनी नमूद केले. इस्रो आणि भारतीय खासगी उद्योजक क्षेत्रातील वाढती पार्टनरशिप हे नवीन बळ आणि व्यापकता मिळत असल्याने संपूर्ण अंतराळ परिसंस्थेमध्ये क्षमता वाढत आहे.

## देशातील बँक कर्मचारी

निकालांचा आधार घेण्यात आला. या निकालांमध्ये बँक कर्मचा-यांना आयपीसी कलम २१ च्या अर्थाने लोकसेवक मानता येणार नाही, अशी भूमिका मांडण्यात आली होती. दुसरीकडे, सरकारच्या वतीने एसबीआय कर्मचारी लोकसेवक असल्याचा दावा करण्यात आला. यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या सीबीआय, बँक सिक्युरिटीज अँड फ्राड सेल विरुद्ध रमेश गेल्ली या प्रकरणातील निर्णयाचा आधार घेण्यात आला.

**आवश्यक घटक सिद्ध नाही-** कलम ३५३ चा गुन्हा सिद्ध करण्यासाठी पीडित व्यक्ती लोकसेवक असणे, आरोपीने शारीरिक हल्ला किंवा जाणीवपूर्वक फौजदारी बळाचा वापर करणे आणि लोकसेवकाला त्याचे कर्तव्य बजावण्यापासून रोखण्याचा किंवा परावृत्त करण्याचा हेतू असणे आवश्यक आहे. या प्रकरणात तक्रारदारच आयपीसी कलम २१नुसार लोकसेवक ठरत नसल्याने कलम ३५३चा मूलभूत घटकच सिद्ध होत नाही असे न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने पुढे नमूद केले की, कलम ३५३ चा दखलपात्र गुन्हाच सिद्ध होत नसल्याने आयपीसी कलम ५०४ आणि ५०६ अंतर्गत आरोपही कायम ठेवता येणार नाहीत. हे गुन्हे अदखलपात्र असून त्यासाठी संबंधित दंडाधिका-याची परवानगी आवश्यक आहे. त्यामुळे न्यायालयाने पवार यांचा पुनर्विचार अर्ज मंजूर करून दोषमुक्तीचा अर्ज फेटाळणारा तसेच कलम ३५३ अंतर्गत आरोप निश्चित करणारा १ नोव्हेंबर २०२५चा आदेश रद्द केला.

## वडापावच्या वादातून सशस्त्र

धमक्या देत असल्याचेही तुषार यांना सांगण्यात आले. तुषार घरी पोहोचले असता, दुकानातील वादानंतर आरोपी आपल्या साथीदारांसह घरावर आल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले. घरातील सदस्यांना मारहाण करण्यात आली. दरवाजा बंद करून आत आश्रय घेतल्यानंतरही हल्लेखोरांनी दरवाजावर विटा फेकल्याचा तसेच चाकू व तलवारीने वार केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी तुषार दुपारे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## नागरिकांच्या समस्या

अपरिहार्य प्रशासकीय कारणांमुळे विभाग प्रमुख उपस्थित राहू शकत नसल्यास, त्यांच्या जागी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करून नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करावे. नागरिकांना विनाकारण ताटकळत राहावे लागू नये आणि कार्यालयीन कामकाज अधिक सुरळीत व परिणामकारक व्हावे, यासाठी या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहे.

## शर्वरी हत्याकांडातील आरोपीला

त्याच्या कुटुंबीयांनी त्याला घराबाहेर पडण्यास मज्जाव केला होता. यामुळे शर्वरीपर्यंत पोहोचण्याचे मार्ग बंद झाल्याने आनंद तिच्यावर पाळत ठेवण्याच्या प्रयत्नात होता, अशी माहिती तपासातून पुढे आली आहे.

घटनेच्या दिवशी आनंद बियाणी महाविद्यालयाच्या परिसरात पोहोचला. मात्र, तेथे शर्वरीची स्कूटी दिसून न आल्याने तो तिच्या घराच्या परिसरात गेला. तेथेही शर्वरी न दिसल्याने तो पुन्हा महाविद्यालयाच्या दिशेने परतला. शर्वरीच्या नेहमीच्या ये-जा करण्याच्या मार्गाची माहिती होती. काही वेळाने शर्वरी तेथून जात असताना आनंदने तिची दुचाकी अडवली. दोघांमध्ये संवाद बंद करण्याच्या कारणावरून वाद झाला. याचदरम्यान शर्वरीने तिच्या नव्या मित्राला फोन करून आनंदशी बोलण्यास सांगितले. फोनवर संभाषण सुरू असतानाच आनंदने संतापाच्या भरात चाकू काढून शर्वरीवर सपासप वार केले. गंभीर जखमी झालेल्या शर्वरीचा मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने घटनास्थळीच मृत्यू झाला.

हत्येनंतर पोलिसांच्या तांत्रिक तपासापासून बचाव करण्यासाठी आरोपीने स्वतःचा मोबाइल फोन घटनास्थळीच ठेवला आणि तेथून पसार झाला. त्यानंतर बडनेरा रेल्वे स्थानक गाठून हावडा जाणाऱ्या रेल्वेत बसून तो गोंदियाच्या दिशेने रवाना झाला. मोबाइल घटनास्थळीच असल्याने आरोपीचे लोकेशन शोधणे पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरले. मात्र, राजापेठ पोलिसांनी तातडीने तपासाची दिशा बदलत आरोपीचे आई-वडील, भाऊ तसेच जवळच्या मित्रांवर लक्ष केंद्रित केले. आरोपीला त्याच्या आईचा आणि जवळच्या मित्राचा मोबाइल क्रमांक तोंडपाठ असल्याचा पोलिसांना अंदाज होता. गोंदियाला पोहोचल्यानंतर आनंदने एका अनोळखी व्यक्तीकडून मोबाइल घेऊन आपल्या आईला फोन केला. या कॉलवर पोलिसांची नजर होती. संभाषणाच्या आधारे पोलिसांनी आरोपीला विश्वासात घेत गोंदिया जीआरपी ठाण्यात आत्मसमर्पण करण्यासाठी दबाव निर्माण केला. अखेर आनंदने गोंदिया जीआरपी ठाण्यात आत्मसमर्पण केले. त्यानंतर राजापेठ पोलिसांचे पथक तातडीने गोंदियाला रवाना झाले आणि आरोपीला ताब्यात घेऊन अमरावतीत आणले. शर्वरी हत्याकांडामुळे शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. जनआक्रोशाच्या पार्श्वभूमीवर आरोपीला शुक्रवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात न्यायालयात हजर करण्यात आले. हत्येत वापरलेला चाकू जप्त करणे, आरोपीने केलेल्या पलायनाचा तपशील जाणून घेणे, हत्येमागील नेमका उद्देश तसेच या प्रकरणातील इतर संभाव्य बाबींचा तपास करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयाकडे पोलीस कोठडीची मागणी केली.

पोलिसांची मागणी मान्य करत न्यायालयाने आरोपी आनंद भड याला ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. आता पोलीस कोठडीदरम्यान तपासातून आणखी कोणती माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## रस्ते, घरकुल, आरोग्य, पाणी

अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदवले, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. यात प्रामुख्याने रस्त्यांचा विकास होणे आवश्यक आहे. चांगल्या रस्त्यांमुळे जिल्ह्यात पायाभूत सुविधा निर्माण होण्यास मदत मिळणार आहे. जिल्ह्यातील काही मार्गाची दुरूस्ती करणे आवश्यक असल्याने या कामांना गती देण्यात यावी. रस्त्यांच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्याला प्राधान्य देण्यात यावे. त्यासोबतच शेतकऱ्यांसाठी पांदण रस्ते महत्वाचे आहेत. यासाठी पांदण रस्त्यांवर लक्ष केंद्रीत करण्यात यावे. यातील अपूर्ण कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचना खासदार वानखडे यांनी केल्या.

गरजूंना आर्थिक सहाय्याच्या योजना महत्वाच्या आहेत. प्रामुख्याने दिव्यांगांना देण्यात येणारी मदत थांबविण्यात येऊ नये. आवश्यकता भासल्यास तालुकास्तरावर शिबीरे घेऊन यूडीआयडी प्रमाणपत्र वाटप करण्यात यावे. यासाठी आवश्यक त्या सुविधा उभारण्यात याव्यात. ग्रामीण भागातील घरकुलांचा प्रश्न महत्वाचा आहे. घरकुल मंजूर झाल्यानंतर संबंधितास पाच ब्रास रेतीचे वाटप करण्यासाठी पास देण्यात यावा. तसेच जवळपास असलेल्या रेतीच्या उपलब्धतेबाबत माहिती देण्यात यावी. तसेच टप्पेनिहाय अनुदान उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणांनी प्रयत्न करावेत.

आरोग्य ही महत्वाची बाब असून यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. रूग्णवाहिकांना इंधनाचा नियमित पुरवठा होईल, याची दक्षता घेण्यात यावी. मेळघाटात आरोग्याचे प्रश्न असल्याने याठिकाणी रूग्णवाहिका उपलब्ध राहिल, याची दक्षता घेण्यात यावी. आरोग्यासोबतच पाणी पुरवठा महत्वाचे आहे. जलजीवन मिशनमधून पूर्ण करण्यात येणारी कामे तातडीने पूर्ण करावीत. गावात प्रत्यक्ष पाणी पुरवठा सुरू होईल, यासाठी कामे तातडीने पूर्ण करावीत. यामुळे साथीच्या आजारावर नियंत्रण मिळविणे शक्य होईल.

युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित करण्यात यावे. येत्या २९ सप्टेंबर रोजी तालुकास्तरावर रोजगार मेळावे आयोजित करण्यात येत आहे. यासाठी नियोजन करण्यात यावे. तसेच प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. त्यांना प्रशिक्षण आणि बँकांकडून कर्ज मंजूर होण्यासाठी प्रयत्न करावेत. हे उद्योग कायमस्वरूपी सुरू राहावेत, यासाठी प्रयत्न करावेत. कंत्राटी तत्वावर कार्यरत कामगारांना पूर्ण वेतन मिळावे, यासाठी कामगार विभागाने जागृती करावी. क्रिडा क्षेत्रात उत्कृष्ट खेळाडू घडावेत, यासाठी विद्यापीठाचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना खासदार वानखडे यांनी केल्या.

## मनपा उर्दू शाळेत

मनपा उर्दू शाळा क्रमांक - ९ मधील आहे. इयत्ता ९ वी मध्ये शिकणारे मो. इजाज, अब्दुल साद, अब्दुल शहीद, असलम कुरेशी आणि इतर विद्यार्थी मधल्या सुट्टीत मैदानात खेळत होते.

आरोप आहे की, याच वेळी शाळेत शिकवणारे कंत्राटी शिक्षक जीशान सर यांनी सर्व विद्यार्थ्यांना आवाज देऊन शाळेच्या आत बोलावले. विद्यार्थी आत आल्यानंतर शिक्षकाने त्यांना खडसावण्यास सुरुवात केली आणि हातात झाडाची वाळलेली फांदी घेऊन त्यांना बेदम मारहाण करण्यास सुरुवात केली.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या हात, पाय आणि कमरेवर लाकडी काठीने सतत वार करण्यात आले. धक्कादायक बाब म्हणजे मारहाण करताना लाकडी फांदी तुटून गेली, तरीही शिक्षकाने विद्यार्थ्यांना मारणे थांबवले नाही. या अमानुष मारहाणीमुळे विद्यार्थी किंचाळत, रडत होते.

या मारहाणीत मो.इजाज नावाच्या विद्यार्थ्याच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्याच्या हाताला फ्रॅक्चर झाले आहे.

**एमआयएम आक्रमक,खासदार-आमदारांकडे तक्रार-**

ही घटना समोर आल्यानंतर जखमी विद्यार्थ्यांना घेऊन एमआयएमचे पदाधिकारी गुरुवारी मनपाच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सुरू असलेल्या आढावा बैठकीत पोहोचले.

त्यांनी या बैठकीत उपस्थित असलेले खासदार डॉ. अनिल बोंडे आणि आमदार प्रवीण पोटे पाटील यांना संपूर्ण प्रकरणाची माहिती दिली. संबंधित शिक्षक आणि मुख्याध्यापकावर कठोर कारवाई करण्याची मागणी यावेळी करण्यात आली आहे. खासदार अनिल बोंडे आणि आमदार प्रवीण पोटे यांनी या प्रकरणाला गांभीर्याने घेतले आहे आणि कार्यवाहीचे आदेश दिले आहे. शिक्षणाधिकारींनीही प्रकरणानंतर शाळेला भेट देऊन तपास केला आहे.

## दर्यापूरातील निर्मल उज्ज्वल

ठेवीदारांनी बँकेच्या मुख्य गेटमध्येच ठाण मांडले. ज्येष्ठ नागरिक आणि ठेवीदार उपस्थित राहिले. परंतु बँक प्रशासनाकडून कोणतेही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

ठेवीदारांचे म्हणणे आहे की, 'गेल्या दोन महिन्यांपासून हीच परिस्थिती आहे. पैसे काढायला गेलो की 'आज नाही, उद्या या' असे सांगितले जाते. आम्ही आमची मेहनतीची कमाई या बँकेत ठेवली आणि आता गरजेच्या वेळी पैसे मिळत नाहीत.

याबाबत प्रशासनाकडे तक्रार करणार असल्याचे ठेवीदार राजाभाऊ राजगुरे यांनी सांगितले आहे. बँकेच्या या कारभारामुळे ठेवीदारांमध्ये प्रचंड असुरक्षितता निर्माण झाली आहे. शासन आणि सहकार विभागाने तातडीने हस्तक्षेप करून ठेवीदारांचे पैसे सुरक्षित करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

सध्या बँकेच्या दर्यापूर शाखेत पैसे नसल्यामुळे आमचा नाईलाज आहे. याबाबत आम्ही वरिष्ठाना सूचित केले आहे. मात्र वरिष्ठ पातळीवरून सांगण्यात आले आहे की सेंट्रल रजिस्टर यांच्याकडून आर्थिक निर्बंध घालण्यात आले असल्याने कारवाई पूर्ण होईपर्यंत पैसे देता येणार नाही.

**-सुबोध वानखडे -शाखा व्यवस्थापक, दर्यापूर**

मी या बँकेत ३ लाख रुपये एफ डी केली आहे. त्याची मुदत संपल्यामुळे मी पैसे काढण्यासाठी आलो मात्र मला पैसे नसल्यामुळे मिळणार नसल्याचे सांगितले. माझी आर्थिक स्थिती अडचणीत आली आहे. मी याबाबत पोलीस तक्रार तथा वरिष्ठ प्रशासनाकडे तक्रार देणार आहे.

**-राजाभाऊ राजगुरे, ठेवीदार**

## शिंदे सेनेची विदर्भस्तरीय

घडलेल्या भीषण अग्निकांडात ३ निष्पाप नवजात बालकांचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. या पार्श्वभूमीवर पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीने हा निर्णय घेतला आहे. या कार्यक्रमाला माजी केंद्रीय मंत्री आनंदराव अडसूळ, मंत्री संजय राठोड,आमदार बच्चू कडू, उपनेते धाने पाटील, माजी मंत्री जगदीश गुप्ता, प्रीती बंड,पराग पिंपळे, अभिनेत्री सई ताम्हणकर, नृत्यांगना ऐश्वर्या जाधव उपस्थित राहणार होते. परंतु डफरीन दुर्घटनेमुळे ही विदर्भस्तरीय दहीहंडी रद्द करण्यात आली.या उत्सवावर खर्च होणारी संपूर्ण रक्कम आता डफरीन अग्निकांडातील प्रभावित दुर्गा अंकुश शेंडे, राधिका आकाश हेडगे (देवगाव) व लक्ष्मी शेखर दहीकर (मुंगोदा), अर्पिता योगेश सावरकर (अचलपूर), अश्विनी सुरज धुर्वे (राजुरा बाजार) या कुटुंबियांना मदत म्हणून दिली जाणार आहे. पक्षाच्या या मानवतावादी निर्णयाची माहिती वरिष्ठ नेतृत्वाला देण्यात आली असून, पक्षाच्या नेतृत्वाने देखील या निर्णयाचे स्वागत आणि कौतुक केले असल्याचे संतोष बद्रे यांनी सांगितले.

## तिवस्यात विद्युत खांबावर

एखाद्या पाखराचा गवती खोका असल्याने आगीचा एकच भडका झाला आणि पाहता -पाहता अख्खा डिस्ट्रिब्युशन बॉक्स जळून खाक झाला.आगीचा भडका झाल्यानंतर इलेक्ट्रिक वायर चे आगीचे लोळ खाली असलेल्या ट्रान्सफॉर्मर व दुकानांवर पडत होते,ज्यामुळे दुकाने व ट्रान्सफॉर्मर जळण्याची भीती व्यक्त होत होती. खबरदारीच्या दृष्टीने वीज वितरण कंपनीचे कर्मचारी देखील घटनास्थळी उपस्थित झाले होते.तिवसा शहरात अनेक विद्युत खांबावर,ट्रान्सफॉर्मरमध्ये होत असलेल्या स्पॉर्किंग चा वीज वितरण विभागाने शोध घेऊन त्याची वेळेत दुरुस्ती करण्याची मागणी नागरिकांकडून होऊ लागली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# श्री शिवाजी विद्यालयासमोर ब्रेकरची मागणी रखडली

## शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांच्या फोनकडेही दुर्लक्ष केल्याचा आरोप



- छोट्या-मोठ्या दुर्घटनांत वाढ
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष
- मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहेत का?
- विद्यार्थ्यांचा संतप्त सवाल

■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील अत्यंत वर्दळीच्या मार्गावर असलेल्या श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयासमोर गतिरोधक (ब्रेकर) बसविण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. विद्यालयाच्या परिसरात विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असतानाही या ठिकाणी वाहनचालकांकडून वेगमर्यादेचे पालन होत नसल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. या गंभीर प्रश्नाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांकडून केला जात आहे.विद्यालयासमोरील रस्ता हा शहरातील प्रमुख वर्दळीचा मार्ग असल्याने सकाळी व दुपारच्या वेळेत विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असते. मात्र, या मार्गावरून दुचाकी तसेच इतर वाहने अनेकदा सुसाट वेगाने धावत असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.या ठिकाणी यापूर्वी छोट्या-मोठ्या दुर्घटना घडल्याचे सांगण्यात येत असून, भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी होत आहे. विद्यालयासमोर गतिरोधक उभारल्यास वाहनांचा वेग नियंत्रित होऊन विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यास मदत होऊ शकते.'विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न असताना प्रशासन नेमके कोणत्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहत आहे?' असा संतप्त सवाल विद्यार्थ्यांसह पालक व नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.विद्यालयासमोरील रस्त्यावर तातडीने गतिरोधक बसवावा, आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक नियंत्रणाचे फलक लावावेत तसेच वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित विभागाने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

मोठी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा, दुर्घटना होण्यापूर्वीच प्रतिबंधात्मक उपाय करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने ब्रेकर उभारावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**आमदारांच्या फोनकडेही दुर्लक्ष?**

या गंभीर समस्येबाबत शिक्षक आमदार किरणराव सरनाईक यांनीही संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत दूरध्वनीवरून संपर्क साधून लक्ष वेधले . मात्र, त्यानंतरही प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. रिसोडातील श्री शिवाजी विद्यालय व अन्य महत्त्वाच्या ठिकाणी ब्रेकर बसवण्यासंदर्भात रिसोड शहरातील पत्रकाराच्या एका शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांसोबत मागील वर्षी चर्चा केली होती त्यावेळेस संबंधित अधिकाऱ्याने लवकरात लवकर अत्यंत महत्वाच्या ठिकाणी ब्रेकर बसवण्यात येईल असे सांगितले होते. मात्र वर्ष लोटून सुद्धा ब्रेकरची मागणी रखडलेलीच आहे.

# रिसोड शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेस ७५ कोटीचा निधी मंजूर

## आ. भावना गवळी पाटील यांनी केला सातत्याने पाठपुरावा

■ प्रतिनिधी | रिसोड ■



वाशिम जिल्ह्याचे शिल्पकार माजी खासदार स्वर्गीय पुंडलिकराव गवळी यांनी रिसोड शहरा करता नळगंगा योजना मंजूर करून रिसोड शहराचा पाणी टंचाईचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढला होता. परंतु रिसोड शहराचा वाढता व्याप व वाढती लोकसंख्या लक्षात घेता आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी वाढीव पाणी पुरवठ्याची शहर वासीयांची असलेली अत्यंत महत्त्वाची गरज लक्षात घेता राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री व सध्याचे उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून शहराला वाढीव पाणीपुरवठा म्हणून ७५ कोटी रुपयाचा निधी मंजूर करून घेतला आहे.

रिसोड शहरासह तालुक्याचा प्रलंबित असलेला विकासाचा बॅकलॉग आमदार भावनाताई गवळी पाटील मोठ्या झपाट्याने पूर्ण करत आहेत. आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी रिसोड शहराचे सद्यस्थितीत व भविष्यात पाण्याची गरज लक्षात घेऊन हा विषय तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्याकडे सतत मांडला. त्यामुळे रिसोड शहराला वाढीव पाणीपुरवठा म्हणून ७५ कोटी रुपयेचा निधी देण्याकरता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे रिसोड शहराला आमदार भावनाताई गवळी पाटील यांच्या प्रयत्नाने भविष्यात पिण्याच्या पाण्याचा कायमस्वरूपी प्रश्न मिटणार आहे.

**वाढीव पाणी पुरवठा योजनाही लवकरच मंजूर होणार!**

वाशिम शहराकरिता वाढीव लोकसंख्येचा विचार करून वाढीव पाणीपुरवठा योजना चार वर्षांपूर्वीच प्रस्तावित करण्यात आली आहे. सदर योजनेकरिता ईसापूर धरणातून पाणी उपलब्ध करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. सदर प्रक्रिया पूर्ण होताच वाशिम येथील वाढीव पाणी पुरवठा योजनेला देखील मंजुरात मिळणार असल्याची माहिती आ.भावनाताई गवळी पाटील यांनी दिली आहे.

# दोन हजारांच्या लाचप्रकरणी हेडकॉन्स्टेबल फरार; खासगी इसम ताब्यात



■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

गुन्हाचे दोषारोपपत्र पाठविण्यासाठी झेरॉक्स काढण्याच्या कारणावरून दोन हजार रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून मंगरूळपीर पोलीस ठाण्यातील हेडकॉन्स्टेबल सुनील टाले याच्याविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी सापळा रचला. टाले यांच्या सांगण्यावरून खासगी इसम विजय चंदू चव्हाण याने दोन हजार रुपयांची लाच स्वीकारल्याचे सापळा कारवाईत निष्पन्न झाल्याची माहिती एसीबीने दिली.

दरम्यान, टाले यास ताब्यात घेण्यासाठी पथक गेले असता त्याने अटकेला मज्जाव करून चारचाकी वाहनातून भरधाव पलायन केल्याचा आरोप आहे. खासगी इसम विजय चव्हाण यास ताब्यात घेण्यात आले असून आरोपीविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमासह भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक सुलभा राऊत यांच्या नेतृत्वाखाली पोलीस हवालदार विनोद मार्कंडे, समाधान मोघाड व मो. मुंबशीर यांच्या पथकाने केली.कारवाईचे पर्यवेक्षण पोलीस उपअधीक्षक जगदीश परदेशी यांनी केले. पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सुनील किनगे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

# कंकरवाडी भागातही गोठ्याला आग

## रिसोड तालुक्यातील लागोपाठ दुसरी घटना

■ प्रतिनिधी | रिसोड ■



रिसोड तालुक्यातील कंकरवाडी भागात लागोपाठ दुसऱ्या दिवशीही गोठ्याला आग लागण्याच्या घटनेने एकच खळबळ उडालेली आहे. दिनांक २ सप्टेंबर रोजी रात्री आठ वाजता च्या दरम्यान चिंचाबंभर शिवारातील कंकरवाडी येथील रामेश्वर आश्रुजी जायभाये या शेतकऱ्याच्या गोठ्याला आग लागून पाच लाख रुपयांचे नुकसानीची घटना घडली असताना लगेच दुसऱ्या दिवशी ३ सप्टेंबर रोजी रात्री २ वाजता कंकरवाडी रिसोड मार्गावरील गोरखनाथ जवळ असलेल्या शेख मोईन शेख याकुब राहणार कंकरवाडी या शेतकऱ्याच्या गोठ्याला आग लागून दोन लाख रुपये नुकसान झाल्याची घटना उघडकीस आली आहे. यात मात्र काही नागरिकांच्या सतर्कतेने तीन जनावरांना वाचवण्यात यश आले आहे. आग लागल्याचे कारण अद्याप कळू शकले नसून तलाठी प्रयाग गरकळ यांनी सदर घटनेचा पंचनामा करून अहवाल शासन दरबारी पाठवलेला असून सदर शेतकऱ्याला आर्थिक मदत मिळावी अशी मागणी केली जात आहे. याबाबत माहिती अशी की शेख याकुब हे दैनंदिन प्रमाणे आपले काम आटोपून आपली जनावरे गोठ्यात बांधून ज्यामध्ये एक गाय आणि दोन गोऱ्हे त्यांना चारापाणी करत आपल्या घरी गेले रात्री दोन वाजता सदर गोठ्याला आग लागली ही बाब धार्मिक कार्यक्रम आटोपून आपल्या गावी कंकरवाडी ला परत जात असलेल्या कंकरवाडी येथील काही नागरिकांच्या निदर्शनात आली.त्यांनी लगेच गोठ्याकडे धाव घेत गाय व दोन्ही गोऱ्हांना सोडून टाकले. तत्पूर्वी मात्र सदर जनावरांना किरकोळ भाजले असल्याची माहिती समोर आली आहे. मात्र वेळीच तत्परता दाखवत सदर नागरिकांनी तिन्ही जनावरांचे प्राण वाचवले.मात्र या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे साधन नसल्याने आग वर नियंत्रण मिळवता आले नाही. बघता बघता गोठ्यातील शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले व यामध्ये दोन लाख रुपयाचे नुकसान झाले. यामध्ये २० कोंबड्या जळून मरण पावल्या असून स्प्रिंकलर, ड्रीप, पाईप, बैलगाडी खत बॅग आदी साहित्य जळून खाक झाल्याची माहिती मिळाली आहे.

# पाणी अडवा, पाणी जिरवा'ला गती द्या; बांधकामांपेक्षा जलसंधारणाला प्राधान्य द्या

■ प्रतिनिधी | वाशिम ■



आकांक्षित वाशीम जिल्ह्यात भविष्यातील कोरड्या दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी शासनाने ठोस नियोजन करून उपलब्ध निधीचा मोठा हिस्सा जलसंधारणाच्या कामांवर खर्च करावा, अशी मागणी जिल्ह्यातील सुभाष देवडे पाटील यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले.

वाशीम जिल्ह्यात पाऊस पडतो; मात्र मोठ्या प्रमाणात पाणी वाहून जाते. त्यामुळे उपलब्ध पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन करून ते अडविणे आणि जमिनीत जिरविणे गरजेचे आहे. जिल्ह्यातील पाझर तलाव, सिंचन तलाव, लघुधरणे व इतर जलसाठ्यांमधील गाळ उपसून त्यांची खोली व पाणी साठवण क्षमता वाढवावी. काही ठिकाणी तलावांच्या बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असून, नदीपात्रातील बंधाऱ्यांचीही दुरुस्ती करून त्यांची पाणी साठवण क्षमता वाढविण्याची मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

ज्या ठिकाणी नवीन पाझर तलावांची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी नव्याने पाझर तलाव निर्माण करण्यात यावेत. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' ही जुनी संकल्पना असली तरी आकांक्षित जिल्ह्याच्या निर्मितीनंतरही या योजनेची कामे अपेक्षित प्रमाणात झालेली नाहीत. त्यामुळे भविष्यातील पाणीटंचाई लक्षात घेऊन जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, सुमारे तीन वर्षांपूर्वी जिल्हा परिषद अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांच्या पुढाकारातून जिल्हा परिषद लघुसिंचन विभागामार्फत काही सिंचन तलावांचे साठवण तलावांमध्ये रूपांतर करण्याची कामे करण्यात आली होती. या कामांमुळे संबंधित ठिकाणी पाणी साठून राहिले आहे. अशा कामांची प्रत्यक्ष पाहणी करून त्यातून झालेला फायदा लक्षात घेऊन जिल्ह्यातील इतर जलसाठ्यांबरही अशाच प्रकारे कामे करण्यात यावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**एक वर्ष बांधकाम थांबवून जलसंधारणावर भर द्या**

इमारत बांधकामे, अंतर्गत सिमेंट रस्ते यांसारखी कामे काही काळासाठी थांबवून ग्रामीण भागातील पाणी साठवण व जलसंधारणाच्या कामांवर शासनाचा निधी खर्च करावा, अशी आग्रही मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. अवकाळी अथवा नियमित पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते गावागावांत अडवून जमिनीत जिरविल्यास भूजल पातळी वाढण्यास मदत होईल. परिणामी भविष्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटू शकतो.

आजपासूनच दीर्घकालीन नियोजन करून जलसंधारणाची कामे हाती घेतली नाहीत, तर भविष्यात वाशीम जिल्ह्यातील नागरिकांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे शासनाने या मागण्यांचा गांभीर्याने विचार करून तातडीने निधी उपलब्ध करून जलसाठे वाढविण्याची कामे सुरू करावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# 'शाश्वत शेती-सुदृढ पोषण'चा संदेश; पोषण सप्ताहानिमित्त शेतकरी प्रशिक्षण

■ प्रतिनिधी | वाशिम ■



पोषण सप्ताहाच्या निमित्ताने शेतकरी कुटुंबांमध्ये संतुलित आहार, पोषण सुरक्षा, पोषण परसबाग, शाश्वत शेती आणि हवामान-अनुकूल कृषी तंत्रज्ञानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम आणि कृषी विभाग, वाशिम (पोकरा प्रकल्प) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी आदर्श गाव बेंबळा. कारंजा येथे शाश्वत शेती व मानवी विकास या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ.आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

बदलते हवामान, नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण आणि पोषण सुरक्षेची गरज लक्षात घेता, शाश्वत कृषी प्रणाली ही केवळ उत्पादनवाढीसाठी नव्हे, तर शेतकरी कुटुंबांचे आरोग्य, पोषण, उत्पन्न आणि जीवनमान उंचावण्यासाठी महत्त्वाची आहे, असे यावेळी अधोरेखित करण्यात आले. उपलब्ध मृदा, जल आणि जैविक संसाधनांचा कार्यक्षम वापर, पीक विविधीकरण, कृषीपूरक व्यवसाय तसेच स्थानिक पातळीवर पोषक अन्नाची निर्मिती यावर विशेष भर देण्यात आला.

कृषी विज्ञान केंद्र, वाशिमच्या गृहविज्ञान विषय विशेषज्ञ शुभांगी वाटाणे यांनी पोषण सप्ताहाचे महत्त्व स्पष्ट करताना संतुलित आहार, पोषण-आधारित शेती प्रणाली आणि पोषण परसबागेची संकल्पना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

केवळ अन्नधान्याचे उत्पादन घेण्याऐवजी शेतकरी कुटुंबांनी स्वतःच्या शेतात किंवा परसबागेत कडधान्ये, तृणधान्ये, पालेभाज्या, फळभाज्या, कंदमुळे, फळपिके तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थांची उपलब्धता वाढविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.शरीराच्या वाढीसाठी व कार्यक्षमतेसाठी आवश्यक प्रथिने, ऊर्जा, जीवनसत्त्वे, खनिजे, लोह आणि कॅल्शियम यांचा योग्य पुरवठा होण्यासाठी आहारातील विविधता अत्यंत महत्त्वाची आहे.

कृषी अधिकारी अश्विनी जाधव यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची व शाश्वत शेतीसाठीच्या उपक्रमांची माहिती देताना मृदा आरोग्य व्यवस्थापन, जलसंधारण व पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक विविधीकरण, सेंद्रिय व जैविक निविष्ठांचा योग्य वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन आणि हवामान-अनुकूल कृषी तंत्रज्ञान यावर मार्गदर्शन केले.

# रवि भांदुर्गे यांच्या जिल्हाप्रमुख पदासाठी 'लहुशक्ती'चा पाठिंबा

■ प्रतिनिधी | वाशिम ■



शिवसेना जिल्हाप्रमुख पदासाठी माजी युवासेना जिल्हाप्रमुख रवि देवबाजी भांदुर्गे यांच्या नावाची चर्चा सुरू असतानाच त्यांच्या उमेदवारीला राष्ट्रीय लहुशक्ती संघटनेने जाहीर पाठिंबा दिला आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष रविकुमार कांबळे यांनी २८ ऑगस्ट रोजी भांदुर्गे यांना समर्थनपत्र दिले.

भांदुर्गे यांनी युवासेना जिल्हाप्रमुख म्हणून पक्षाशी एकनिष्ठ राहून तळागाळात संघटन वाढविण्यासाठी कार्य केले. विविध निवडणुकांमध्ये सक्रिय सहभाग घेत त्यांनी जनसंपर्क वाढविला असून, मातंग समाजासह सर्वसामान्यांच्या प्रश्नांवरही भूमिका घेतली आहे. कार्यकर्त्यांच्या अडचणींमध्ये साथ देणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख असल्याचे संघटनेने नमूद केले.

भांदुर्गे यांची जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती झाल्यास शिवसेना संघटनेला बळकटी मिळेल, तसेच त्यांच्या पक्षनिष्ठ कार्याला न्याय मिळेल, अशी भूमिका राष्ट्रीय लहुशक्ती संघटनेने व्यक्त केली आहे.

# 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६' ची प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यशाळा

## लोकांच्या मानसिकतेत बदल घडविण्यासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा: जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

घनकचरा व्यवस्थापन ही केवळ स्वच्छतेची बाब नसून सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणाशी निगडित अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकांच्या मानसिकतेत बदल घडविणे आवश्यक असून, यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ : गावस्तरावर अंमलबजावणी-संधी व आव्हाने' या विषयावरील जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता महेश कान्हेकर आणि जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी गजानन खुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६च्या अनुषंगाने लोकांच्या मानसिकतेत बदल होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने घनकचरा व्यवस्थापनाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कायदेशीर आयुधे उपलब्ध करून दिली



असून, नियमांच्या अंमलबजावणीचे सक्त निर्देश दिले आहेत. त्यामुळे प्रत्येक जिल्हाधिकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.'

**'जे केले ते दाखवा'**: ग्रामपंचायतींनी केवळ घनकचरा व्यवस्थापनाची कामे केल्याचा दावा न करता, त्या कामांची दृश्य आणि डिजिटल स्वरूपात नोंद ठेवणे आवश्यक आहे. नव्या नियमांनुसार करण्यात आलेल्या कामांचे पूर्वीचे आणि नंतरचे जिओटॅग फोटो अपलोड करणे आवश्यक आहे.

यासाठी 'स्वच्छतम' पोर्टल तयार करण्यात आले असून, त्यावर अचूक आणि अद्ययावत माहिती ऑनलाइन भरणे आवश्यक आहे, असेही जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी स्पष्ट केले.

घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी करण्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ग्रामपंचायतींची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामपंचायतींनी आतापासूनच कचऱ्याचे वर्गीकरण, कचऱ्यावर प्रक्रिया आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा न करण्याच्या सवयी नागरिकांमध्ये रुजविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेचे जनसंपर्क अधिकारी राम श्रृंगारे यांनी 'घनकचरा व्यवस्थापन नियम-२०२६ गावस्तरावर अंमलबजावणी- संधी व आव्हाने' या विषयावर सादरीकरण केले.

क्षमता बांधणी तज्ज्ञ प्रफुल्ल काळे यांनी घनकचरा व्यवस्थापन नियमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणी उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. मनुष्यबळ विकास सल्लागार शंकर आंबेकर यांनी घनकचरा व्यवस्थापनाच्या पर्यावरणीय पैलूंवर प्रकाश टाकला. यावेळी वाशिम पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रविंद्र सोनवणे आणि पारवा ग्रामपंचायतीचे सरपंच गोपाल लुंगे यांनी मनोगत व्यक्त केले.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २७९ ■ शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य ३.०० रु.

# अर्धे तिकीट महिलांसाठी की एनसीएमसी कार्डसाठी

## लाडक्या बहिणीं'च्या सवलतीला डिजिटल अडथळा; वर्ध्यात ग्रामीण महिलांचा आक्रोश

**वाडी-वस्ती-तांड्यावरील महिलांनी कार्ड रिचार्ज कुठे करायचे? सरकारने आधी सुविधा द्यावी, मगच सक्ती करावी**

**वर्धा जनमाध्यम :** महिलांच्या सक्षमीकरणाचा गवगवा करणाऱ्या सरकारच्या एसटी प्रवासातील ५० टक्के सवलत योजनेसमोर आता एनसीएमसी कार्डची अट उभी करण्यात आली आहे. त्यामुळे महिलांना प्रत्यक्षात सवलतीचा लाभ मिळणार की डिजिटल प्रक्रियेच्या जंजाळात अडकवले जाणार, असा संतप्त प्रश्न वर्धा जिल्ह्यातील महिला प्रवाशांकडून उपस्थित होत आहे. अर्धे तिकीट महिलांसाठी आहे की एनसीएमसी कार्डसाठी, असा थेट सवाल आता 'लाडक्या बहिणीं'कडून सरकारला विचारला जात आहे.

महिलांसाठी महिला सन्मान योजनेअंतर्गत एसटी प्रवासात ५० टक्के तिकीट सवलत देण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला, शेतमजूर, नोकरदार महिला, विद्यार्थीनी आणि विविध कामांसाठी तालुका व जिल्ह्याच्या ठिकाणी प्रवास करणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळाला. मात्र आता या सवलतीच्या लाभासाठी एनसीएमसी कार्ड बंधनकारक करण्यात आल्याने योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची भावना आहे.

**वाडी-वस्तीतील महिलांनी रिचार्ज कुठे करायचे**

वर्धा जिल्ह्यातील अनेक महिला आजही एसटी बसवरच प्रवासासाठी अवलंबून आहेत. गावापासून तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी एसटी हा त्यांचा मुख्य आधार आहे. अशा परिस्थितीत एनसीएमसी कार्ड काढणे, त्यात पैसे भरणे आणि वेळोवेळी रिचार्ज करणे ही प्रक्रिया ग्रामीण महिलांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.

बसस्थानक, सीएससी आणि आपले सरकार केंद्रावर कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असल्याचे सांगण्यात येते. मात्र प्रत्येक वाडी, वस्ती आणि तांड्यावर ही सुविधा उपलब्ध आहे का, हा खरा प्रश्न आहे. कार्ड तर दिले, पण रिचार्जची सुविधा गावात नाही, मग महिलांनी प्रत्येक वेळी शहरात धाव घ्यायची का? असा सवाल उपस्थित होत आहे.

**सवलतीसाठी आधी पैसे भरण्याची सक्ती का**

एनसीएमसी कार्डसाठी आधी रिचार्ज करावे लागते. १०० रुपयांचे रिचार्ज केल्यानंतर प्रत्यक्ष वापरासाठी ८७.१४ रुपये उपलब्ध होत असल्याचे सांगण्यात येते. उर्वरित रक्कम विविध शुल्क आणि करांच्या माध्यमातून कपात होत असल्याने प्रवाशांच्या मनात नाराजी आहे.

महिलांना सवलत द्यायची असेल तर त्यांच्या खिशातून आधी पैसे काढून घेण्याची गरज काय? असा सवाल महिला प्रवाशांकडून केला जात आहे. प्रवास केला नाही तरी कार्डमध्ये पैसे ठेवण्याची आवश्यकता असल्याने या पद्धतीचा सर्वाधिक फटका गरीब आणि ग्रामीण महिलांना बसू शकतो.

**पहिल्याच दिवशी तांत्रिक अडथळे**




१ सप्टेंबरपासून एनसीएमसी कार्डच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली. मात्र अनेक ठिकाणी कार्डमध्ये रिचार्ज नसणे, मशीनमध्ये तांत्रिक अडचणी येणे यामुळे प्रवाशांची गैरसोय झाली. काही महिलांना सवलतीऐवजी पूर्ण तिकीट काढावे लागल्याने वाहक आणि प्रवाशांमध्ये वादाचे प्रसंगही निर्माण झाले.

सुविधा पूर्णपणे कार्यान्वित नसताना सक्ती कशासाठी, असा प्रश्न आता एसटी प्रशासनासमोर आहे.

**महिला दिसत असताना कार्डची अट कशासाठी**

महिला प्रवाशांसाठी असलेली ५० टक्के सवलत ही त्यांच्या आर्थिक दिलासासाठी आहे. मग महिला प्रवासी समोर असताना तिची ओळख पटविण्यासाठी एनसीएमसी कार्डची सक्ती करण्यामागे नेमके कारण काय, असा सवाल उपस्थित होत आहे.

इतर विशिष्ट प्रवर्गांना देण्यात येणाऱ्या सवलतींसाठी डिजिटल पडताळणीची गरज समजू शकते. मात्र सरसकट महिलांसाठी घोषित केलेल्या सवलतीला कार्डची अट घालून सरकारनेच आपल्या योजनेभोवती डिजिटल कुंपण उभे केले आहे, अशी टीका होत आहे.

**सवलत महिलांची, सक्ती कार्डची**

महिलांना खरोखर सवलत द्यायची असेल तर कार्ड काढण्यापासून रिचार्जपर्यंतची सुविधा गावागावात उपलब्ध करून द्यावी. तांत्रिक अडचणी दूर कराव्यात आणि कार्ड नसल्यामुळे कोणत्याही महिलेला ५० टक्के सवलतीपासून वंचित ठेवू नये, अशी मागणी होत आहे.

सवलत आमच्यासाठी की कार्डसाठी हा महिलांचा साधा प्रश्न सरकारने ऐकावा. योजना महिलांच्या हिताची असेल तर तिचा लाभ घेण्यासाठी महिलांनाच अडथळ्यांच्या रांगेत उभे करू नये, अशी भावना वर्धा जिल्ह्यातील महिला प्रवाशांमध्ये व्यक्त होत आहे.

---

गुरुजींच्या कर्तृत्वाला सलाम

# जिल्ह्यातील आठ शिक्षकांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव

## विद्यार्थ्यांना घडविणाऱ्या हातांना शिक्षक दिनी मानाचा मुजरा

**वर्धा जनमाध्यम :** शाळेच्या चार भिंतींपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या आयुष्याला आकार देणाऱ्या जिल्ह्यातील आठ प्राथमिक शिक्षकांची यंदाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाली आहे. प्रतिकूल परिस्थितीतही विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लावण्यासह विविध उपक्रमांतून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या गुरुजींचा शिक्षक दिनाचे औचित्य साधून मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे.

आजच्या स्पर्धेच्या युगात पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढता कल आहे. त्यातच जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांवर अध्यापनासोबतच अशैक्षणिक कामांचा वाढता ताण आहे. अशा परिस्थितीतही विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता टिकवून ठेवत त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्याचे आव्हान शिक्षकांसमोर आहे. या आव्हानाला सामोरे जात ग्रामीण भागातील शिक्षक शिक्षणाची मशाल तेवत ठेवत आहेत.

यंदाच्या आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातून एकूण १७ शिक्षकांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १२ शिक्षक मुलाखतीसाठी उपस्थित



राहिले. प्राप्त प्रस्ताव, शैक्षणिक कार्य, विद्यार्थ्यांसाठी राबविलेले उपक्रम आणि सामाजिक योगदान यांची सर्व बाजूंनी छाननी करण्यात आली. त्यानंतर जिल्हास्तरीय चार सदस्यीय समितीने प्रत्येक तालुक्यातून एक अशा एकूण आठ शिक्षकांची निवड केली.

**आठ तालुक्यांतून आठ कर्तृत्ववान गुरुजी**

वर्धा तालुक्यातील वायफड हनुमान नगर पारधी बेडा येथील जि.प. प्राथमिक शाळेच्या शिक्षिका वैशाली हरिष उरकांते, कारंजा तालुक्यातील सुसुंद्रा जि.प. उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक सुंदरसिंग रतीराम साबळे, सेलू तालुक्यातील मोर्चापूर जि.प. प्राथमिक शाळेच्या शिक्षिका उषा अतुल तळवेकर, हिंगणघाट तालुक्यातील सास्ती जि.प. उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक अनिल ईश्वर नाईक, देवळी तालुक्यातील गौळ जि.प. उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक रमेश गुलाब हजारे, आर्वी तालुक्यातील बोरखेडी जि.प. प्राथमिक शाळेचे शिक्षक संजय पांडुरंग मुंदाणे, समुद्रपूर तालुक्यातील देरडा जि.प. उच्च प्राथमिक शाळेचे शिक्षक चंद्रशेखर बापुराव वैद्य आणि आष्टी तालुक्यातील पिलापूर जि.प. प्राथमिक शाळेचे शिक्षक दत्तू महादेव अकोलकर यांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

**फक्त शिकवणारे नव्हे, भविष्य घडविणारे हात**

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना पंख देण्याचे काम हे शिक्षक करीत आहेत. म्हणूनच शिक्षक दिनाच्या निमित्ताने होणारा हा गौरव केवळ आठ गुरुजींचा नसून 'शाळा टिकविणाऱ्या आणि पिढी घडविणाऱ्या प्रत्येक शिक्षकाच्या कर्तृत्वाला दिलेली सलामी' ठरणार आहे.

---

# वर्ध्यात वीजचोरांना महावितरणचा 'करंट'

## पाच महिन्यांत ५२९ वीजचोऱ्या उघड; ५६.७ लाखांचा वीजअपहार उघडकीस

**वर्धा जनमाध्यम :** महावितरणच्या वीजचोरीविरोधी मोहिमेने जिल्ह्यातील वीज चोरांचे धाबे दणाणले आहेत. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या पाच महिन्यांत ग्रामीण आणि शहरी भागात राबविण्यात आलेल्या विशेष तपासणी मोहिमेत तब्बल ५२९ वीजचोऱ्या उघडकीस आल्या आहेत. या कारवाईत सुमारे ५६.७ लाख रुपये किमतीच्या २.५२ लाख युनिट विजेचा बेकायदेशीर वापर झाल्याचे समोर आले आहे.



वीज वितरण यंत्रणेवर थेट आकडे टाकून वीज घेणे, अनधिकृत केबलचा वापर करणे तसेच मीटरमध्ये तांत्रिक छेडछाड करून वीज लाटण्याचे प्रकार तपासणीत उघड झाले.

विशेष म्हणजे एप्रिल ते जुलै या चार महिन्यांत ३६९ वीजचोऱ्या पकडण्यात आल्या होत्या. मात्र ऑगस्टमध्ये महावितरणच्या पथकांनी कारवाईचा फास आणखी आवळत एकाच महिन्यात १६० वीजचोऱ्या पकडल्या.

जिल्ह्यातील कारवाईत वर्धा विभाग आघाडीवर असून तब्बल २५३ वीजचोऱ्या उघडकीस आल्या. आर्वी विभागात १५१ तर हिंगणघाट विभागात १३५ प्रकरणे पकडण्यात आली. वीजचोरी करणाऱ्यांविरुद्ध भारतीय वीज कायदा २००३ मधील कलम १३५ आणि १३८ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

**४१७ ग्राहकांकडून ४८.७ लाख वसूल**

महावितरणच्या धडक मोहिमेचा आर्थिक परिणामही स्पष्ट झाला आहे. वीजचोरी पकडलेल्या ५२९ ग्राहकांपैकी ४१७ ग्राहकांनी वीज बिल व दंडापोटी सुमारे ४८.७ लाख रुपये भरले आहेत. नियमानुसार ३६७ ग्राहकांना तडजोड शुल्काचे देयक आकारण्यात आले असून, महावितरणच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या सहा ग्राहकांविरुद्ध पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**आता कारवाई आणखी तीव्र होणार**

वीजचोरीविरोधातील मोहीम यापुढेही अधिक आक्रमकपणे राबविण्यात येणार आहे. सणासुदीच्या काळात वीजचोरी करून कायद्याच्या कचाट्यात सापडण्यापेक्षा ग्राहकांनी अधिकृत वीजजोडणीचा वापर करून नियमित वीजबिल वेळेत भरावे, असे आवाहन महावितरणच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांनी केले आहे.

---

# रेतीच्या गाडीवर 'लाच'चा डाव; समुद्रपूरचे दोन पोलिस निलंबित

## ४० हजारांची लाच स्वीकारल्याचा आरोप; दोन पोलिस कर्मचारी निलंबित

**समुद्रपूर जनमाध्यम :** समुद्रपूर पोलिस ठाण्यातील कर्मचारी प्रकाश मैद यांच्यावर चाकूहल्ल्याची घटना ताजी असतानाच आता याच ठाण्यातील दोन कर्मचाऱ्यांवर लाचखोरीची कारवाई झाल्याने पोलिस विभागात खळबळ उडाली आहे. रेतीने भरलेले अवजड वाहन सोडण्यासाठी लाचेची मागणी करून रक्कम स्वीकारल्याच्या आरोपावरून कर्मचारी राहुल साठे आणि सुमित भुते यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती आहे.




प्राप्त माहितीनुसार, चंद्रपूर जिल्ह्यातील एका रेती व्यावसायिकाचे रेतीने भरलेले अवजड वाहन पोलिसांच्या ताब्यात आले होते. हे वाहन समुद्रपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत पकडल्याचे भासवून ते सोडण्यासाठी संबंधिताकडे तब्बल ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचा आरोप आहे.

संबंधित व्यावसायिकाने रेतीसाठा आपल्या मालकीचा असल्याचे सांगूनही कर्मचारी राहुल साठे यांनी कथित लाचेची मागणी कायम ठेवली. कारवाईच्या भीतीपोटी संबंधिताने ३० हजार रुपये रोख आणि १० हजार रुपये ऑनलाइन, असे एकूण ४० हजार रुपये दिल्याचे सांगण्यात येते. यातील आणखी १० हजार रुपये कर्मचारी सुमित भुते याला देण्यात आल्याचा आरोप आहे.

या प्रकाराची माहिती वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्यानंतर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन्ही कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांकडूनच लाचेची मागणी झाल्याच्या या प्रकारामुळे समुद्रपूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. एकीकडे अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करण्याची जबाबदारी असताना कारवाईच्या नावाखालीच पैशांची मागणी झाल्याचा आरोप समोर आल्याने वरिष्ठ अधिकारी आता या प्रकरणाची सखोल चौकशी करणार का, याकडे लक्ष लागले आहे.

---

# नातवाच्या दारात आजोबांचा जादूटोणा

## निंबू, अंडी, कनकेचे दिवे अन् भात टाकून भीती निर्माण करण्याचा डाव

### रामनगर पोलिसात गुन्हा दाखल

**वर्धा जनमाध्यम :** घरगुती वादाचा वचपा काढण्यासाठी चक्क नातवाच्या घरासमोर जादूटोण्याचा आभास निर्माण करण्याचा प्रकार समोर आला आहे. शेंदूर लावलेले निंबू, अंडी, कनकेचे दिवे आणि भात घराच्या प्रवेशद्वारासमोर टाकून कुटुंबीयांच्या मनात मृत्यू आणि जादूटोण्याची भीती निर्माण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी संजय दशरथ पलेरिया (६३), रा. त्रिमूर्तीनगर, वर्धा याच्याविरुद्ध रामनगर पोलिसांनी जादूटोणा प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणातील तक्रारदार मनोज कन्हैय्यालाल पलेरिया (४०) हे तडस लेआऊट परिसरात भाड्याने राहतात. ते वॉटर सप्लाय एजन्सी चालवितात. १३ ऑगस्टच्या मध्यरात्री सुमारे दीड वाजता घरी परतल्यानंतर घराच्या प्रवेशद्वारासमोर एका कागदावर शेंदूर लावलेले तीन निंबू, एक अंडे, दोन कनकेचे दिवे आणि भात ठेवलेला दिसला.

हा प्रकार पाहून मनोज यांनी कुटुंबीयांकडे चौकशी केली. मात्र सुरुवातीला हे साहित्य कोणी ठेवले, याचा उलगडा झाला नाही. त्यानंतर त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यात भगव्या रंगाचा टी-शर्ट घातलेली व्यक्ती घरासमोर संशयास्पद साहित्य ठेवताना दिसून आली.

पुढील तपासात ही व्यक्ती संजय पलेरिया असल्याचे समोर आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. मनोज यांच्या कुटुंबीयांचा संजय यांच्याशी शेती आणि जागेच्या कारणावरून वाद असल्याचेही पोलिसांनी सांगितले.

---

# ६७ महिन्यांची वेदना; देशमुखांकडून महिन्याची मलमपट्टी

## कर्मचाऱ्यांना एका महिन्याच्या पगाराचे आश्वासन; उर्वरित ६६ महिन्यांचे काय?

**वर्धा जनमाध्यम :** सेवाग्राम येथील बापुराव देशमुख अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे तब्बल ६७ महिन्यांचे वेतन थकीत असताना व्यवस्थापनाने केवळ एका महिन्याचा पगार देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे वेतनाच्या प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या जखमेवर महिन्याची मलमपट्टी, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

वेतनाअभावी कर्मचाऱ्यांसमोर घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार, कर्जाचे हप्ते आणि दैनंदिन गरजा भागविण्याचा गंभीर प्रश्न उभा आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी १३ ऑगस्टपासून संस्थाध्यक्ष समीर देशमुख यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन सुरू केले. किमान एक महिन्याचे वेतन द्यावे, अशी त्यांची मागणी होती.

प्रकरण पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी तातडीने हस्तक्षेप केला. तंत्रशिक्षण मंत्र्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन देत जिल्हाधिकाऱ्यांना व्यवस्थापनासोबत बैठक घेण्याच्या सूचना दिल्या.

३ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीत व्यवस्थापनाने एका महिन्याचे वेतन देण्याचे मान्य केले. त्यानंतर पुढील वेतन देण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. पोळ्यापूर्वी हा पगार खात्यात जमा होईल, अशी आशा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

मात्र ६७ महिन्यांचा डोंगर आणि हातात फक्त एका महिन्याची रक्कम, त्यामुळे उर्वरित ६६ महिन्यांचे वेतन कधी मिळणार, हा कर्मचाऱ्यांचा खरा प्रश्न आहे.

---

# दादाजींच्या स्मृतींना वृक्षारोपणातून मानवंदना

**विरुळ-आकाजी :** संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. महादेवसिंह पांडूसिंह धंदोरिया यांच्या १०९व्या जयंतीनिमित्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात विविध उपक्रमांनी भावपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. संस्थेचे अध्यक्ष नरेंद्रसिंह महादेवसिंह धंदोरिया यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला.



यावेळी नरेंद्रसिंह धंदोरिया यांनी स्व. दादाजींच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या विचारांचा आणि सामाजिक योगदानाचा विद्यार्थ्यांनी आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. कॉलेज प्रमुख प्रमोद बेलखडे यांनीही दादाजींच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

जयंती तसेच जन्माष्टमीचे औचित्य साधून इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी चित्र रंगवा स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कल्पकतेतून विविध चित्रे साकारली. यावेळी अध्यक्ष नरेंद्रसिंहजी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. प्राचार्य नितीन गवारकर, पृथ्वीराजसिंह धंदोरिया, संचालक शिखा स्वप्नील चव्हाण यांच्यासह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. शिखा मॅडम यांनी आभार मानले.


---

# मतदारांनी प्रारुप यादीत नावे तपासून आक्षेप, हरकती असल्यास दाखल करावे - आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी

**वर्धा जनमाध्यम :** मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या यादीत एकही पात्र मतदार वगळला जाऊ नये, यासाठी नागरिकांनी आपले नाव तपासून पाहावे. नावात दुरुस्ती, बदल किंवा नव्याने नाव समाविष्ट करावयाचे असल्यास मुदतीत दावे व हरकती दाखल कराव्यात, असे आवाहन मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत बिदरी यांनी एसआयआर कार्यक्रमाचा आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, अतिरिक्त जिल्हाधिकारी संजय तेली, निवडणूक उपजिल्हाधिकारी अनिल गावीत यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मतदार यादी अधिकाधिक शुद्ध आणि अद्ययावत करण्याच्या उद्देशाने हा विशेष कार्यक्रम राबविण्यात येत आहे. प्रारुप मतदार यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी कार्यालये तसेच ग्रामपंचायत स्तरावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदारांनी आपले नाव, मतदान केंद्र व इतर तपशील तपासून आवश्यक असल्यास विहित नमुन्यात अर्ज करावा.



श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पावन पर्वावर भक्तिरसात रंगलेले श्रव्य प्रतिक्षा संदीप बहीराट

---

## जाहीर सूचना

माझे पती अशोक अंगदराव बन्सोड यांचे दिनांक 29-06-2025 रोजी दुखत निधन झाले. त्यांच्या मालकीचे HYUNDAI I20 MAGNA वाहन क्रमांक MH32AH6029 चेचीस नंबर MALBM51BLKM693504 इंजिन G4LAKM281573 हे आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव सुरेखा अशोकराव बन्सोड (वय-51 ) रा. शांती स्तूप जवळ, अनुराग अपार्टमेंट, लक्ष्मि नगर, वर्धा 442001 हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उप प्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**सुरेखा अशोकराव बन्सोड (वय-५१ )**
**रा. शांती स्तूप जवळ, अनुराग अपार्टमेंट, लक्ष्मीनगर, वर्धा ४४२००१, मो. ९९२३४४२०३९**

# भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार कराराच्या यशात महाराष्ट्र प्रमुख भागीदार ठरणार-मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** भारत-युरोपियन युनियन मुक्तव्यापार करार हा केवळ शुल्क, नियम आणि बाजारपेठेतील प्रवेशापुरता मर्यादित नसून विश्वासावर आधारित व्यापक भागीदारीचा करार आहे. या कराराच्या माध्यमातून निर्माण होणा-या संधींचे आर्थिक परिणामांमध्ये रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र सज्ज असून, भारत-युरोपियन युनियन आर्थिक भागीदारीच्या यशात महाराष्ट्र प्रमुख भागीदार ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र आणि बेल्जियम यांच्यातील आर्थिक भागीदारी अधिक व्यापक करण्यासाठी मुंबई-अँटवर्प आर्थिक भागीदारी विकसित करण्याची संकल्पनाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मांडली. भारत-युरोपियन युनियन मुक्तव्यापार कराराच्या पार्श्वभूमीवर आयोजित भारत-बेल्जियम उच्चस्तरीय संवाद



कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बेल्जियमचे प्रधानमंत्री बार्ट डी वेव्हर, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यावेळी उपस्थित होते. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल हे देखील यावेळी उपस्थित होते. अँटवर्प-ब्रुज बंदर, बेल्जियमच्या प्रधानमंत्री कार्यालयाचे चॅन्सेलरी, एफपीएस फारेन अफेअर्स, फ्लँडर्स इन्व्हेस्टमेंट अँड ट्रेड आणि मुंबईतील बेल्जियमचे कान्सुलेट जनरल यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारत स्वतंत्र झाल्यानंतर सप्टेंबर १९४७ मध्ये भारताशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करणा-या पहिल्या युरोपीय देशांपैकी बेल्जियम एक आहे. लोकशाही, संघराज्य व्यवस्था, बहुविधता आणि कायद्याचे राज्य या समान मूल्यांवर भारत-बेल्जियम मैत्रीची भक्कम पायाभरणी झाली आहे. भारत-युरोपियन युनियन मुक्त व्यापार करारामुळे या संबंधांना नवी दिशा मिळणार आहे. जगात भू-राजकीय अनिश्चितता वाढत असताना भारत आणि युरोप विश्वासार्ह व सक्षम पुरवठा साखळ्यांसाठी परस्पर सहकार्याचा मार्ग स्वीकारत आहेत.

**महाराष्ट्र-बेल्जियम नैसर्गिक भागीदार-** बेल्जियमकडे जागतिक दर्जाची बंदरे आणि लाजिस्टिक्स व्यवस्था असून औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, रसायने, यंत्रसामग्री, प्रगत उत्पादन, सेमीकंडक्टर संशोधन, हरित हायड्रोजन आणि स्वच्छ तंत्रज्ञान क्षेत्रातील क्षमता उल्लेखनीय आहे. महाराष्ट्राकडे मोठी बाजारपेठ, कुशल मनुष्यबळ आणि मजबूत औद्योगिक परिसंस्था आहे. त्यामुळे बेल्जियम आणि महाराष्ट्र हे नैसर्गिक भागीदार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. महाराष्ट्राचा देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात सुमारे १५ टक्के आणि निर्यातीतही जवळपास तेवढाच वाटा आहे. भारतात येणा-या थेट परकीय गुंतवणुकीपैकी जवळपास एक तृतीयांश गुंतवणूक महाराष्ट्रात होते. देशातील सुमारे ६६ टक्के डेटा सेंटर क्षमता महाराष्ट्रात आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक, व्यापारी आणि मनोरंजन राजधानी असून पुणे अभियांत्रिकी, वाहन उद्योग, तंत्रज्ञान आणि संशोधनाचे प्रमुख केंद्र आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह डेटा सेंटर, नवोन्मेष, आरोग्य आणि शिक्षणाचे नवे आर्थिक केंद्र म्हणून विकसित होत आहे. २०३० पर्यंत महाराष्ट्राला एक ट्रिलियन डालर अर्थव्यवस्था बनविण्याचे उद्दिष्ट असून या प्रवासात बेल्जियमने भागीदार व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. बेल्जियम-महाराष्ट्र सहकार्यासाठी प्रगत उत्पादन आणि हरित उद्योग, सेमीकंडक्टर व इलेक्ट्रानिक्स, स्वच्छ उर्जा, औषधनिर्माण व जैवतंत्रज्ञान तसेच बंदरे, लाजिस्टिक्स आणि दळणवळण या पाच क्षेत्रांत मोठ्या संधी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

## समृद्धी महामार्गावर तरूणाच्या अपहरणाचा थरार, पोलिसांनी ऊधळला डाव; केले जेरबंद

**कोपरगाव (जि. अहिल्यानगर) :** पुण्याहून तरुणाचे अपहरण करून त्याला उत्तर प्रदेशात पळवून नेण्याचा धक्कादायक प्रकार २ सप्टेंबर रोजी कोपरगाव शहर पोलिस ठाणे हद्दीत समृद्धी महामार्गावर उघडकीस आला आहे. महामार्ग पोलिसांनीसमृद्धी महामार्गावर भरधाव कारचा तीन किलोमीटरपर्यंत पाठलाग करत कार अडवली. तरुणाची सुटका करून आरोपींना जेरबंद केले. अपहरणकर्ते कोपरगाव पोलिसांच्या ताब्यात असून त्यांना पुणे पोलिसांच्या स्वाधीन करण्यात येणार आहे. पुण्याच्या चिखली परिसरातून आर्शद शकील अहमद सिद्दीकी (वय २४) या तरुणाचे अपहरण करण्यात आल्याची माहिती पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून समृद्धी कंट्रोल रूमला



मिळाली होती. अपहरणकर्ते हे कारमधून (कार क्रमांक युपी ९० एई ९३७५) आर्शद सिद्दीकी याला घेउन समृद्धी महामार्गाने सिन्नरकडून नागपूरच्या दिशेने जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पिंपरी-चिंचवड पोलिसांनी बाभळेश्वर महामार्ग पोलिसांना ही घटना कळविली. बुधवारी (दि. २) रात्री महामार्ग पोलिस समृद्धी महामार्गावरच गस्त घालीत होते. चॅनल क्रमांक ५२३ जवळ पोलिसांना संशयित कार भरधाव वेगाने जाताना दिसली. पोलिसांनी क्षणाचाही विलंब न लावता कारचा पाठलाग सुरू केला. कामगिरी बाभळेश्वर महामार्ग पोलिस चौकीचे पोलिस उपनिरीक्षक विक्रांत कचरे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक ठोंबरे, पोलिस नाईक महेश बोरुडे, रामचंद्र साळुंके, पोलिस कान्स्टेबल प्रवीण पालवे, रोहित आरवडे आणि शिंदे यांच्या पथकाने केली. कारमधून अपहरणकर्ते महंमद अन्वर सिद्दीकी (वय ३९), निजामुद्दीन सिद्दीकी (वय ४१), फाजील हुसेन सिद्दीकी (वय २३), महंमद साहील सिद्दीकी (वय २१), महंमद सिद्दीकी, इमामुद्दीन सिद्दीकी आणि सायमा सिद्दीकी (वय २६, सर्व रा. उत्तर प्रदेश) यांना ताब्यात घेण्यात आले. महामार्ग पोलिसांनी पीडित तरुण, ६ संशयित आरोपींना कोपरगाव शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. पिंपरी-चिंचवड पोलिस ठाण्याचे पथक आरोपींचा ताबा घेण्यासाठी रवाना झाले असून अपहरणाचे नेमके कारण काय याचा पुढील तपास पिंपरी-चिंचवड पोलिस करत आहेत.

## अनुसूचित जातीच्या उमेदवारांना 'बार्टी'कडून 10 हजार रूपयांचे आर्थिक सहाय्य

**मुंबई, दि. ४ :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जातीच्या उमेदवारांना मुलाखतीची प्रभावी तयारी करता यावी, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्यामार्फत एकरकमी १० हजार रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. या आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र उमेदवारांनी विहित मुदतीत ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी १० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावा. तसेच, अर्जाची स्व-साक्षांकित प्रत आवश्यक कागदपत्रांसह ११ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बार्टी, पुणे कार्यालयाकडे पोस्ट अथवा कुरियरद्वारे पाठविणे बंधनकारक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी व अनुसूचित जाती प्रवर्गातील असणे आवश्यक असून, २५ ऑगस्ट २०२६ रोजी जाहीर झालेल्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्यसेवा मुख्य परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या योजनेसाठी उमेदवाराची वयोमर्यादा कमाल ३५ वर्षे निश्चित करण्यात आली आहे.

# कांदा महागला!; चाळीत ४० टक्केच साठा शिल्लक

**लासलगाव / प्रतिनिधी-** नाशिक जिल्ह्यात कांद्याच्या दराने पुन्हा एकदा साडेचार हजार रुपयांचा टप्पा ओलांडला असून, आगामी काळात कांद्याचे दर आणखी मजबूत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. केंद्र सरकारने दर नियंत्रणासाठी नाफेड आणि एनसीसीएफच्या माध्यमातून राखीव कांदा दिल्ली, चेन्नईसह प्रमुख महानगरांमध्ये पाठवून बाजारातील पुरवठा वाढवला होता.

त्याचा परिणाम म्हणून मागील सप्ताहात कांद्याच्या घाउक दरात क्विंटलमागे तब्बल ४०० ते ५०० रुपयांची घसरण झाली होती. मात्र, सरकारी हस्तक्षेपाचा परिणाम अल्पकाळ टिकला असून, चालू सप्ताहात कांद्याचे दर पुन्हा वाढले आहेत.केंद्र सरकारने राखीव साठ्यातील कांदा ३५ रुपये किलो दराने महानगरांमध्ये उपलब्ध करून न दिला. त्यामुळे बाजार समित्यांमधील कांद्याच्या दरावर दबाव निर्माण झाला. मात्र, यंदा केंद्र सरकारकडे राखीव कांद्याचा साठा कमी असल्याने आगामी काळात मोठ्या प्रमाणात सरकारी कांदा बाजारात आणणे शक्य होईलच असे नाही. नाशिक जिल्ह्यात चाळींत साठवलेल्या उन्हाळ कांद्यापैकी ६० ते ६५ टक्के कांदा विकला गेला असून, सुमारे ४० टक्के साठा शिल्लक असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. त्यातच पावसामुळे चाळीत साठवलेल्या कांद्याची गुणवत्ता खालावत असल्याने काही कांदा खराब होत आहे.त्यामुळे प्रत्यक्ष बाजारासाठी उपलब्ध होणारा कांद्याचा साठा आणखी कमी होण्याची शक्यता आहे. सध्याचा उपलब्ध साठा ऑक्टोबरच्या मध्यापर्यंतच पुरेल, असा अंदाज व्यक्तकेला जात आहे. त्यानंतर नवीन कांद्याची आवक अपेक्षित प्रमाणात झाली नाही, तर बाजारात कांद्याची उपलब्धता कमी होउन दर वाढण्याची शक्यता आहे.



**खरीप, रांगडा कांद्याला अच्छे दिन-** नवीन खरीप तसेच रांगडा कांद्याच्या बाजारातील आवकेला विलंब होण्याची शक्यता असल्याने आगामी हंगामातील कांद्याला चांगला दर मिळण्याची शक्यता बाजारातील जाणकार व्यक्त करीत आहेत. मात्र, शेतक-यांनी केवळ दराच्या अपेक्षेवर अवलंबून न राहता दर्जेदार उत्पादनावर भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या कांद्याच्या दराने पुन्हा साडेचार हजारांचा टप्पा गाठला असताना, चाळीतील घटता साठा, खराब होणारा कांदा आणि खरीप कांद्याच्या लागवडीला झालेला विलंब या तीन घटकांमुळे आगामी एक ते दीड महिना कांदा बाजारासाठी अत्यंत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर शेतकरी संघटनेने शेतक-यांना कांदा विक्रीची घाई न करण्याचे आवाहन केले आहे. शेतक-यांनी उपलब्ध कांद्याचा साठा आणि बाजारातील आवक लक्षात घेउन नियोजनबद्ध विक्री करावी. संपूर्ण कांदा एकाच वेळी बाजारात आणण्याऐवजी टप्प्याटप्प्याने कांदा विक्री करावी, असा सल्ला संघटनेने दिला आहे. शेतक-यांनी शक्यतो कांदा कृषि उत्पन्न बाजार समितीत आणून लिलावाच्या माध्यमातून विक्री करावी, असा सल्लाही संघटनेने दिला आहे.

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

दिवाणी अर्ज क्र. [illegible]/२०२६
निलेश + २ विरुद्ध निरंक
पुढील ता.२८.०५.२०२६

अर्जदार :-
1. Nilesh Suresh Gupta
Aged 35 years Occu. Business
R/o Galli No. 7 Kalyan Nagar, Amravati
2. Ankesh Suresh Gupta
Aged [illegible] years Occu. Business
R/o Near Hanuman Mandir, Kalyan Nagar, Amravati
3. Shilpa Vimal Saraswat
Aged 48 years Occu. Household
R/o Near Pawan Kiran, Shant Nagar, Amravati

विरुद्ध

गैरअर्जदार :- NIL

[illegible] Kusum Suresh Gupta [illegible] Nilesh Suresh Gupta +2 [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Nilesh Suresh Gupta [illegible]

[illegible]

आदेशानुसार,
[illegible]
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
(शिक्का)

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.[illegible] ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

दिवाणी अर्ज क्र.१५१८/२०२६
Sonali Shailendra Sahu and ors Versus NIL
पुढील ता.१६.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

Applicants:
1. Sonali Shailendra Sahu, Age [illegible] years Occu. Household
R/o Ambapeth Near Income Tax Office,
Amravati Tq & Dist. Amravati
2. Shekhar Satish Sahu, Age [illegible] years Occu. Labour work
R/o Balaji Mandir Line, Masanganj, Amravati Tq & Dist. Amravati
3. Shubham Satish Sahu, Age 37 years Occu. Labour work
R/o Near Balaji Mandir, Itwara Bazar,
Amravati Tq & Dist. Amravati
4. Jagruti Sanjay Pateriya, Age [illegible] years Occu. Household
R/o 566, Anand Colony, Sai Nagar,
Amravati Tq & Dist. Amravati
...PERSONS...

Non- Applicant :- NIL

[illegible] Satish [illegible] Sahu [illegible] Laxmi Satish Sahu [illegible] Sonali Shailendra Sahu and ors [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Sonali Shailendra Sahu and ors [illegible]

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
(शिक्का)

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

दिवाणी अर्ज क्र.१९८१/२०२६
अतुल +४ विरुद्ध निरंक
पुढील ता.२३.०९.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :-
1. Mr. Atul Sudhakar Gedam, Aged 44 years Occu. Private Job
2. Mr. Rahul Sudhakar Gedam, Aged [illegible] years Occu. Business
3. Smt. Sulochana Baban Ujare, Aged [illegible] years Occu. Household
4. Sunanda Ajabrao Gedam, Aged 57 years Occu. Household
1 to 4, R/o Satyasai Furniture Line, Gulpe Nagar, Amravati
5. Mrs. Megha Ashish Bahane, Aged 41 years Occu. Household
R/o Adgaon, Tq. & Dist. Amravati

विरुद्ध

गैरअर्जदार :- NIL

[illegible] Subhash Ajabrao Gedam [illegible] २१.०१.२०२५ [illegible] Mr. Atul Sudhakar Gedam + 4 [illegible] APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE [illegible]

[illegible] Mr. Atul Sudhakar Gedam+4 [illegible]

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
(शिक्का)

जाहीर नोटीस
अचलपूर येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश-१, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण यांचे न्यायालय

मोटार अपघात दावा क्रमांक १४/२०२१ [illegible]

पिटीशनर - [illegible] व इतर
-- वि --
रिस्पांडंट - [illegible] व इतर

[illegible] मो.याकुब मो.युसुफ,
[illegible] ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

APPLICATION U/SEC.166 OF MOTOR VEHICLE ACT 1988 FOR GRANT OF COMPENSATION

[illegible]

[illegible] मो.याकुब मो.युसुफ [illegible]

[illegible]

अचलपूर
दिनांक [illegible]
(शिक्का)
आदेशान्वये,
अधीक्षक,
जिल्हा व सत्र न्यायालय, अचलपूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.[illegible] ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

दिवाणी अर्ज क्र.[illegible]/२०२६
[illegible]
पुढील ता.१६.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

[illegible]

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती
(शिक्का)

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

दिवाणी (MJC) अर्ज क्र.२२६/२०२६ नै.ता.१६.०९.२०२६

१. कुसुम मारोतराव महिंगे
२. संदिप मारोतराव महिंगे दोन्ही रा.[illegible], पो.[illegible], ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. [illegible] र.पो.[illegible], ता.कारंजा लाड, जि.वाशिम
४. मनिषा राजेश [illegible] र.[illegible], ता.जि.अमरावती

// वि //
निरंक

ज्याअर्थी, मयत मारोती [illegible] महिंगे यांचा मृत्यु दि.१८.०६.२०२१ [illegible] ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला [illegible] क्र.१ ही पत्नी असुन अर्जदार क्र.२ हा मुलगा व अर्जदार क्र. ३ व ४ ह्या मुली आहेत. [illegible] मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ [illegible] अर्ज सादर केला आहे. [illegible] सकाळी १०.३० वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिशः [illegible] वकील मार्फत हजर रहावे. [illegible]

आज दिनांक १४ ऑगस्ट २०२६ रोजी [illegible] दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर
(शिक्का)

## जनतेच्या डोळयात धूळ फेकण्यात तुमचा हात धरू शकत नाही

**मुंबई / प्रतिनिधी-** महाराष्ट्राची सुजाण जनता दुधखुळी नाही. महाराष्ट्रात खोटे फॅक्ट्स पेरण्यात आणि जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्यात तुमचा आणि तुमच्या दिल्लीतील राजा बाबूचा हात कोणीच धरू शकत नाही.



लहान मुलाला विचारले तरी खोटेपणाच्या शर्यतीत पहिले नाव तुमचेच येईल अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली आहे. एक्स समाजमाध्यमात त्यांनी टवीट केले आहे. वेगळा विदर्भ असो, धनगर आरक्षण असो किंवा मराठा आरक्षण या सारख्या असंख्य मुद्द्यावर तुमचा खोटारडेपणा उघडा पडला आहे, म्हणूनच महाराष्ट्राच्या जनतेने तुम्हाला फसवणीस नाव दिले आहे. याउलट नोटबंदी, कोविडमधील अपयश, अर्थव्यवस्था, बेरोजगारी आणि महागाईवर राहुल गांधींनी जे प्रश्न उपस्थित केले, ते आज वास्तव म्हणून देशासमोर उभे आहेत.त्यामुळे इतरांवर फेक नरेटिव्हचे आरोप करण्याचा तुमचा केविलवाणा प्रयत्न हास्यास्पद आहे असे सपकाळ म्हणाले.

## शिंदेंवर बोलणे आता सहन केले जाणार नाही'-संजय लाखे इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** 'एकनाथ शिंदेंवर बोलणे आता यापुढे खपवून घेतले जाणार नाही,' असा इशारा मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक शिवसेना प्रवक्ते संजय लाखे पाटील यांनी दिला आहे. जालना येथे आयोजित पत्रकार परिषदेत लाखे पाटील यांनी जरांगे यांच्या भूमिकेवर जोरदार हल्लाबोल केला,



तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही आरोप केले. संजय लाखे पाटील म्हणाले, सामाजिक चळवळीला काही मर्यादा असतात. मात्र त्या मर्यादा ओलांडून केवळ एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले जात आहे. 'शिंदेंना बदनाम करण्यामागे राजकीय अजेंडा आहे. सामाजिक आंदोलनाच्या आडून एखाद्या नेत्याला व्यक्तिगत टार्गेट करणे चुकीचे आहे. एकनाथ शिंदे यांच्याविषयी कृतज्ञता बाळगली नाही, तर तो कसला मराठा?' असा सवाल त्यांनी केला. शिंदे यांच्या प्रयत्नांमुळेच मराठा समाजातील साडेतीन लाख नागरिकांना प्रमाणपत्रे मिळाली असून, त्यांचे योगदान नाकारता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय जरांगे यांची हैदराबाद गॅझेटबाबतची मागणी चुकीची असल्याचा दावाही त्यांनी केला. मनोज जरांगे यांच्यावर निशाणा साधतानाच संजय लाखे पाटील यांनी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही टीका केली. मराठा आरक्षणाच्या संदर्भात प्रशासनाकडून सुरू असलेल्या प्रक्रियेवर आक्षेप घेत, 'मंत्री विखे पाटील हे संपूर्ण मराठा समाजाला वेड्यात काढण्याचे काम करत आहेत,' असा आरोप त्यांनी केला.

## एसटी बसला अपघात; 45 विद्यार्थी जखमी

**धुळे :** धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील म्हसदी गावाजवळ एसटी बस आणि ट्रक यांच्या भीषण अपघाताची घटना घडली. धुळे-म्हसदी मार्गावरून धावणा-या एका बसला ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात शाळेत आणि कालेजमध्ये जाणा-या ४० ते ४५ विद्यार्थ्यांसह प्रवासी



जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेउन बचावकार्य सुरू केले.मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघाताच्या वेळी बसमध्ये शाळा आणि कालेजमध्ये जाणा-या विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होती. ट्रकची धडक इतकी भीषण होती की बसचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या दुर्दैवी घटनेत ४० ते ४५ विद्यार्थी जखमी झाले आहेत. त्यापैकी ५ ते ६ विद्यार्थ्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक असल्याचे समजते. अपघातानंतर जखमी विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे जवळच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. गंभीर जखमी विद्यार्थ्यांवर वैद्यकीय पथकाकडून तातडीने उपचार सुरू आहेत. अपघाताची बातमी पसरताच पालकांनी रुग्णालयात मोठी गर्दी केली असून परिसरात भीतीचे आणि चिंतेचे वातावरण पसरले आहे. पोलिस या अपघाताचा पुढील तपास करत आहेत.

## सीजेपीच्या निदर्शनानंतर दिल्ली पोलिस अक्शन मोडमध्ये! युपीतून स्वतंत्र भारद्वाज याला घेतले ताब्यात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** 'काकरोच जनता पार्टीच्या आंदोलनादरम्यान एका विद्यार्थ्याच्या वडिलांवर हल्ला करणारा स्वतंत्र भारद्वाज याला दिल्लीपोलिसांनी उत्तर प्रदेशातील बुलंदशहर येथून ताब्यात घेतले आहे. भारद्वाज याच्या अटकेच्या मागणीसाठी सीजेपीच्या कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दिल्लीतील पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याला



घेराव घातला होता. यानंतर, पोलिसांनी स्वतंत्र याला ७२ तासांच्या आत अटक करणार असल्याचे सांगितले होते. दरम्यान, आता दिल्ली पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, त्याला ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी बुलंदशहरमधील चोला पोलीस ठाण्यात नेले असून, तिथे त्यांची सध्या चौकशी सुरू आहे. स्वतंत्र भारद्वाज याची एक मुलाखत व्हायरल झाल्यानंतर 'काकरोच जनता पार्टी'ने पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याला घेराव घातला. व्हायरल झालेल्या मुलाखतीत भारद्वाज याने जुलै महिन्यात जंतर मंतर येथे झालेल्या सीजेपीच्या आंदोलनादरम्यान विद्यार्थी आंदोलक निशू आझाद यांचे वडील संजय कुमार यांना गंभीर जखमी केले होते, असा दावा केला आहे. तसेच, आपल्या राजकीय प्रभावामुळे आपल्यावर कारवाई झाली नसल्याचे म्हटले. व्हायरल झालेल्या या व्हिडिओमुळे सीजेपी समर्थक आणि दलित कार्यकर्ते संतप्त झाले आणि त्यांनी शुक्रवारी पार्लमेंट स्ट्रीट पोलीस ठाण्याला घेराव घातला.भारद्वाज याच्यावर कठोर कारवाई न केल्याचा आरोप करत आंदोलकांनी दिल्ली पोलिसांविरोधात घोषणाबाजी केली. आंदोलकांमध्ये सीजेपीचे सह-संयोजक सौरभ दास आणि आशुतोष रांका, तसेच आझाद समाज पार्टीचे प्रमुख आणि खासदार चंद्रशेखर आझाद यांचा समावेश होता. भारद्वाज याची ही मुलाखत मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाली. यानंतर हे आंदोलन सुरू झाले.

# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## 'चिल्ड्रन्स स्कूल बॅग पॉलिसी'

शिक्षण हे बालकांसाठी ओझे न बनता सर्वांगीण विकासाचे साधन असावे, हा विचार गेल्या काही दशकांत शिक्षणतज्ज्ञ,बालरोगतज्ज्ञ,धोरणकर्त्यांमध्ये सातत्याने चर्चिला जात आहे.अनेकदा याविषयी परिपत्रके, न्यायालयीन निकाल लागले; परंतु परिस्थिती आहे तशीच राहिली.राष्ट्रीय पातळीवर याची दखल सर्वप्रथम २०१५-१६ मध्ये मनुष्यबळ विकास मंत्रालयाने घेतली आणि विद्यार्थ्यांच्या दप्तराच्या ओझ्यासंदर्भात 'चिल्ड्रन्स स्कूल बॅग पॉलिसी' तयार करण्यासाठी तज्ज्ञ समिती स्थापन केली. या समितीच्या शिफारशींच्या आधारे केंद्र सरकारने २०१८ तसेच २०२० मध्ये यासंदर्भातील धोरण जाहीर केले. यामध्ये विद्यार्थ्यांच्या शरीराच्या वजनाच्या साधारण १० टक्क्यांपेक्षा अधिक वजन दप्तरात असू नये, असे स्पष्ट निर्देश दिले.राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नेही या दिशेने महत्त्वाची भूमिका बजावली.यामध्ये बालकेंद्री, आनंददायी आणि ओझेरहित शिक्षणाचा आग्रह धरला असून, प्राथमिक स्तरावरील अध्यापन हे पाठांतर व घोकंपट्टीवर आधारित न राहता संकल्पनात्मक आकलन, अनुभवाधारित शिक्षण आणि खेळ-आधारित पद्धतींवर केंद्रित असावे, अशी भूमिका मांडली. यातूनच पाठ्यपुस्तकांची संख्या, त्यांचे वजन आणि रोजच्या वेळापत्रकातील विषयांची संख्या मर्यादित ठेवण्याची गरज नव्याने अधोरेखित झाली. महाराष्ट्र शासनाने या धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वेळोवेळी परिपत्रके काढली. आता प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच खासगी शाळांच्या मुख्याध्यापकांना 'स्कूल बॅग पॉलिसी २०२०' मधील तरतुदींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. हा निर्णय स्वागतार्ह आहे. लहान मुलांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे ही गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या बनली आहे. पालक आणि शाळा दोघांचाही कल हा जास्तीत जास्त पाठ्यपुस्तके, स्वाध्यायपुस्तिका,वर्कबुक्स मुलांच्या दप्तरात कोंबण्याकडे असतो.'अधिक अभ्यास म्हणजे अधिक गुणवत्ता' हा गैरसमज याचे मुख्य कारण. प्रत्यक्षात बालरोगतज्ज्ञ आणि अस्थिविकारतज्ज्ञांच्या मते, वाढत्या वयातील मुलांच्या मणक्यावर आणि खांद्यांवर पडणारा अतिरिक्त भार हा पाठीच्या कण्याच्या नैसर्गिक वाढीवर विपरीत परिणाम करू शकतो.यामुळे पाठदुखी,मानदुखी, खांदे झुकणे, चुकीची शारीरिक ठेवण या समस्या लहान वयातच निर्माण होण्याचा धोका असतो. जड दप्तरामुळे येणारा शारीरिक थकवा हा मुलांच्या शिकण्याच्या उत्साहावर आणि एकाग्रतेवरही परिणाम करतो.मानसिक दुष्परिणामही होतात. शिक्षण ही आनंददायी प्रक्रिया व्हावी,हा नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा मूळ गाभा असताना, प्रत्यक्षात मुलांचे रोजचे अनुभव याच्या उलट असल्याचे चित्र होते. यामुळेच शालेय शिक्षण विभाग आणि प्राथमिक शिक्षण संचालनालयाने याकडे गांभीर्याने ठोस पावले उचलण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी ठोस उपाययोजना सुचवतो. दप्तराच्या वजनाचे नवे प्रमाण वैज्ञानिक अभ्यासांवर आधारित असून ते जागतिक स्तरावरही मान्य केलेले आहे.या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी झाल्यास मुलांच्या शारीरिक आरोग्याचे रक्षण होईलच, शिवाय शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलेल. त्यामुळे हा निर्णय शिक्षण प्रक्रियेला अधिक आनंददायी आणि कृतिप्रधान बनवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल म्हणता येईल.केवळ पाठ्यपुस्तकी ओझे कमी करून न थांबता,या निर्देशांमध्ये दप्तराव्यतिरिक्त उपक्रम राबवण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.सुतारकाम, बागकाम, मातीची भांडी बनवणे, हस्तकला, कृषिविषयक उपक्रम, स्थानिक व्यवसायांची ओळख इत्यादींचा त्यात समावेश आहे. यातून विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळणार असून ती राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुभवाधारित शिक्षणाच्या तत्त्वाशी सुसंगत आहे. क्रीडा, प्रश्नमंजुषा, वाचन-कथाकथन,स्थानिक संस्कृती, परिसर अभ्यास, क्षेत्रभेट, पर्यावरण संवर्धन या उपक्रमांचाही समावेश यात केला आहे.यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल.अशा धोरणांमुळे शिक्षण क्षेत्रात एक समान मापदंड तयार होईल. प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी संचालनालयाने दिलेल्या सूचना व्यवहार्य आणि दूरदृष्टीच्या आहेत.विद्यार्थ्यांना दररोज अनावश्यक पुस्तके, वह्या, कार्यपुस्तिका किंवा इतर शैक्षणिक साहित्य आणण्यास सांगू नये, ही सूचना मूलभूत असूनही आजवर तिचे पालन होत नव्हते.वेळापत्रकानुसार आवश्यक तेवढीच पुस्तके व साहित्य आणण्यासाठी वर्गनिहाय 'बॅग टाईमटेबल' तयार करण्याची सूचनाही प्रभावी उपाय आहे.यामुळे रोज ठरावीक विषयांचीच पुस्तके शाळेत नेली जातील. शक्य असल्यास शाळांनी वर्गनिहाय कपाटे, शेल्फ किंवा लॉकरची व्यवस्था करून पुस्तके शाळेतच ठेवण्याची सुविधा द्यावी. त्यासाठी शाळांना शासनाकडून आवश्यक निधी व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षातून १० दिवस दप्तरविरहित कालावधीत कारागीर,व्यावसायिक आणि कौशल्याधारित व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देणारे उपक्रम राबवल्यास पुस्तकी ज्ञानाबरोबरच जीवनकौशल्येही विकसित होतील. तसेच शाळांमध्ये स्वच्छ व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध असल्यास विद्यार्थ्यांना पाण्याची बाटली आणावी लागणार नाही.या धोरणाच्या अंमलबजावणीवर देखरेखीसाठी अचानक तपासणी करणार असल्याने शाळांना सूचनांचे पालन करण्याबाबत दबाव राहील; अन्यथा असे आदेश कागदावरच राहण्याचा धोका असतो. अनेकदा पालकच अतिरिक्त पुस्तके, खासगी शिकवणी वर्गांचे साहित्य किंवा स्पर्धा परीक्षांची तयारी म्हणून जास्तीचे साहित्य दप्तरात भरतात. त्यामुळे पालकांचे प्रबोधन आवश्यक आहे. प्रत्येक पालकाने मुलाच्या दप्तराचे वजन मुलाच्या वजनाच्या १० टक्क्यांपेक्षा कमी असेल याची काळजी घ्यावयाची आहे. पहिल्या वर्गातील मुलांचे सर्वसाधारण वजन २० किलो तर आठव्या वर्गातील मुलांचे सर्वसाधारण वजन ४२ किलो इतके असते. यानुसार पहिल्या वर्गातील मुलांच्या दप्तराचे वजन २ किलो तर आठव्या वर्गातील मुलांच्या दप्तराचे वजन ४.२ किलोपेक्षा अधिक असू नये.पाठ्यपुस्तक मंडळांनीही पुस्तकांचे वजन कमी करण्यासाठी कमी वजनाचा पण टिकाऊ कागद वापरणे,अनावश्यक पानांची संख्या कमी करणे यासारखे उपाय अंमलात आणावेत. डिजिटल शिक्षण साधनांचा योग्य वापर करूनही काही प्रमाणात हे ओझे कमी करता येऊ शकते. थोडक्यात, दप्तराचे ओझे वाढवण्यापेक्षा अध्ययन-अध्यापनाचे ओझे वाढवण्यासाठी सर्वांनी आपली मानसिकता सकारात्मक करणे हेच शिक्षण आनंददायी कसे करता येईल, या प्रश्नाचे खरे उत्तर आहे.

# शेतकऱ्यांच्या संपूर्ण स्वातंत्र्याचा ध्यास घेणारा शेतकरी योध्दा

**शेतकऱ्याला मदतीचा लाभार्थी बनवायचे, की स्वतःच्या कर्तृत्वावर उभा राहणारा आर्थिक घटक? हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे. शेतकऱ्याच्या हातात अनुदानाचा कटोरा देण्याऐवजी त्याला आपल्या श्रमाचा योग्य मोबदला मिळवून देणे, बाजारपेठेची दारे खुली करणे आणि आपल्या उत्पादनाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देणे, हा विचार युगात्मा शरद जोशी यांनी दशकांपूर्वी मांडला. त्यामुळे त्यांची जयंती ही केवळ स्मरणाचा दिवस न राहता त्यांच्या विचारांच्या आजच्या संदर्भातील उपयुक्ततेचा विचार करण्याचा दिवस ठरतो.**

शेतकरी संघटनेचे प्रणेते असलेल्या शरद जोशी यांनी शेती हा एक आर्थिक व्यवसाय आहे आणि शेतकरी हा त्या व्यवसायातील उद्योजक आहे, ही भूमिका सातत्याने मांडली. त्याच्या उत्पादनाला न्याय्य किंमत आणि व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य दिल्यास शेतकऱ्याला कोणत्याही दया, सवलत किंवा सरकारी कुपेची गरज राहणार नाही, हा त्यांच्या विचारांचा केंद्रबिंदू होता.

**कर्जमाफी नव्हे कर्जमुक्ती**

'संबंध हिंदुस्थानातील शेतकरी मी डोळे मिटण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या संपूर्ण स्वातंत्र्याच ध्यास घेणारा शेतकरी योद्धा कर्जमुक्त झाला पाहिजे, त्याचा ७/१२ कोरा झाला पाहिजे,' ही त्यांची तळमळ होती. मात्र या कर्जमुक्तीमागे केवळ एकदा कर्जमाफी करून थांबण्याचा विचार नव्हता, तर शेतकऱ्याला पुन्हा कर्जच घ्यावे लागू नये, अशी आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याचा त्यांचा आग्रह होता. आज शेतीमधील प्रत्येक निविष्ठेचा खर्च वाढत वाढत आहे. दुसरीकडे शेतीमालाच्या बाजारभावावर शेतकऱ्याचे फारसे नियंत्रण नाही. उत्पादन वाढले की दर कोसळतो आणि दर वाढण्याची शक्यता निर्माण झाली की विविध धोरणात्मक हस्तक्षेपांमुळे बाजारावर परिणाम होतो. निर्यातबंदी, आयात, साठा मर्यादा किंवा अन्य बाजारनियंत्रणे यांचा थेट परिणाम गितकऱ्याच्या उत्पन्नावर होतो. परिणामी, उत्पादन खर्च आाणि बाजारभाव यातील अंतर वाढते. शेतकरी कर्जबाजारी बीत जातो. शेतकरी कर्जबाजारी होण्याचे मूळ कारण त्याची अकार्यक्षमता नसून त्याच्या उत्पादनाला मिळणारा अपुरा बरतावा आहे, हा शरद जोशींचा विचार आजही महत्त्वाचा करतो.

कर्जमाफीने तात्पुरते कर्जाचे ओझे कमी झाले तरी उत्पादन खर्चापेक्षा कमी उत्पन्न मिळण्याची समस्या कायम राहिल्यास पुन्हा तो कर्जाचा डोंगर वाढल्याशिवाय राहत नाही. कर्जाच्या चक्रातून कायमचे बाहेर काढण्यासाठी शेतीमालाला रास्त दर मिळणे हा मूलभूत उपाय आहे.



शेतमालाचा भाव करविताना केवळ बियाणे, खते आणि मजुरीचा खर्च मोजून चालणार नाही. शेतकऱ्याचा स्वतःचा श्रम, कुटुंबातील सदस्यांचे श्रम, जमिनीचे भाडेमूल्य, भांडवलावरील व्याज, सिंचन, यंत्रसामग्रीची झीज, वाहतूक आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याचा खर्च यांचा विचार झाला पाहिजे, शेतीतील जोखीम लक्षात घेऊन शेतकऱ्याला त्याच्या गुंतवणुकीवर योग्य परतावा मिळणे आवश्यक आहे.

**बाजारपेठेचे स्वातंत्र्य**

शरद जोशी यांच्या विचारातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे बाजारपेठेचे स्वातंत्र्य, शेतकऱ्याने आपला माल कुठे विकायचा, कोणाला विकायचा आणि कोणत्या भावाने विकायचा, हे ठरविण्याचा अधिकार त्याच्याकडे असला पाहिजे. देशांतर्गत बाजारपेठेसोबतच निर्यात, थेट विक्री, प्रक्रिया उद्योग, करार शेती आणि आधुनिक व्यापार व्यवस्था शेतकऱ्यांसाठी खुल्या असणे गरजेचे आहे. शेतमालाच्या व्यापारावर अनावश्यक बंधने व मर्यादित बाजारपेठा यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीच्या शक्यता मर्यादित होतात. म्हणूनच बाजारपेठेतील पारदर्शकता, स्पर्धा आणि व्यापाराचे स्वातंत्र्य यांना कृषी धोरणाच्या केंद्रस्थानी आणण्याची गरज आहे.

**तंत्रज्ञान निवडीचे स्वातंत्र्य**

आर्थिक स्वातंत्र्याबरोबरच तंत्रज्ञान निवडीचे स्वातंत्र्यही महत्त्वाचे आहे. जगभरात शेती वेगाने बदलत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ड्रोन, अचूक शेती, आधुनिक सिंचन, जैवतंत्रज्ञान आणि जनुकीय सुधारित बियाणे यांसारख्या तंत्रज्ञानामुळे उत्पादनक्षमता आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर वाढविण्याच्या नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. या तंत्रज्ञानाची माहिती शेतकऱ्यांना मिळण्यासोबतच त्यातील योग्य ते गरजेनुसार निवडण्याचे स्वातंत्र्यही मिळाले पाहिजे. कोणते बियाणे, तंत्रज्ञान किंवा उत्पादन पद्धती वापरायची, याचा निर्णय शेतकरी उपलब्ध शास्त्रीय माहितीच्या आधारे घेऊ शकले पाहिजेत. जीएम बियाण्यांसारख्या तंत्रज्ञानाबाबतही भावनिक प्रचाराऐवजी शास्त्रीय मूल्यमापन महत्त्वाचे आहे. सुरक्षितता, पर्यावरणीय परिणाम, उत्पादनक्षमता आणि आर्थिक व्यवहार्यता यांचे पारदर्शक परीक्षण झाले पाहिजे. सुरक्षित आणि उपयुक्त ठरणाऱ्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा पर्याय शेतकऱ्याला उपलब्ध असला पाहिजे.

**व्यवसाय आधारित ग्रामीण अर्थव्यवस्था**

शेतीतील पिकांचे उर्वरित अवशेष ही समस्या नसून भविष्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा कच्चा माल ठरू शकतात. कापसाच्या पऱ्हाट्या, सोयाबीनचे कुटार, तूर-हरभऱ्याचे अवशेष, गव्हाचे व भाताचे तणस, मक्याचे काड आणि उसाचे पाचट यांचा योग्य प्रक्रिया तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जैवइंधन, बायोगॅस, सेंद्रिय खत, ऊर्जा आणि इतर मूल्यवर्धित उत्पादनांसाठी उपयोग होऊ शकतो. अवशेष जाळण्याऐवजी त्यातून उत्पन्न निर्माण झाले, तर एकाच वेळी पर्यावरण आणि शेतकरी या दोघांचाही फायदा होईल. मात्र या मूल्य साखळीत शेतकरी केवळ कच्चा माल पुरवणारा राहता कामा नये.

शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि गावपातळीवरील उद्योजकांच्या मालकीचे प्रक्रिया उद्योग उभे राहिले पाहिजेत. कच्च्या मालाचा योग्य मोबदला, प्रक्रिया उद्योगातील भागीदारी आणि नफ्यातील वाटा शेतकऱ्याला मिळाला पाहिजे. 'शेतातील वेस्ट ते शेतकऱ्याची वेल्थ' हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रभावी सूत्र बनू शकते.

शेतकऱ्यांना तात्पुरत्या मदतीपेक्षा स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी मोकळे आर्थिक वातावरण पुरवले पाहिजे, हा शरद जोशी यांच्या विचारांचा गाभा होता. त्याच्या उत्पादन, व्यापार, तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि निर्यातीच्या मार्गातील अनावश्यक अडथळे दूर करणे आवश्यक आहे. शेतकरी सक्षम झाला, तर त्याचा परिणाम केवळ शेतापुरता मर्यादित राहणार नाही. ग्रामीण भागात प्रक्रिया उद्योग वाढतील, रोजगार निर्माण होतील, स्थानिक अर्थव्यवस्था गतिमान होईल. ग्रामीण भागातील पैसा ग्रामीण भागातच फिरण्यास मदत होईल.

शेतकऱ्याला दया नको, न्याय हवा. अनुदानावर अवलंबित्व नको, आर्थिक स्वातंत्र्य हवे. आश्वासन नको, तर त्याच्या श्रमाचा आणि भांडवलाचा रास्त मोबदला हवा. शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त केवळ त्यांच्या स्मृतीत रमण्याऐवजी त्यांच्या विचारांचे स्मरण केले पाहिजे. त्याहीपेक्षा त्यांचे विचार शेतीविषयक धोरणांच्या केंद्रस्थानी आणण्याचा संकल्प करणे, हीच त्यांच्या कार्याला खरी आदरांजली ठरेल.

**विलास ताथोड**
राज्य कार्यकारीणी सदस्य,
शेतकरी संघटना, अकोला
मो.७०२०५८५२६१

# टिळकांचा गणपती कुठे हरवला? बापटांचे चुकले तरी काय?

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो आजच्या राजकीय शक्तिप्रदर्शनासाठी, डीजेच्या कानठळ्या बसवणाऱ्या आवाजासाठी किंवा नेत्यांचे कटआउट उभे करण्यासाठी नव्हे. त्या काळात देश गुलाम होता. समाज विखुरलेला होता. ब्रिटिश सत्तेविरुद्ध सामान्य माणसाला एकत्र आणण्यासाठी टिळकांनी गणेशोत्सवाला सामाजिक आणि राष्ट्रीय जागृतीचे व्यासपीठ बनवले. व्याख्याने झाली, पोवाडे झाले, कीर्तने झाली, समाजप्रबोधन झाले आणि लोकांच्या मनात स्वराज्याची ठिणगी पेटली. आज मात्र त्या ठिणगीचे रूपांतर आपण कशात केले? डीजेचा आवाज वाढला, मंडप वाढले, नेत्यांचे फोटो वाढले; पण विचार कुठे वाढला? आज गणेशोत्सवाच्या नावाखाली भक्तीपेक्षा दिखावा, संस्कृतीपेक्षा शक्तिप्रदर्शन आणि समाजप्रबोधनापेक्षा राजकीय पोळी भाजण्याची स्पर्धा दिसत असेल, तर टिळकांचा आत्मा नक्कीच अस्वस्थ होत असेल.

पुण्यात विद्यानंद बापट यांनी ध्वनिप्रदूषणाचा प्रश्न उपस्थित केला. त्यांच्या भूमिकेशी सहमत असणे बंधनकारक नाही. त्यांच्या वक्तव्यावर टीका करा, प्रतिवाद करा, त्यांना चुकीचे ठरवा; पण हात उचलणे हा कोणताही लोकशाही मार्ग नाही. म्हणून सरळ प्रश्न विचारायलाच हवा,बापटांचे चुकले तरी काय? त्यांनी गणपती बंद करा असे म्हटले का? त्यांनी हिंदू धर्म सोडा असे म्हटले का? त्यांनी भक्तीला विरोध केला का? की त्यांनी एवढेच विचारले की उत्सव साजरा करताना इतर नागरिकांच्या अधिकारांचाही विचार करा? जर हा प्रश्न विचारणेच धर्मद्रोह ठरत असेल, तर मग टिळकांनी निर्माण केलेल्या विचारांच्या परंपरेचे आपण काय केले? टिळकांचा गणपती समाजाला प्रश्न विचारायला शिकवत होता; आज प्रश्न विचारणाऱ्यालाच गप्प करण्याची वेळ आली असेल, तर हा टिळकांचा वारसा नाही, ही आपल्या विवेकाची हार आहे.

गणपती बुद्धीची देवता आहे, पण गणपतीच्या उत्सवातच बुद्धीला कुलूप लावायचे का? गणपती विघ्नहर्ता आहे, मग त्याच्याच नावाखाली रुग्णांना, वृद्धांना, विद्यार्थ्यांना, लहान मुलांना आणि सामान्य नागरिकांना त्रास देणे कोणत्या भक्तीत बसते? भक्ती सिद्ध करण्यासाठी डेसिबलची स्पर्धा करावी लागते का? गणपतीला कानठळ्या बसवणारा आवाज नको;त्याला स्वच्छ मन आणि विवेक हवा. दुर्दैवाने आज काही ठिकाणी गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव कमी आणि राजकीय ताकद दाखवण्याचे व्यासपीठ अधिक होत चालल्याचे चित्र दिसते.मंडपावर नेत्यांचे फोटो, स्वागत कमानी, राजकीय जाहिराती, सत्कार, शक्तिप्रदर्शन आणि गटबाजी हे सगळे पाहिल्यावर प्रश्न पडतो, हा गणपतीचा उत्सव आहे की राजकीय उपस्थितीची जाहिरात? सर्व गणेश मंडळे किंवा सर्व राजकीय कार्यकर्ते चुकीचे आहेत, असे म्हणणे अन्यायकारक ठरेल.



असंख्य मंडळे आजही रक्तदान, आरोग्य शिबिरे, शैक्षणिक मदत आणि सामाजिक उपक्रम करतात. पण जिथे गणपतीच्या नावापेक्षा राजकीय स्वार्थ मोठा होतो, तिथे प्रश्न विचारायलाच हवा.कारण राजकारणाला भावनिक गर्दी हवी असते; समाजाला मात्र जागृत नागरिक हवे असतात. 'तुमच्या श्रद्धेवर हल्ला झाला' असे सांगून वातावरण पेटवणे सोपे आहे; पण 'तुमची श्रद्धा जपा आणि दुसऱ्याच्या अधिकाराचाही आदर करा' असे सांगण्यासाठी प्रामाणिकपणा आणि विवेक लागतो.भावना भडकवणे सोपे; समाज घडवणे कठीण! म्हणून गणेशोत्सवाच्या नावावर कोणाची राजकीय पोळी भाजली जातेय, कोणाला त्यातून राजकीय फायदा होतोय आणि कोण श्रद्धेच्या नावावर गर्दीला भावनिक बनवत आहे,हे नागरिकांनी विचारलेच पाहिजे. कारण गणपती कोणत्याही पक्षाचा नाही. कोणत्याही नेत्याची मालमत्ता नाही. कोणत्याही मंडळाचा खासगी हक्क नाही. गणपती हा समाजाचा आहे.

टिळकांनी गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणले. आज त्याच उत्सवाच्या माध्यमातून जर समाजात गटबाजी,राजकीय ध्रुवीकरण आणि शक्तिप्रदर्शन वाढत असेल, तर हा टिळकांच्या विचारांचा अपमान नाही का? टिळकांनी ब्रिटिश सत्तेला प्रश्न विचारण्यासाठी समाजाला उभे केले. आज आपण स्वतःच्या समाजातील प्रश्न विचारणाऱ्यालाच शत्रू समजत असू, तर आपल्याला टिळकांचे नाव घेण्याचा नैतिक अधिकार तरी आहे का? मतभेद असतील तर चर्चा करा. विरोध असेल तर प्रतिवाद करा. चुकीचे वाटत असेल तर कायदेशीर मार्गाने जा.पण प्रश्नाला उत्तर मारहाणीने देणाऱ्यांनी आधी स्वतःच्या विचारांची उंची तपासावी. एखाद्याचा आवाज बंद करून सत्य बंद होत नाही; उलट तो प्रश्न आणखी मोठा होतो. आज गरज आहे ती गणेशोत्सवाला पुन्हा टिळकांच्या विचारांकडे नेण्याची. मंडप मोठा करण्यापेक्षा विचार मोठा करा. मिरवणूक मोठी करण्यापेक्षा समाज मोठा करा. डीजेचा आवाज वाढवण्यापेक्षा जनजागृतीचा आवाज वाढवा. नेत्यांचे कटआउट उंच करण्यापेक्षा टिळकांचा विचार उंच करा. कारण गणपतीच्या नावावर राजकीय पोळी भाजणाऱ्यांना आता समाजाने प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. बापटांचा मुद्दा केवळ बापटांचा नाही; तो प्रत्येक नागरिकाच्या अधिकाराचा प्रश्न आहे.

आज बापटांना प्रश्न विचारल्यामुळे त्रास होत असेल, उद्या तुमच्या प्रश्नावरही कोणीतरी हात उचलू शकतो. म्हणून आजच ठरवा.लोकशाहीत प्रश्न विचारायचा की गर्दीच्या दबावाखाली गप्प बसायचे? गणपतीसमोर हात जोडणे सोपे आहे; पण गणपतीने दिलेली बुद्धी वापरणे कठीण आहे. म्हणून यंदा आरतीसोबत एक प्रश्नही विचारूया..टिळकांनी गणपती समाजाला जागवण्यासाठी आणला होता; आपण त्याला समाजाला भडकवण्यासाठी तर वापरत नाही ना? टिळकांनी लोकांना एकत्र केले; आपण त्यांना राजकीय गटांत विभागतो आहे का? टिळकांनी विचार दिला; आपण फक्त आवाज देतोय का? उत्तर द्यावे लागेल. कारण इतिहास माफ करत नाही आणि समाज कायम गप्प बसत नाही. गणपती बाप्पा मोरया! पण बाप्पाच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना विवेकाचा आरसा दाखवूया!

**ॲड.धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# नियमांची सर्वसमावेशकता..

पुण्यातील गणेशोत्सवात होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनीप्रदूषणाविरुद्ध आणि 'डीजे'च्या अवाजवी वापराविरुद्ध सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांनी घेतलेली भूमिका ही सामान्य नागरिक, बालके आणि ज्येष्ठांच्या आरोग्याच्या दृष्टीने रास्त आहे. अवाजवी आवाजामुळे नागरिकांना होणारा त्रास ही एक निर्विवाद वस्तुस्थिती आहे. परंतु, या भूमिकेचा विरोध करताना एका तरुणाने बापट यांच्यावर हल्ला करून त्यांना मारहाण केली, हा प्रकार सर्वथा निषेधार्ह आहे. लोकशाहीत आणि सुसंस्कृत समाजात विचारांचा विरोध हा विचारांनीच व्हायला हवा; हिंसेला कसलेही समर्थन असू शकत नाही.

मात्र, या सर्व प्रकरणात बापट यांची किंवा एकूणच इतर सामाजिक कार्यकर्त्यांची भूमिका अधिक सर्वसमावेशक आणि निपक्षपाती असणे आवश्यक होते. गणेशोत्सवातील मिरवणुकांचा कालावधी, पेठ भागातील वाहतुकीची कोंडी किंवा रस्त्यावरील मंडप यावर आक्षेप घेताना उत्सवाच्या सांस्कृतिक परंपरेचाही समतोल विचार व्हायला हवा. उद्या दगडूशेठ गणपतीसमोरील शिस्तबद्ध अथर्वशीर्ष पठणासारख्या उपक्रमांवरही आक्षेप घेतला जाऊ शकतो, ही भीती अनाठायी नाही.

येथे मुख्य मुद्दा असा की, अशा मागण्या किंवा नियम हे केवळ एका विशिष्ट धर्मापुरते किंवा सणापुरते मर्यादित का असावेत? ध्वनीप्रदूषण किंवा सार्वजनिक जागेचा वापर याविषयीचे नियम हे सरसकट सर्व धर्मीयांना समान रीतीने लागू झाले पाहिजेत. मग ते मशिदींवरील भोंगे असोत, इतर धर्मांच्या प्रार्थनासभा असोत की राजकीय रॅली असोत नागरिकांच्या आरोग्याला आणि शांततेला होणारा त्रास हा सर्वांसाठी समानच असतो. नियमांच्या अंमलबजावणीत जेव्हा निवडकपणा दिसतो, तेव्हा बहुसंख्य समाजात अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे.त्यामुळे, गणेशोत्सवाचा पारंपरिक उत्साह आणि भव्यता टिकवून डीजेसारख्या घातक अतिरेकाला जरूर आळा बसला पाहिजे; पण त्याच वेळी प्रशासनाने आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी 'नियम सर्वांसाठी समान' हे तत्त्व कठोरपणे अमलात आणले पाहिजे, हीच आजच्या काळाची गरज आहे.

**अविनाश देशपांडे**

शनिवार, दि. ५ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# एसटीच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' दाखल!

## पाच अत्याधुनिक बस प्रवाशांच्या सुरक्षित, आरामदायी प्रवास

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ०४ : यवतमाळ एसटी महामंडळाच्या आगाराच्या ताफ्यात पाच नवीन 'राजमाता जिजाऊ' बस दाखल झाल्याने जिल्ह्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला नवे बळ मिळाले आहे. पालकमंत्री संजय राठोड आणि आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या हस्ते शुक्रवारी या बसचे लोकार्पण करण्यात आले. फित कापून लोकार्पण केल्यानंतर पालकमंत्री संजय राठोड यांनी नवीन बसची पाहणी केली.**



बसमध्ये प्रवाशांसाठी उपलब्ध असलेल्या विविध सुविधा, सुरक्षिततेच्या उपाययोजना तसेच वाहतूक व्यवस्थेबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यवतमाळ आगाराच्या ताफ्यात नव्या बस दाखल झाल्याने जुन्या बसवरील वाहतुकीचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे. त्याचबरोबर ग्रामीण तसेच शहरातील प्रवाशांना अधिक सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. विशेषतः एसटीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या विद्यार्थी, नोकरदार, महिला आणि ग्रामीण भागातील प्रवाशांसाठी नव्या बस महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. एसटीच्या ताफ्यात नवीन बस वाढविण्याबरोबरच त्यांचा नियमित देखभाल-दुरुस्तीचा दर्जा कायम ठेवणे, वेळापत्रकानुसार फेऱ्या सुरळीत चालविणे आणि प्रवाशांना वेळेत सेवा उपलब्ध करून देणे, हीदेखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे नव्या बसच्या लोकार्पणानंतर प्रवाशांना प्रत्यक्षात अधिक चांगली सेवा कितपत मिळते, याकडे आता यवतमाळकरांचे लक्ष लागले आहे.

# दोन ट्रॅक्टर जप्ती नंतर रेती तस्करीला लगाम लागणार का?

## दंडात्मक कारवाई नेमकी कुठपर्यंत पोहोचली? महागाव तालुक्यातील इतर रेती तस्करांवर कारवाईची प्रतीक्षा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव , दि. ०४ :** तालुक्यातील हिवरा आणि जनुना येथे अवैध रेती वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून महसूल विभागाने कारवाईचा धडाका सुरू केल्याचे चित्र निर्माण झाले असले, तरी या दोन कारवायानंतर पुढे काय? असा सवाल आता महागाव तालुक्यातील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दोन्ही ट्रॅक्टर जप्त करून प्रत्येकी एक ब्रास रेतीचा पंचनामा करण्यात आला.

मात्र, संबंधित वाहनांवर प्रस्तावित करण्यात आलेली दंडात्मक कारवाई प्रत्यक्षात किती झाली, दंडाची रक्कम किती आकारण्यात आली आणि ती वसूल झाली का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. प्रशिक्षणार्थी उपविभागीय अधिकारी ओमकार एकाळे व तहसीलदार अभय मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल पथकाने हिवरा व जनुना येथे कारवाई केली. या कारवाईत हिवरा येथील



ट्रॅक्टर समाधान धोत्रे, तर जनुना येथील ट्रॅक्टर रोहित नरवाडे यांच्या मालकीचे असल्याचे पंचनाम्यात नमूद करण्यात आले आहे. दोन्ही वाहनांमध्ये प्रत्येकी एक ब्रास रेती आढळून आल्याने ती जप्त करण्यात आली. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकी प्रकरणी संबंधित वाहनांवर दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. मात्र, प्रस्तावित कारवाई प्रत्यक्ष दंडवसुलीत कधी रूपांतरित होणार? संबंधितांकडून किती रक्कम वसूल होणार? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. केवळ ट्रॅक्टर पकडणे, रेती जप्त करणे आणि पंचनामा करण्यापुरतीच कारवाई मर्यादित राहणार नाही ना, असा प्रश्नही उपस्थित होत आहे. महागाव तालुक्यात विविध भागांतून अवैधरीत्या रेतीचा उपसा आणि ट्रॅक्टर द्वारे वाहतूक होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. त्यामुळे हिवरा आणि जनुना येथील दोन ट्रॅक्टर वर कारवाई करून महसूल विभागाची मोहीम संपली का? की तालुक्यात सुरू असलेल्या इतर अवैध रेती वाहतुकीवरही सातत्याने कारवाई केली जाणार, हा खरा प्रश्न आहे. महसूल विभागाने यापुढे तालुक्यात तपासणी व कारवाईची मोहीम तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आता जप्त केलेल्या दोन ट्रॅक्टरवर नेमकी किती दंडात्मक कारवाई झाली आणि त्यानंतर आणखी किती रेती तस्करांवर कारवाई करण्यात आली, याची माहिती प्रशासनाने जाहीर करावी, अशी मागणी होत आहे.

**दोन ट्रॅक्टर जप्तीने कारवाईचा केवळ श्रीगणेश झाल आहे की एवढ्यावरच प्रशासन थांबणार,महागाव तालुक्यातील रेती तस्करीला खरोखर आळा घालणार का? व कारवाईचा धडाका सातत्याने सुरू राहणार का? हा प्रश्न सध्या नागरिकांच्या चर्चेचा विषय ठरत आहे.**

## थोडक्यात

### बांधकाम कामगारांच्या मुलांची एमबीबीएससाठी भरारी!

**यवतमाळ :** तालुक्यातील पारवा येथील होतकरू विद्यार्थी शुभम



किसन जाधव यांनी NEET च्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसअभ्यासक्रमासठी प्रवेश मिळवला आहे.शुभम यांचे वडील किसन जाधव हे बांधकाम करणारे रोजमजूर असून, कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ते दिवसभर कष्ट करतात. आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही त्यांनी मुलाच्या शिक्षणाला नेहमीच प्रोत्साहन दिले. वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवत शुभम यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार केले.नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएससाठी प्रवेश मिळाल्याने जाधव कुटुंबीय, नातेवाईक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच पारवा परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. शुभम किसन जाधव यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी शुभम यांचे यश प्रेरणादायी ठरले आहे.

### संघर्षाला मिळाली निष्ठेची पावती अनिकेत आडे युवासेना जिल्हा प्रमुखपदी

**यवतमाळ :** सामान्य कुटुंबातून पुढे येत शिवसेना आणि युवासेनेसाठी



सातत्याने संघर्ष करणारे युवा कार्यकर्ते अनिकेत आडे यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या युवासेना जिल्हाप्रमुख, यवतमाळ पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाच्या विचारांशी कायम निष्ठावंत राहून केलेल्या कार्याची ही पावती मानली जात असून, नियुक्तीनंतर आडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नियुक्तीची अधिकृत माहिती शिवसेनेचे मुखपत्र 'सामना' मधून प्रसिद्ध झाली आहे. पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या विचारांना पुढे नेत युवक व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी तसेच संघटना अधिक मजबूत करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करणार असल्याचे अनिकेत आडे यांनी सांगितले. राजेंद्र गायकवाड, जिल्हाप्रमुख किशोर इंगळे आणि जिल्हाप्रमुख प्रविण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून नेतृत्वाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरवू, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. सत्ता हातात नसतानाही निष्ठावंतांची साथ कायम या भूमिकेतून ठाकरे गटाकडे पाहिले जात आहे. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून अनेक जुने शिवसैनिक आजही पक्षाशी जोडलेले आहेत. सत्तेपासून दूर असतानाही पक्षात नव्या कार्यकर्त्यांची जुळवाजुळव आणि पदाधिकारी होण्यासाठी तरुणांमध्ये उत्साह दिसून येत असल्याचा दावा शिवसैनिकाकडून केला जात आहे. दरम्यान, आडे यांच्या नियुक्तीमुळे यवतमाळ जिल्ह्यात युवासेनेला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, आगामी काळात युवकांच्या प्रश्नांना आक्रमकपणे वाचा फोडण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असणार आहे.

### नवाबपूर येथील महावितरणचे ३३ केव्हीचे उपकेंद्र सुरु

**यवतमाळ :** नेर तालुक्यातील नवाबपूर येथील महावितरणचे ३३/११ केव्हीचे उपकेंद्र कार्यान्वित झाले असून गुरुवारी पालकमंत्री संजय राठोड यांच्या हस्ते या उपकेंद्राचे उद्घाटन करण्यात आले. पालकमंत्र्यांच्या पुढाकाराने जिल्हा वार्षिक योजनेतून मिळालेल्या पाच कोटींच्या निधीतून उभारण्यात आलेल्या या उपकेंद्रामुळे परिसरातील सुमारे ६०० कृषी वीज ग्राहकांना लाभ मिळणार आहे. यापूर्वी बानगाव, चिचगाव, फत्तेपूर व उदापूर या गावांमधील कृषी पंपांची संख्या आणि विद्युत भार वाढल्यामुळे शिरजगाव उपकेंद्रावर मोठ्या प्रमाणात भार निर्माण झाला होता. परिणामी या गावांमधील कृषी ग्राहकांना अपेक्षित व योग्य दाबाचा वीजपुरवठा मिळण्यात अडचणी निर्माण होत होत्या. नवाबपूर उपकेंद्र कार्यान्वित झाल्यामुळे शिरजगाव उपकेंद्रावरील अतिरिक्त भार कमी होऊन बानगाव, चिचगाव, फत्तेपूर व उदापूर या गावांना अधिक स्थिर व योग्य दाबाचा वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे. याचा थेट लाभ या परिसरातील सुमारे ६०० कृषी वीज ग्राहकांना मिळणार आहे.


# प्रभाग क्र. १७ मधील नाल्या जनावरांसाठी ठरताहेत धोकादायक

## चार गायी नालीत पडून जखमी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. ०४ :** राळेगाव शहरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये नगरपंचायतीकडून मागील वर्षी बांधण्यात आलेल्या नाल्या सध्या जनावरांसाठी धोकादायक ठरत असल्याची तक्रार परिसरातील नागरिकांनी केली आहे. मागील दोन ते चार महिन्यांच्या कालावधीत तब्बल चार गायी या नाल्यांमध्ये पडून जखमी झाल्याची माहिती नागरिकांनी दिली.

या नाल्यांची खोली अधिक असल्याने एखादे जनावर नालीत पडल्यास त्याला स्वतःहून बाहेर येणे कठीण होते. त्यामुळे परिसरातील नागरिकांना एकत्र येऊन जनावरांना नालीतून बाहेर काढावे लागत असल्याचे सांगण्यात आले. नाल्यांचे बांधकाम करताना आवश्यक चढ-उतार व पाण्याच्या प्रवाहाचा योग्य विचार करण्यात आला



नसल्याचे सांगण्यात येत आहे. दोडेवार-तेलंगे यांच्या घरासमोरील नालीचे कामही थातूरमातूर पद्धतीने झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दरम्यान, जनावरांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरत असलेल्या नाल्यांची नगरपंचायतीने तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, तसेच ज्या ठिकाणी नसल्याची नागरिकांची ओरड आहे. माजी नगराध्यक्ष भंगारे यांच्या घरासमोरून सुभाष घरवाल यांच्या घरापर्यंत करण्यात आलेल्या नालीच्या बांधकामाबाबतही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी नाल्यांचे चढ-उतार व्यवस्थित नसल्याने पाण्याचा निचरा होत नाल्यांमध्ये जनावरे पडण्याची शक्यता आहे, त्या ठिकाणी रपटे अथवा अन्य सुरक्षित व्यवस्था करावी, अशी मागणी प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांनी केली आहे. नगरपंचायतीने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन नाल्यांच्या बांधकामाची पाहणी करावी.

# गरजू विद्यार्थ्यांना पुस्तके, 'बेटी पढाव, भविष्य बचाव' ज्ञानज्योत महाराष्ट्रभर

## शबाना खान यांच्या संकल्पनेतून शेकडो विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. 04 :**आर्थिक परिस्थितीमुळे गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला खीळ बसू नये, या उद्देशाने सत्यानिर्मिती महिला मंडळाने उभारलेला 'बेटी पढाव, भविष्य बचाव' हा उपक्रम आज शेकडो विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरत आहे. स्वातंत्र्य दिन सप्ताह आणि पैगंबर मोहम्मद जयंतीचे औचित्य साधून मंडळाच्या वतीने गरजू व गुणवंत विद्यार्थी-विद्यार्थिनींना मोफत पुस्तक संच व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा शबाना खान यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम गेल्या १५ वर्षांपासून अविरतपणे सुरू आहे. विशेषतः नववी व दहावीच्या



विद्यार्थ्यांना शासनाकडून उपलब्ध न होणारे पुस्तक संच व आवश्यक शैक्षणिक साहित्य मंडळाकडून विनामूल्य दिले जाते. आतापर्यंत शेकडो विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ झाला असून, अनेक विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत यश मिळविले आहे. उमरखेडमधून सुरू झालेल्या या अभियानाचा विस्तार आता महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांपर्यंत झाला आहे. मंडळाच्या शाखांमार्फत गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक मदत पोहोचविली जाते. 'मुलींनी शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन उच्च शिक्षण घेत स्वावलंबी व्हावे,' असे आवाहन शबाना खान यांनी केले. शिक्षणासोबतच मंडळ महिला सक्षमीकरण, समुपदेशन, रोजगार, न्यायिक सहाय्य व शिवणकला प्रशिक्षणाच्या माध्यमातूनही कार्यरत आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा जयश्री संतोष जैन, तर उद्घाटक म्हणून उपाध्यक्ष तथा गटनेते नितीन माहेश्वरी उपस्थित होते. यावेळी डॉ. वंदना मर्सुळकर, सविता भागवत, सविता पवार, रेहाना सिद्दी, तबस्सुम सय्यदा, महेजबिन साजिद, रेहाना दादू, फर्झाना शेख यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# खरगे यांच्या सभास्थळाच्या कथित 'शुद्धीकरणा'चा काँग्रेसकडून निषेध

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ०४ :** उत्तराखंडातील हळद्वानी येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या सभेनंतर सभास्थळाचे कथितरीत्या 'शुद्धीकरण' करण्यात आल्याच्या घटनेचा पांढरकवडा काँग्रेसच्या वतीने निषेध करण्यात आला.

यांप्रकरणी निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन गुरुवारी, ३ सप्टेंबर रोजी उपविभागीय अधिकारी, पांढरकवडा यांना देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक कार्यक्रमानंतर एखाद्या व्यक्तीच्या उपस्थितीमुळे सभास्थळाचे 'शुद्धीकरण' करण्याचा प्रकार हा सामाजिक भेदभावाची मानसिकता दर्शविणारा असून, भारतीय संविधानातील समानता,




सामाजिक न्याय, बंधुता व मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांच्या विरोधात आहे. अशा घटनांमुळे समाजात गैरसमज व सामाजिक तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी करण्यात आली. सदर घटनेमागील व्यक्ती, आयोजक व संबंधित घटकांची भूमिका तपासावी, चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर प्रचलित कायद्यानुसार योग्य ती कारवाई करावी, तसेच भविष्यात सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रेमदास राठोड, ॲड. वासिम अहेमद, डॉ. भावराव कावडे, झिया शेख, अमर भाऊ पाटील, अनिल भाऊ किनाके, अनिस पोसवाल, संतोष राऊत, मनोज भोयर, इक्रम अली यांच्यासह निलेश उंबरे, सोनू मेश्राम, करीम मामू, खुशाल शेंडे, सुनील मोहरले, सुरज जयस्वाल, विजय निकोडे, दत्तात्रय ठाकरे, सुभान जाटू, रहीम शेख, श्रीनिवास रेकुलवार तसेच काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# घाटंजीत डीजेच्या दणदणाटाला 'ब्रेक' लागणार कधी?

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. ०४ :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कर्णकर्कश डीजेच्या आवाजाला आळा घालण्याचे आवाहन घाटंजी पोलिसांनी केले असले, तरी ही कारवाई केवळ शहरापुरतीच मर्यादित राहणार का, असा सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. शहरात डीजेला ब्रेक आणि ग्रामीण भागात मात्र मोकळे रान, अशी परिस्थिती पुन्हा निर्माण होऊ नये, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

१ सप्टेंबर रोजी घाटंजी पोलीस ठाण्यात झालेल्या शांतता समितीच्या बैठकीत ठाणेदार तथा पोलीस निरीक्षक केशव ठाकरे यांनी गणेश मंडळांना कर्णकर्कश डीजे टाळण्याचे आवाहन केले. पारंपरिक वाद्यांचा वापर करीत उत्सव शांततेत व सामाजिक सलोखा राखून साजरा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. पोलिसांची ही भूमिका स्वागतार्ह असली,



**घाटंजी पोलिसांची आता खरी कसोटी!**

**शहरात कारवाई आणि ग्रामीण भागात दुर्लक्ष, अशी दुहेरी भूमिका नको. संपूर्ण पोलीस हद्दीत ध्वनीप्रदूषणाच्या नियमांची समान अंमलबजावणी करून नागरिकांना शांततेचा समान अधिकार द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.**

तरी तिची खरी परीक्षा प्रत्यक्ष कारवाईत होणार आहे. शहराबरोबरच ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये उत्सव, मिरवणुका आणि विविध कार्यक्रमांत मोठ्या आवाजात डीजे वाजत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात आहेत. ध्वनीप्रदूषणाचा फटका वृद्ध, लहान मुले, विद्यार्थी तसेच आजारी नागरिकांना बसतो. डीजेच्या तालावर होणाऱ्या बेभान नाचगाण्यातून अनेकदा गटागटांत वाद निर्माण होऊन हाणामारीपर्यंत प्रकरणे पोहोचतात. त्यामुळे केवळ बैठका आणि सूचना न देता नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर शहरासह ग्रामीण भागातही समान निकषाने कारवाई करण्याची मागणी होत आहे. घाटंजी पोलिसांचा 'डीजे ब्रेक' केवळ शहरापुरता राहणार की गावागावातील कर्णकर्कश आवाजावरही कारवाईचा हातोडा पडणार? याचे उत्तर आगामी उत्सवकाळातील पोलिसांच्या भूमिकेतून स्पष्ट होणार आहे.

# हल्दीघाटी येथे झालेल्या घटनेचा काँग्रेसकडून निषेध.!

## घटनेची निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ०४ :**अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरोधात हल्दीघाटी येथे घडलेल्या कथित घटनेचा पुसद शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला.

देशातील प्रमुख राजकीय पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या मल्लिकार्जुन खर्गे यांच्याबाबत घडलेली ही घटना अत्यंत गंभीर असून, अशा प्रकारच्या घटना लोकशाहीच्या मूल्यांना बाधा आणणाऱ्या आहेत. या संपूर्ण प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व



पारदर्शक चौकशी करण्यात यावी, तसेच घटनेला जबाबदार असलेल्या संबंधित व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक राजकीय नेत्याला सन्मानाने व सुरक्षित वातावरणात आपले विचार मांडण्याचा अधिकार आहे. राजकीय मतभेद असले तरी हिंसक किंवा अनुचित प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा देता कामा नये. प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पुसद शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली. यावेळी..सय्यद इस्तीयाक, झिया शेख,ॲड.प्रभाकर विघ्ने,अभिलाष खैरमोडे,संजय कान्हेड, गाझी उसामा, शिवसेनेचे विजय बाबर,फिरोज खान, बाबाराव वाघमारे, डॉ.मोहसीन,प्रकाश नेमयते,रवी कांबळे यांच्या स्वाक्षरी आहे.

# ३५ दिवसांचा पावसाचा खंड पिके करपली, शेतकरी हवालदिल!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**दारव्हा, दि. ०४ :** दारव्हा तालुक्यासह यवतमाळ जिल्ह्यात गेल्या ३० ते ३५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. ऐन वाढीच्या तसेच शेंगा-पात्या लागण्याच्या अवस्थेत पाऊस गायब झाल्याने कापूस व सोयाबीनची उभी पिके करपून जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी, अशी मागणी 'शेतकरी चळवळ दारव्हा'च्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात तहसीलदारांना प्रशासकीय निवेदन देण्यात आले. चालू खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांना दुबार पेरणीचा फटका बसला. त्यानंतर आता सलग ३५ दिवसांहून अधिक पावसाचा खंड पडल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे.



शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी किमान १ लाख रुपयांची थेट आर्थिक मदत, दुबार पेरणीचा खर्च, तसेच पीकविमा नियमांनुसार २१ दिवसांपेक्षा अधिक पावसाचा खंड पडल्यामुळे मिळणारी २५ टक्के अग्रिम पीकविमा रक्कम तातडीने खात्यावर जमा करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. प्रशासनाने तातडीने पिकांचे पंचनामे न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला. निवेदनावेळी संयोजक ईश्वर राठोड, रणजित झोंबाडे, विशाल चव्हाण, विनोद जाधव, लाला पांडे, भिमराव राठोड, गजानन जाधव यांच्यासह शेतकरी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# गंभीर गुन्ह्यातील आरोपी पोलिसांना तुरी देऊन फरार..!

## शहरात सर्वत्र खळबळ,शोध मोहीम सुरू!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. ०४ :** शहरात आज एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी हा पोलिसांना हुलकावणी देऊन पोलिसांच्या तावडीतून पळून गेला असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

यामध्ये मिळालेल्या माहितीनुसार दिनांक २ सप्टेंबर २०२६ रोजी पुसद शहरातील वसंत नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये फिर्यादी रवि हरिभाऊ वाघमारे रा सुभाष वॉर्ड पुसद यांच्यावर दोन इसमानी दुचाकी वाहनावर येऊन अचानक चाकुहल्ला करून आरोपी पसार झाले होते. यां गंभीर घटनेनंतर फिर्यादी रवि वाघमारे यांनी सदर घटनेची फिर्याद ही पोलीस स्टेशन वसंत नगर पुसद येथे दिली व त्यावरून आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन वसंत नगर येथे गंभीर गुन्ह्यांची नोंद करण्यात आली.

त्यानंतर सदर गुन्ह्यातील दोन्ही आरोपीना पोलिसांनी अटक केली व त्याची वैद्यकीय तपासणीकरिता आरोपीला उपजिल्हा रुग्णालय पुसद येथे आज दिनांक ४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी वा १२:३० ते १ वाजताचे सुमारास नेण्यात आले त्यावेळी यातील आरोपी नामे हजरत बिलाल शेख मुसा हा आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पोलिसांच्या तावडीतून पळून गेला. सदर आरोपी हा पोलिसांच्या तावडीतून पळून गेल्याने व शहरात एकच खळबळ उडाली. त्यानंतर सदर आरोपीचा शोध सुरु करण्यात आला असुन लवकरच आरोपीला जेरबंद करण्यात येईल असे सांगण्यात आले आहे. एका गंभीर गुन्ह्यातील आरोपी हा पोलिसांना हुलकावणी देऊन त्यांच्या तावडीतून पळून गेल्याने पोलिसांची नामुष्की झाली आहे. आता पोलिसांना त्या आरोपीला पकडण्यासाठी अथक परिश्रम करावे लागल या प्रकरणामुळे पोलिसांच्या हलगर्जीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होतो?असे सर्वत्र नागरिकाकडून चर्चाले उधान आले आहे.

# विद्यापीठ निवडणुका व विद्यार्थी हिताचे निर्णय घ्या

## विद्यापीठ विकास मंच अमरावतीची मागणी

**अमरावती/का.प्र.**

विद्यापीठ कायदा २०१६ नुसार प्राधिकरण निवडणुका आणि विद्यार्थी हिताचे प्रलंबित प्रश्न निकाली काढा, अशी मागणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पुरस्कृत विद्यापीठ विकास मंच अमरावतीच्या माध्यमातून कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्याकडे गुरुवारी लेखी निवेदन देऊन करण्यात आली आहे.

विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार विद्यापीठ प्राधिकरणाच्या निवडणुका ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पूर्ण करून सर्व प्राधिकरणाचे गठन करा, विद्यार्थी परिषद निवडणूक तात्काळ सुरू करा, अभ्यास मंडळामध्ये शेवटच्या वर्षातील विद्यापीठ स्तरावरील गुणवत्ता यादीतील विद्यार्थी हा निमंत्रित सदस्य असतो, त्याची प्रभावी अंमलबजावणी करा. विद्यापीठ परीक्षा पद्धती अधिक पारदर्शक व गतिमान होण्यासाठी सर्व विषयांचे निकाल ४५ दिवसाच्या आत लावणे बंधनकारक करा, विद्यापीठ क्षेत्रातल्या प्रत्येक जिल्ह्यात विद्यापीठ उपकेंद्र सक्षमपणे कार्यान्वित करा,महाविद्यालय व वर्गातील विद्यार्थी अनुपस्थिती बाबत सर्व घटकांशी चर्चा करून योग्य उपाय योजना करा, विद्यापीठातील प्रभारी संवैधानिक अधिकारी व प्राध्यापकांच्या रिक्त जागा तात्काळ भरा.'वंदे मातरम-१५०','संत शिरोमणी रविदास ६५० जयंती उत्सव','श्री गुरु तेगबहादूर बलिदान -३५० वर्षे', 'भगवान बिरसा मुंडा जयंती १५० वर्ष',याला अनुसरुन विद्यापीठ व जिल्हास्तरावरील युवक महोत्सव,राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात उपक्रमांची अंमलबजावणी करा, युवक महोत्सव, क्रीडा महोत्सव, आविष्कार, वार्षिक अंक,एनएसएस शुल्क विद्यार्थ्यांकडून घेतले जाते पण,७० टक्के महाविद्यालये यात सहभागी होत नाहीत. अशा महाविद्यालयांवर कारवाई करून सदर शुल्क विद्यार्थ्यांना परत करावेत व महाविद्यालयांना सहभागी होणे बंधनकारक करावे. विद्यापीठात प्लेसमेंट सेल, रोजगार मेळावे, विद्यार्थी व महिला तक्रार निवारण समिती, स्क्रीन टाईम टु ॲक्टिव्हिटी टाईम, विद्यार्थी भवन, अशा प्रकारचे विद्यार्थी सहभागाचे विषय प्राधान्याने राबविले जावे. विद्यापीठ गुणवत्ता वाढ व रँकिंगसाठी सर्व घटकांच्या सहभागाने प्रयत्न करावे यासाठी 'विशेष कार्य समिती'चे गठन करण्यात यावे, या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहे. विद्यापीठ व विद्यार्थी हितासाठी उपरोक्त विषयांची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. निवेदन देतेवेळी विद्यापीठ विकास मंच निमंत्रक व अधिसभा सदस्य राजेंद्रप्रसाद पाण्डे, ॲड. अमोल ठाकरे, प्रा. डॉ. श्याम मुंजे, सुनील तीप्पट, गिरीश शेरेकर, आशिष सावजी, अमित देशमुख, सीए उज्वल बजाज उपस्थित होते.



## मुंधडा महाविद्यालय राष्ट्रीय क्रीडा दिवस उत्साहात

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**



स्व.मदनगोपाल मुंधडा महाविद्यालय आणि अशोक कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे राष्ट्रीय क्रीडा दिवस अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात मेजर ध्यानचंद सिंह यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयंत कारमोरे (अध्यक्ष), वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. संजय गवई (मुख्य अतिथी), क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. अलका करणवाल (आयोजक) उपस्थित होते. प्रास्ताविक क्रीडा आणि शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. अलका करनवाल यांनी केले, ज्यामध्ये त्यांनी मेजर ध्यानचंद सिंह यांच्याशी संबंधित सर्व घटनांचे सविस्तर वर्णन केले.यावेळी विद्यार्थ्यांना मेजर ध्यानचंद सिंह यांचा व्हिडिओ देखील दाखवण्यात आला. आणि क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने संपूर्ण वर्षभर विद्यार्थ्यांनी ज्या खेळांमध्ये भाग घेतला आणि जी बक्षिसे जिंकली, ती सर्व व्हिडिओद्वारे दाखवण्यात आली.संचालन वाणिज्य विभागाच्या प्रा. स्नेहा मोरे यांनी केले. आभार प्रदर्शन जानवी निवारे (बी.कॉम.) यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# मुंबईत अमरावती जिल्ह्यातील तांडा समृद्धी योजनासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक

## चांदूर रेल्वे तालुक्यातील मोगरा कस्तुरा, लालखेड, सालोरा येथील कामांबाबत तक्रारी

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेच्या अनुषंगाने अमरावती जिल्ह्यातील माजी अशासकीय सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक मुंबई येथील विजयदुर्ग बंगला, मंत्रालयासमोर नुकतीच पार पडली. जिल्ह्यातील ४५ तांड्यांच्या विकासासह प्रलंबित विविध प्रश्नांवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तांड्यांच्या विकासासाठी फॉरेस्ट व ई-क्लास जमीन ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देणे, तसेच ज्या तांड्यांमध्ये अद्याप स्मशानभूमीची सुविधा नाही, त्यांची तालुकानिहाय व गावनिहाय माहिती संकलित करण्याबाबत चर्चा झाली.



अमरावती जिल्ह्यातील सर्व तांड्यांना महसुली दर्जा मिळाल्याबद्दल तसेच दोन गावांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, योजनेअंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांपैकी चांदूर रेल्वे तालुक्यातील मोगरा कस्तुरा, लालखेड आणि सालोरा येथे निकृष्ट दर्जाचे काम झाल्याची तक्रार माजी अशासकीय सदस्यांनी बैठकीत मांडली. यापूर्वी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे तक्रार करूनही अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आणून देण्यात आले. या तक्रारींची वस्तुस्थिती तपासण्यासाठी अभ्यास समिती संबंधित गावांना प्रत्यक्ष भेट देऊन कामांचा दर्जा, खर्च आणि प्रत्यक्ष स्थितीची पाहणी करणार आहे. योजनेच्या पुढील कामकाजात अशासकीय सदस्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या सूचना विचारात घेण्याची मागणीही करण्यात आली.

बैठकीला योजनेचे समन्वयक डॉ. जगदीश सकवान तसेच प्रशासकीय अधिकारी रविंद्र राठोड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अमरावती जिल्ह्यातील माजी अशासकीय सदस्य प्रमोद राठोड, वासुदेव राठोड, कैलास राठोड आणि मोतीराम राठोड उपस्थित होते. अमरावती जिल्ह्यातील ४५ तांड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# २५ वर्षांपूर्वी उपस्थित झालेली मागणी आजही अपूर्ण

## चूर्णी तहसील निर्मितीचा मुद्दा पुन्हा चर्चेत

**मेळघाट/वार्ताहर**

मेळघाटातील दुर्गम व आदिवासीबहुल भागाच्या विकासाला गती मिळावी तसेच प्रशासन सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे या उद्देशाने सन २००१ मध्ये चिखलदरा तहसीलचे विभाजन करून चूर्णीला स्वतंत्र तहसीलचा दर्जा देण्याची मागणी जोरदारपणे पुढे आली होती. त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी मनीषा वर्मा तसेच तत्कालीन आमदार राजकुमार पटेल यांनी आपल्या दौऱ्यादरम्यान या विषयाचे महत्त्व अधोरेखित करत सकारात्मक संकेत दिले होते.

चिखलदरा तहसीलचा परिसर अत्यंत विस्तीर्ण व दुर्गम असल्याने दूरवरच्या गावांपर्यंत प्रशासकीय सुविधा वेळेवर पोहोचत नसल्याचा प्रश्न अनेक वर्षांपासून कायम आहे. त्यामुळे चूर्णीला स्वतंत्र तहसीलचा दर्जा देणे ही काळाची गरज असल्याची मागणी करण्यात आली होती.त्यावेळी याबाबतचा प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र निधीअभावी ही योजना पुढे सरकू शकली नाही. नवीन तहसीलसाठी कार्यालयीन इमारती, अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवासस्थाने, रस्ते, वीज व इतर मूलभूत सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने हा प्रस्ताव रखडला.

विशेष म्हणजे, निवडणूक काळात धारणी येथे आयोजित सभेत आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी चूर्णीला स्वतंत्र तहसीलचा दर्जा देण्यासाठी लवकरच आवश्यक कार्यवाही सुरू केली जाईल, असे आश्वासन दिल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्याचबरोबर धारणी–परतवाडा मार्गाचे डबल लेनमध्ये रूपांतर करण्याबाबतही त्यांनी आश्वासन दिले होते.तब्बल २५ वर्षे उलटल्यानंतरही चूर्णी तहसील निर्मितीचे स्वप्न अपूर्णच असल्याने हा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. मेळघाटातील नागरिकांची मागणी आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी निवडणूक काळात धारणी येथे दिलेल्या आश्वासनावर कायम राहून चूर्णीला लवकरात लवकर स्वतंत्र तहसीलचा दर्जा देण्याची कार्यवाही सुरू करावी. तसेच धारणी–परतवाडा मार्गाचे डबल लेनचे कामही मार्गी लावावे.

चूर्णी तहसील झाल्यास प्रशासन दुर्गम गावांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचेल, नागरिकांना तहसील कार्यालयाच्या कामांसाठी दूरवरचा प्रवास करावा लागणार नाही, शासकीय योजनांचा लाभ वेळेवर मिळेल आणि मेळघाटातील विकासकामांना गती मिळेल. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून चूर्णी तहसील निर्मितीचा २५ वर्षांपासून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावा, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# डॉ. प्रशांत विघे यांच्या कर्तृत्वावर राज्याची मोहोर

## 'डॉ. जे. पी. नाईक आदर्श राज्य शिक्षक पुरस्कार' आज पुण्यात प्रदान

**अमरावती/का.प्र.**

भारतीय विद्या मंदिर, अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, अमरावती येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा प्राध्यापक डॉ. प्रशांत विश्वेश्वर विघे यांच्या दोन दशकांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक, लेखन आणि विद्यापीठीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून, सन २०२५–२६ साठी 'डॉ. जे. पी. नाईक महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार' यासाठी त्यांची निवड झाली आहे. शनिवार ५ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे महाराष्ट्र शासनाच्या वतीने हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते तसेच उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळांकर आणि अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न होणार आहे.

प्रा. डॉ. प्रशांत विघे गेल्या २० वर्षांपासून उच्च शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहेत. अध्यापनासोबत संशोधन, लेखन, विद्यार्थी मार्गदर्शन, शैक्षणिक उपक्रम आणि विद्यापीठीय कार्य अशा विविध क्षेत्रांत त्यांनी योगदान दिले आहे.प्रा. डॉ. प्रशांत विघे हे सन २०२२ पासून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य म्हणून कार्यरत आहेत. विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक व प्रशासकीय विषयांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत त्यांनी शिक्षक, विद्यार्थी आणि उच्च शिक्षणाशी संबंधित प्रश्न विद्यापीठीय व्यासपीठावर मांडले आहेत.विघे यांचे कार्य अध्यापनापुरते मर्यादित राहिलेले नाही. भारतीय राज्यघटना, लोकशाही, निवडणूक प्रक्रिया, शिक्षणव्यवस्था, उच्च शिक्षण आणि समकालीन राजकारण अशा विविध विषयांवर त्यांनी लेखन आणि व्याख्यानांच्या माध्यमातून योगदान दिले आहे.



त्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, संशोधक, माजी विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. शिक्षक दिनाच्या निमित्ताने पुणे येथे होणारा हा पुरस्कार सोहळा प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्यासह भारतीय महाविद्यालय आणि अमरावतीच्या उच्च शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.

## संक्षिप्त

### बुधवारी डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला

**अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. कमलताई काशीराव देशमुख, नागपूर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून 'प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमालेचे' बुधवार दि. ९ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजन करण्यात आले आहे. अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते भूषविणार असून 'उच्च शिक्षण : वेध परिवर्तनाचा' या विषयावर महाराष्ट्र राज्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण कार्यबल गटाचे सदस्य तथा वरिष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य डॉ. अनिल राव (सीए) हे अभ्यासपूर्ण व्याख्यान देणार आहेत. याप्रसंगी श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे अध्यक्ष श्री हर्षवर्धन देशमुख व नागपूरचे दानदाते डॉ. श्रीमती कमलताई काशीराव देशमुख यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे.

### गोकुळ अष्टमी महोत्सवाचे आयोजन

**गुरुकुंज मोझरी**-राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या संकल्पनेतुन श्री क्षेत्र गुरुकुंज आश्रम येथून १ किलोमीटर अंतरावर असलेल्या राम कृष्ण हरि मंदिर,दासटेकडी येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गोकुळ अष्टमी महोत्सवाचे आयोजन ४ व ५ सप्टेंबर रोजी करण्यात आले असून यात उद्या ४ सप्टेंबर रोजी 'प्रगट भये गोकुल में भगवान' हा विशेष कार्यक्रम होईल.४ सप्टेंबर रोजी सकाळी ४ वाजता तीर्थस्थापना, अभिषेक व महापूजा करून होईल. सकाळी ५ ते ६ वाजता सामुदायिक ध्यान होईल व ध्यानाच्या महत्वावर ग्रामजयंती महोत्सवाचे अध्यक्ष श्रीकृष्ण दळवी यांचे चिंतन होईल.शनिवार ५ सप्टेंबर रोजी सकाळी ५ ते ६ वाजता सामुदायिक ध्यान व ध्यानाच्या महत्वावर डॉ. सद्गुण ठोसर यांचे चिंतन होईल. सकाळी १० ते १२ वाजता गोपालकाल्याचा कार्यक्रम होईल व या महत्त्ववर हभप लक्ष्मणदास काळे महाराज यांचे कीर्तन होईल.

### परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधींबाबत व्याख्यान

**अमरावती**-पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स (AI&DS) आणि FAID (Forum of AI Developer) यांच्या वतीने 'Global Opportunities for Higher Studies Abroad' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमात प्राजक्ता पी. काळे, आणि अश्विन अलसी यांनी विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. प्रवेश प्रक्रिया, आवश्यक पात्रता, भाषा परीक्षा, व्हिसा प्रक्रिया, शिष्यवृत्ती तसेच विविध देशांमधील उच्च शिक्षणाच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.प्राजक्ता पी. काळे यांनी Northern Illinois University येथून M.S. in Management Information Systems चे शिक्षण घेतले असून त्या IIM Bangalore च्या Executive Education कार्यक्रमाच्या माजी विद्यार्थिनी आहेत.कार्यक्रमास AI & DS विभागाचे विभागप्रमुख डॉ. अजय बी. गाडिचा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मीनल पारडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून प्रा. मेघा चिंचमालातपुरे यांनी सहकार्य केले.संचालन श्रावणी गिरी आणि सौम्या पांडे यांनी प्रभावीपणे केले.



### सोमवारी जिल्हा लोकशाही दिन

**अमरावती**-जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, ७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता 'जिल्हा लोकशाही दिना'चे आयोजन करण्यात आले आहे. तक्रारदारांना आवश्यक कागदपत्र व निवेदनांसह वेळेत उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून करण्यात आले आहे.

# विद्यार्थ्यांनी जाणली कल्पनेला व्यवसाय मॉडेलमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया

## आयआयएमसीच्या विद्यार्थ्यांनी दिली इन्क्युबेशन सेंटरला भेट



**अमरावती/का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थानच्या (आयआयएमसी) विद्यार्थ्यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरला भेट देवून तेथील विविध उपक्रम, नव्याने सुरू करण्यात आलेले प्रकल्प आणि स्टार्टअपसाठी उपलब्ध असलेल्या संधींची माहिती जाणून घेतली.

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना इन्क्युबेशन सेंटरची कार्यपद्धती, नवकल्पनांना मिळणारे मार्गदर्शन, प्रकल्पाची संकल्पना विकसित करण्याची प्रक्रिया, तांत्रिक व व्यावसायिक सहाय्य तसेच एखाद्या कल्पनेचे व्यवहार्य व्यवसाय मॉडेलमध्ये रूपांतर करण्याच्या विविध टप्प्यांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी केंद्राच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध प्रकल्पांची पाहणी करून त्यांच्या भविष्यातील विस्ताराच्या शक्यता समजून घेतल्या. मनात येणारी एखादी कल्पना केवळ कल्पनेपुरती मर्यादित न ठेवता तिचे संशोधन, तंत्रज्ञान, नियोजन, मार्गदर्शन आणि योग्य व्यावसायिक दृष्टिकोनातून उद्योगात रूपांतर कसे करता येते, याचा प्रत्यक्ष अनुभव यावेळी विद्यार्थ्यांनी घेतला.

विद्यार्थ्यांनी इन्क्युबेशन सेंटरच्या तज्ज्ञांशी संवाद साधत त्यांच्या मनातील विविध कल्पना मांडल्या तसेच त्या कल्पनांना प्रकल्पाच्या स्वरूपात विकसित करण्यासाठी कोणत्या पायऱ्या आवश्यक आहेत, याबाबत प्रश्न विचारले. नव्या प्रकल्पांना आवश्यक असलेले मार्गदर्शन, नेटवर्किंग, तज्ज्ञांचे सहकार्य आणि बाजारपेठेशी जोडण्याची प्रक्रिया याबाबतही विद्यार्थ्यांनी माहिती घेतली.यावेळी इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक डॉ. स्वाती शेरेकर, समन्वयक अमोल हिरुळकर, सिध्देश्वर शिंगारे, पवन घाटे यांनी विद्यार्थ्यांना विविध विभागांची माहिती दिली. 'कल्पना–नवकल्पना–प्रकल्प–स्टार्टअप–व्यवसाय' या प्रवासाची प्रत्यक्ष ओळख करून देणारी ही भेट विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली.क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजीत या अभ्यासभेटीत डॉ. विनोद निताळे, जयंत सोनोने आणि रोहन तायडे सहभागी होते. यावेळी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहदुय्यम निबंधक कार्यालयात 'हेलपाट्यांचा' कारभार!

## नागरिकांच्या वेळेशी खेळ; प्रशासन झोपेतच? चौकशी करून कारवाईची मागणी

**अमरावती/का.प्र.**

अचलपूर येथील जमीन-घराच्या खरेदी-विक्रीपासून गहाणखतापर्यंतच्या महत्त्वाच्या व्यवहारांची नोंदणी करण्यासाठी अचलपूर सहदुय्यम निबंधक कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या पदरी गैरसोयच पडत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. नव्याने रुजू झालेल्या सह दुय्यम निबंधकांच्या कार्यालयीन उपस्थितीबाबत नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले असून, दस्त नोंदणीसाठी वेळ देऊन आलेल्या नागरिकांना प्रतीक्षेत बसावे लागत असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. एवढेच नव्हे तर दस्त नोंदणी झाल्यानंतर कागदपत्रांसाठीही नागरिकांना पुन्हा कार्यालयाच्या फेऱ्या माराव्या लागत असल्याचा आरोप होत आहे.

नागरिकांच्या वेळेची किंमत प्रशासनाच्या लेखी आहे की नाही? सरकारी कार्यालयात कामासाठी आलेल्या नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागणे आणि पुन्हा पुन्हा चकरा माराव्या लागणे ही कोणती 'नागरिकाभिमुख' सेवा? असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे. दस्त नोंदणी ही केवळ कार्यालयीन प्रक्रिया नसून नागरिकांच्या आयुष्यभराच्या मालमत्ता व्यवहाराशी संबंधित बाब आहे. अनेक नागरिक दूरवरून वेळ आणि पैसा खर्च करून कार्यालयात येतात. दस्त नोंदणीसाठी तारीख दिल्यानंतर नागरिकांनी नियोजन करून उपस्थित राहायचे आणि कार्यालयीन कामकाजातील अडचणींमुळे त्यांनाच पुन्हा तारीख मिळणार असेल, तर या व्यवस्थेचा जाब कोण घेणार, असा सवाल नागरिकांतून होत आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित अधिकारी कार्यालयीन वेळेत नियमितपणे उपलब्ध राहत नसल्याच्या तक्रारी आहेत. अधिकारी उशिरा आल्यास दस्त नोंदणीच्या कामावर त्याचा परिणाम होतो आणि नागरिकांना प्रतीक्षा करावी लागते, असा दावा करण्यात येत आहे. त्यामुळे दररोज होणाऱ्या दस्त नोंदणीवर परिणाम होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. शासनाचा महसूल वाढविण्याची जबाबदारी असताना दस्त नोंदणीचे कामच वेळेत होत नसेल तर त्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल आता ऐरणीवर आला आहे.

कागदपत्रांच्या बाबतीतही नागरिकांची अडचण कायम असल्याची तक्रार आहे. दस्त नोंदणी पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रे मिळण्यासाठी विलंब होत असून, कार्यालयातील प्रिंटरमध्ये बिघाड असल्याचे कारण सांगितले जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तांत्रिक बिघाड हा कोणत्याही कार्यालयात होऊ शकतो; मात्र पर्यायी व्यवस्था करणे ही प्रशासनाची जबाबदारी नाही का? एखाद्या प्रिंटरच्या बिघाडामुळे नागरिकांना पुन्हा कार्यालयात बोलावून त्यांचा वेळ आणि पैसा वाया जाणे कितपत योग्य आहे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

'खरेदी नोंदणीसाठी दस्त सादर केला असून, गुरुवारी बोलावण्यात आले आहे,' अशी व्यथा दस्त नोंदणीदार इरफान शेख कादर यांनी व्यक्त केली. 'मॉर्गेजचे दस्त नोंदणीसाठी गुरुवारी बोलावण्यात आले आहे,' असे दस्त नोंदणीदार आनंदा शंकर गायन यांनी सांगितले.दरम्यान, नागरिकांच्या तक्रारींबाबत सह दुय्यम निबंधक मोहन राठोड यांनी आरोप फेटाळले आहेत. 'मी आता रूम केली असून सकाळी साडेदहा वाजताच नियमित कार्यालयात येत आहे. नागरिकांकडून माझ्याबाबत चुकीचे बोलले जात आहे,' असे त्यांनी सांगितले.



अधिकाऱ्यांची ही बाजू लक्षात घेता आता वरिष्ठ प्रशासनानेच या संपूर्ण प्रकाराची वस्तुनिष्ठ चौकशी करण्याची वेळ आली आहे. अधिकारी नियमित कार्यालयात उपस्थित राहतात का? दस्त नोंदणीसाठी नागरिकांना किती प्रतीक्षा करावी लागते? नोंदणीनंतर कागदपत्रे देण्यास विलंब का होतो? प्रिंटरचा बिघाड असेल तर पर्यायी व्यवस्था का केली जात नाही? किती दस्त नोंदणी प्रलंबित आहेत? या सर्व प्रश्नांची उत्तरे नागरिकांना मिळणे आवश्यक आहे.

सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी यांनी या तक्रारींची दखल घेऊन अचलपूर कार्यालयाच्या कामकाजाची प्रत्यक्ष पाहणी करणार का? कार्यालयीन वेळेचे पालन होते की नाही, याची तपासणी करणार का? नागरिकांना वेळेत सेवा न मिळाल्यास त्याची जबाबदारी निश्चित करणार का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, 'सरकारी सेवा' मिळवण्यासाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत यासाठी ठोस व्यवस्था करणार का?

कार्यालय नागरिकांसाठी आहे; नागरिक कार्यालयासाठी नाहीत. त्यामुळे तक्रारी खऱ्या असोत अथवा गैरसमजुतीतून निर्माण झालेल्या असोत, त्याचा छडा लावून वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अचलपूरच्या दुय्यम निबंधक कार्यालयातील कारभाराबाबत उठलेल्या प्रश्नांना आता केवळ मौखिक स्पष्टीकरणाने उत्तर मिळणार नाही; प्रत्यक्ष कार्यवाही आणि पारदर्शक कामकाजातूनच नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवावा लागणार आहे.



# शिक्षणाच्या धंद्यातील नैतिकतेची पातळी आणि विद्यार्थ्यांचे भविष्य

**म्ह**णायला तर सर्वजण शिक्षणाच्या ज्ञानमंदिराकडे पवित्र व्यवसाय म्हणून पाहतात; परंतु आज व्यापारीकरणाच्या युगात हे तेच ज्ञानमंदिर राहिले आहे का, जिथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी शिक्षणाची ज्ञानज्योत प्रज्वलित करण्यासाठी विपरीत विचारसरणी आणि रूढी-परंपरा असलेल्या संपूर्ण समाजाकडून घृणा व द्वेष सहन केला होता? आज त्याच व्यवस्थेसमोर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा आहे.शिक्षण हळूहळू ज्ञान आणि सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयापासून दूर जाऊन शुल्क, नफा, ब्रँड, परीक्षेचे निकाल आणि रोजगाराच्या बाजारपेठेत बदलत चालले आहे का? जर शिक्षणाच्या नावाखाली अनावश्यक आर्थिक भार, नियुक्त्यांमध्ये कथित पैशांचा प्रभाव, राजकीय अथवा प्रशासकीय हस्तक्षेप आणि शिक्षकांची असुरक्षितता यांसारख्या प्रवृत्ती वाढत असतील, तर संकट केवळ संस्थात्मक व्यवस्थेचे नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत नैतिक चारित्र्याचे आहे. अशा परिस्थितीत आपण पुन्हा विचार करणे आवश्यक आहे की, ज्या महापुरुषांनी शिक्षणाला समानता, स्वाभिमान, ज्ञान आणि सामाजिक मुक्तीचे साधन बनवले होते, त्याच वारशाला आपण पुढे नेत आहोत का, की नकळत शिक्षणाला अशा व्यवस्थेत रूपांतरित करत आहोत, जिथे विद्यार्थी ग्राहक, शिक्षक एक कर्मचारी आणि ज्ञान एक उत्पादन बनत चालले आहे?

आजकाल सोशल मीडिया आणि बातम्यांमध्ये शिक्षण संस्थांच्या अनेक अनुचित वर्तनाच्या वाढत्या बातम्या मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध होत असून, त्यामुळे शिक्षणाची पवित्रता कलंकित होत आहे. महाराष्ट्र राज्यातील सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये पदभरतीच्या नावाखाली प्राध्यापकांच्या दराची चर्चा सर्वांना माहीत आहे. काही दिवस वर्तमानपत्रांमध्ये बातम्या येतात आणि त्यानंतर पुन्हा सर्व काही सामान्य होते. शिक्षकांचे मानसिक छळ आणि आत्महत्येच्या घटनाही सातत्याने वाढल्या आहेत. शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, भरती घोटाळे, पदव्या खरेदी करणे, परीक्षेचे पेपर फुटणे, उत्तरपत्रिकांमध्ये फेरफार, सरकारी खर्चातील अनियमितता, साहित्याच्या खरेदी-विक्रीतील गैरप्रकार आणि कमकुवत आर्थिक उत्तरदायित्व या सर्व बाबी दर्शवतात की शिक्षणाच्या कामकाजात अनेक स्तरांवर गैरप्रकार होऊ शकतात. प्रत्येक क्षेत्रात कार्यरत असलेल्या साधारणपणे सर्वच कर्मचाऱ्यांना त्यांच्या विभागात कुठे अनुचित किंवा भ्रष्ट कामे होतात, याची माहिती असते; परंतु बहुतेक जण याबाबत विरोध करणे पसंत करत नाहीत. 'जसे चालले आहे तसे चालू द्या,' असा दृष्टिकोन ते स्वीकारतात; परंतु या दृष्टिकोनाचा थेट परिणाम संपूर्ण व्यवस्था, समाज आणि देशावर होतो, ज्याचे गंभीर परिणाम निरपराध जनतेला शतकानुशतके भोगावे लागू शकतात.

विकसित देशांमधील शिक्षण संस्था समान गुणवत्तेवर केंद्रित असतात, जिथे श्रीमंत-गरीब आणि खासगी-सरकारी कर्मचाऱ्यांची मुले कोणत्याही भेदभावाशिवाय एकाच शाळेत शिकतात. ज्या देशाने गुणवत्तापूर्ण प्रगत शिक्षण, सुदृढ आरोग्य सुविधा आणि रोजगारनिर्मितीला महत्त्व दिले, तेच देश प्रगतीच्या मार्गावर पुढे जाऊन विकसित झाले आहेत. जगात असे अनेक छोटे-छोटे देश आहेत, ज्यांच्याकडे शेतीसाठी जमीन नाही, पुरेशी जलसुविधा नाही किंवा ते नैसर्गिक आपत्तींनी वेढलेले आहेत; तरीही त्यांनी आपल्या चांगल्या शिक्षण प्रणालीद्वारे आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या बळावर विकास साधला. मनुष्याच्या संपूर्ण जीवनाची आधारशिला त्याच्या शिक्षणावर अवलंबून असते. शिक्षणाची गुणवत्ता आणि कौशल्येच त्याच्या भविष्याची दिशा ठरवतात. अर्थात, याचा परिणाम व्यक्तीबरोबरच त्याच्या पुढील पिढीवरही होतो. जीवनातील प्रत्येक प्रसंग आणि कार्यकलापांमध्ये शिक्षणाचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हस्तक्षेप निश्चितच असतो.

परदेशात सामाजिक समरसतेचे ज्ञान मुलांना शाळेतच दिले जाते. लहान विद्यार्थ्यांना अभ्यासातील विविध विषयांसोबत घराची स्वच्छता करणे, मोठ्या व्यक्ती व ज्येष्ठ नागरिकांना मदत करणे, स्वतःचे काम स्वतः करणे, घरातील पालकांच्या कामात हातभार लावणे, महिलांचा आदर करणे, असहाय व्यक्तींना मदत करणे, समाजकार्य करणे, झाडे लावणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, हस्तकला, शिल्पकला, लहान-मोठी उपकरणे दुरुस्त करणे अशा



शिक्षक दिन विशेष

अनेक विषयांचे व्यावहारिक शिक्षण शाळेत दिले जाते. यामध्ये त्यांना शिकवले जाते की कोणतेही काम छोटे किंवा मोठे नसते; सर्व कामे महत्त्वाची आणि समान असतात. त्यासाठी त्यांना शैक्षणिक गुणही दिले जातात. ही पद्धत विद्यार्थ्यांना कौशल्यपूर्ण, विकसित, सशक्त, जबाबदार, संस्कारी आणि समजूतदार नागरिक बनविण्यावर भर देते, जे प्रत्येक देशासाठी अत्यंत आवश्यक आहे. जेव्हा येथे आपल्याकडे मुले रील पाहण्यात सर्वाधिक वेळ वाया घालवतात, तेव्हा तेथे मुले एखाद्या तरी कामात व्यावसायिकदृष्ट्या कौशल्यपूर्ण पद्धतीने पारंगत झालेली असतात.

देशात बहुतांश सरकारी कर्मचारी आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी महागड्या खासगी शिक्षण संस्थांना प्राधान्य देतात. चांगले वेतन मिळत असतानाही स्वतः सरकारी शाळांमधील शिक्षक आपल्या मुलांना आपल्याच शाळेत शिकवण्यास पसंती देत नाहीत. बहुतांश खासगी शाळांमधील शिक्षक कमी वेतनावर कार्यरत असूनही चांगले परिणाम दर्शवतात, तर सरकारी संस्थांना गुणवत्तापूर्ण शैक्षणिक दर्जा वाढवायला काय होते? केंद्रीय आणि नवोदय विद्यालये शिक्षणात चांगली कामगिरी करतात; परंतु या शाळांची संख्या फारच कमी आहे. या शाळांमध्ये शिक्षकांची गुणवत्ता, पदभरती आणि कार्यपद्धती अद्ययावत असतात. याच्या तुलनेत अनेक राज्य सरकारांच्या शाळांची परिस्थिती खराब दिसून येते. ग्रामीण भाग, दुर्गम प्रदेश आणि मागासलेल्या भागातील सरकारी शाळा पावसाळ्यात शिक्षा देणाऱ्या संस्थांसारख्या बनतात. चांगल्या शिक्षणाची सुविधा मिळणे तर दूरच, आपल्या शाळेपर्यंत पोहोचण्यासाठी लहान विद्यार्थ्यांना चिखल, झुडपे, खड्डेमय रस्ते आणि काही ठिकाणी तर दुथडी भरून वाहणाऱ्या नदी-नाल्यांना जीव धोक्यात घालून पार करून शाळेत पोहोचावे लागते. अनेक शाळा भग्नावस्थेत दिसतात आणि मूलभूत सुविधांचीच कमतरता असते. गरीबांची परिस्थिती इतकी बिकट आहे की, प्राथमिक शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ४० टक्के विद्यार्थी कधीही इयत्ता १२ वीपर्यंत पोहोचत नाहीत. नीती आयोगाच्या अहवालानुसार, २०१७-१८ ते २०२२-२३ या कालावधीत देशातील ९२ हजार सरकारी शाळा बंद झाल्या. एक लाखांहून अधिक शाळा केवळ एका शिक्षकाच्या भरवशावर आहेत.

शिक्षक कधीही सामान्य नसतो. प्रलय आणि निर्मिती त्यांच्या कुशीत वाढतात. शिक्षक आपल्या कलागुणांनी, ज्ञानाने आणि शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये नव्या सशक्त आणि विकसित समाजाची पायाभरणी करत देशाच्या भविष्याचे शिल्पकार म्हणून आपली भूमिका साकारतात. शिक्षण म्हणजे केवळ गुण, क्रमांक, पदवी आणि रोजगार नव्हे; तर चारित्र्य, सुजाण व सुसंस्कृत नागरिकत्व, सर्जनशीलता, चिकित्सक विचार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यांनाही अत्यंत महत्त्व आहे. शिक्षणाची हीच मुख्य नैतिकता आहे. जर आजचे शिक्षण विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करून त्यांच्या कलागुणांना विकसित करून, त्यांना योग्य, कौशल्यपूर्ण आणि सक्षम बनवून जीवनासाठी चांगले भविष्य घडविण्यात कमकुवत ठरत असेल, तर असे शिक्षण देशात केवळ पदवीधारकांची संख्या वाढविण्याचे काम करेल, जे आजपर्यंत होत आले आहे. नुकतेच नीती आयोगानेही आपल्या अहवालात हेच नमूद केले आहे की, युवकांकडे पदवी आहे, मात्र कौशल्य नाही. शिक्षणाकडे केवळ बाजारातील उत्पादन म्हणून न पाहता, सामाजिक अधिकार आणि सार्वजनिक जबाबदारी म्हणून पाहिले पाहिजे.

**डॉ. प्रितम भि. गेडाम**
०८२३७४१७०४१

---

गणवेश बदलतो; कर्तव्याची ज्योत कायम!

## कॅप्टन मोहन गुजरकर : सैनिकी खाकीतला प्राध्यापक

**शि**क्षकाच्या पारंपरिक भूमिकेच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे कॅप्टन मोहन गुजरकर. प्राध्यापक, NCC अधिकारी, NSS कार्यक्रम अधिकारी, स्काऊटर, पर्यावरणप्रेमी, माजी होमगार्ड जिल्हा समादेशक आणि सामाजिक कार्यकर्ता अशा अनेक भूमिका त्यांनी एका ध्येयाने जगल्या.तरुणाईला सक्षम करणे आणि राष्ट्रनिर्मितीत सहभागी करणे..

**शिक्षण फक्त वर्गात नाही!**

इतिहास व इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून अध्यापन करतानाच गेल्या १५ वर्षांपासून NCC अधिकारी म्हणून त्यांनी युवक-युवतींमध्ये शिस्त, आत्मविश्वास, नेतृत्व, साहस आणि राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजविले. जंगलभ्रमंती, ट्रेकिंग, साहस शिबिरे, आपत्ती व्यवस्थापन, सायकल अभियान आणि विविध जनजागृती उपक्रमांतून विद्यार्थ्यांना पुस्तकाबाहेरचे शिक्षण दिले. या संस्कारांची फलश्रुती म्हणजे त्यांच्या मार्गदर्शनातून घडलेले ८० पेक्षा अधिक छात्र सैनिक आज सैन्यदल, पोलीस, वनविभाग आणि गृहरक्षक दलात कार्यरत आहेत. 'स्वच्छ शहर–सुंदर शहर', 'चला मतदान करू या', 'व्यसनमुक्त समाज', 'टीबीमुक्त भारत' यांसारख्या अभियानांतून विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण केली.

**सेवा, साहस आणि संवेदनशीलता**

NSS च्या माध्यमातून 'Not Me But You' हा सेवाभाव प्रत्यक्ष कृतीत आणला. दत्तक ग्राम, स्वच्छता, ग्रीन कॅम्पस आणि सामाजिक जनजागृती उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना समाजाशी जोडले.

गेल्या तीन दशकांपासून भारत स्काऊट्स अँड गाईड्स चळवळीशी जोडलेल्या गुजरकर यांनी रोव्हर–रेंजरच्या माध्यमातून युवकांमध्ये साहस, स्वावलंबन आणि सेवा संस्कार रुजविले. त्यांच्या कार्याची दखल घेत उपराष्ट्रपती पुरस्कार, लक्ष्मीबाई मुजुमदार राष्ट्रीय पुरस्कार, उत्कृष्ट स्काऊटर पुरस्कार, Medal of Merit आणि Bar to Medal of Merit अशा विविध सन्मानांनी त्यांचा गौरव झाला आहे.

**२२,५०० वृक्ष आणि हजारो पर्यावरण सैनिक!**

पर्यावरण संवर्धनाला त्यांनी विद्यार्थी चळवळीचे रूप दिले. सामाजिक वनीकरण विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयाच्या सुमारे दोन एकर परिसरात २२,५०० वृक्षांचा मियावाकी घनवन प्रकल्प उभारण्यात आला.

NCC विद्यार्थ्यांना 'Green Warriors' म्हणून पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी देत त्यांनी एक साधा पण प्रभावी संदेश दिला..'वृक्ष लावणे ही सुरुवात; वृक्ष जगविणे ही खरी जबाबदारी!'



**संकटातही कर्तव्य प्रथम**

२०१२ ते २०१५ या कालावधीत महाराष्ट्र होमगार्डचे जिल्हा समादेशक म्हणून पूर आणि आगीच्या घटनांमध्ये त्यांनी बचावकार्य केले. या सेवाकार्याची दखल घेत त्यांना चार वेळा शौर्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

१९९४ पासून 'प्रहार समाज जागृती संस्थे'च्या माध्यमातून पंचमढी व हिमालय ट्रेकिंग, साहसी शिबिरे, युवक मार्गदर्शन, ऑगस्ट क्रांती मॅरेथॉन आणि महाशिवरात्री सेवा प्रकल्प यांसारखे उपक्रम त्यांनी सातत्याने राबविले.

**इतिहास शिकवताना भविष्य घडविणारा शिक्षक**

इतिहास विषयाची विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासाठी डॉ. पांडुरंग सदाशिव खानखोजे प्रश्नमंजुषा स्पर्धा गेल्या २५ वर्षांपासून आयोजित केली जाते. इंग्रजी अभ्यास मंडळ, Spoken English, भाषा प्रयोगशाळा, कथाकथन आणि संवाद कौशल्य यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांच्या अभिव्यक्तीला नवी दिशा दिली. २०१६–१७ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या राज्य शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या गुजरकर यांच्या कार्यात शिक्षकत्वाची व्यापक संकल्पना दिसते.

प्राध्यापक म्हणून ज्ञान,NCC अधिकारी म्हणून शिस्त,स्काऊटर म्हणून साहस,NSS अधिकारी म्हणून सेवा,Green Warrior म्हणून पर्यावरणप्रेम आणि होमगार्ड अधिकारी म्हणून कर्तव्यनिष्ठा!या सर्व भूमिकांचा केंद्रबिंदू मात्र एकच—विद्यार्थी आणि राष्ट्र.

**काही शिक्षक शिकवत नाहीत; ते घडवतात!**

कॅप्टन मोहन गुजरकर यांचा प्रवास हा केवळ एका प्राध्यापकाचा प्रवास नाही; तो विद्यार्थ्यांना स्वप्न पाहायला, संकटांना सामोरे जायला आणि राष्ट्रासाठी उभे राहायला शिकविणाऱ्या शिक्षकाचा प्रवास आहे. वर्गात इतिहास आणि इंग्रजी शिकवणारा प्राध्यापक, मैदानावर शिस्त घडवणारा कॅप्टन आणि समाजात सेवा रुजवणारा शिक्षक हीच त्यांची खरी ओळख!५ सप्टेंबरच्या शिक्षक दिनी अशा कर्मयोगी शिक्षकाला सलाम. कारण काही शिक्षक फक्त धडे शिकवत नाहीत;ते विद्यार्थ्यांच्या माध्यमातून उद्याचा भारत घडवतात.

**रवी लाखे,** वर्धा
९८८१५९०२३१

---

त-ड-का

'दै.जनमाध्यम' चे गुपित

विश्वात घडलेल्या
ताज्या घटनांचा
वृतांत 'दै.जनमाध्यम'
वाचकांना करे सादर..

म्हणूनी प्रातःकाली
प्रतिक्षा असते अजुनी
का बरे..
आला नसेल पेपर?

भ्रष्टाचार गुंडागिरीचा
बिनधास्त करे भंडाफोड
म्हणून जनमाध्यमकडे
वाचकांची असते ओढ..

तडका सम विविध स्तंभ
बुध्दीला देती चालना
म्हणून जनमाध्यम
आवडते वाचकांना...

सत्कार्याची करे प्रशंसा
दृष्कृत्यांची निर्भत्सना
पिडीतांना देतो आधार
म्हणून जनमाध्यमला-
मिळे सार्वत्रिक जनाधार.. !

**प्रा अशोक सारडा,**



**मेहकर**
९४२१३९४३३९

---

## शिक्षक हे ज्ञानदाते नव्हे राष्ट्रनिर्माते!

गुरू ब्रह्मा गुरूर्विष्णु,गुरूदेवो,महेश्वर:।गुरू: साक्षात परब्रह्मा,तस्मै:श्री गुरूवे नम:।भारतीय संस्कृतीत आईनंतर सर्वात महत्वाचे स्थान गुरूला आहे.आई जशी मुलांवर संस्कार करते, तसा गुरू हा मुलांना घडवण्याचे,त्यांना सक्षम करण्याचे काम करतो. जीवनाला दिशा देण्यात आणि आपली जडणघडण करण्यात गुरूचा वाटा खूप मोठा असतो.शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा महत्वाचा घटक आहे. शिक्षकीपेक्षा हा पेशा म्हणून न पाहता हे व्रत समजून स्विकारले तर आपल्या बुद्धीचा, आपल्या क्षमतेचा उपयोग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सर्वांगीण क्रातीसाठी किती आणि कसा होवू शकतो, यावर खरं कौशल्य शिक्षकांचे आहे.आपल्या या पावनभुमीत अनेक थोर संत,महात्मे होऊन गेले,त्यांच्या गाथा आपण आजही वेगवेगळ्या रूपाने ऐकतो, वाचतो, त्याचप्रमाणे अनेक थोर पुरुष, अमर हुतात्मे देखील आपल्याला लाभले. त्यापैकी एक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन.

शिक्षकांनी केवळ पुस्तकी ज्ञान शिकवण्यापुरते संतुष्ट होवु नये, तर त्यांनी विद्यार्थ्यांना स्नेह आणि आदरही दिला पाहीजे. फक्त शिक्षक असुन सन्मान मिळत नाही, तर हा प्राप्त करावा लागतो, खरा शिक्षकच समाजाला योग्य दिशा दाखवतो; असे ते नेहमी सांगत असत.राधाकृष्णन यांचा जन्मदिवस व कृष्णजन्म हे दरवर्षी आसपासच येतात.पद्मा गोळेंची कविता आवर्जुन आठवली .... कृष्ण पठिसी हवा, कृष्ण तर पाठिसी आहेच, पण आपल्या अंतरंगात राधाकृष्णन आहे, हा विचारच मनाला तरळुन नेणारा ठरावा. शास्त्रीय वैचारिकतेतुन बौद्धिक पातळीवर राधाकृष्णन भिनावे, हृदयस्थ भावनिक अंतरपटलावर गोपाळ कृष्णमय व्हावे, म्हणजे आयुष्यच कृष्णमय निश्चित होईल. एक दिवसाच्या स्मृतीसांठी नाही तर अखंड चालणाऱ्या या कार्याप्रती या चिंतनाचा संकल्प केला तर आयुष्यच साधना होईल.

**डॉ. विजय बाबर**
वर्धा, ९४२३११८८०६

---

## जीडीपी समजताना...

**'र**स्ते बांधले, पूल बांधले तर जीडीपी मध्ये भर पडत असेल तर रस्ता वाहून गेला, पूल पडला तर जीडीपी कमी करतात का ? कारण हे तर आपण सतत ऐकत, वाचत असतो.' शेजारचा दहावीत शिकणारा मुलगा माझ्याशी गप्पा मारत होता. अलीकडेच त्याला टीव्ही वर आणि वर्तमानपत्रात बातम्या असतात त्यात गोडी लागू लागली होती.

काल, आज त्याने नवीन शब्द ऐकला: जीडीपी! त्याला मी जीडीपी ही संज्ञा समजावून देत होतो.व्हॉव.. याने तर नॅशनल अकाउंटिंग प्रणालीचे कपडे उतरवलेत. त्याने विचारलेल्या या व अशा प्रश्नात अजून भर घालता येईल. अनेक वर्षांची झाडे असलेली, हजारो,लाखो एकर वरील जंगले कायमची नष्ट केली जातात,ज्यामुळे पर्यावरणाचे गंभीर प्रश्न निर्माण होतात.त्याचे प्रतिबिंब नॅशनल अकाउंटिंग मध्ये कसे पडते.जे तरुण शिकून रोजगार, स्वयंरोजगार करून वस्तुमाल सेवांचे उत्पादन करतात त्यावेळी जीडीपी मध्ये भर घालत असतील तरष्ठज्यावेळी लाखो तरुण बेरोजगार असतात त्यावेळी त्याचे प्रतिबिंब नॅशनल अकाउंटिंग मध्ये कसे पडते ही यादी खूप मोठी आहे.

जीडीपी कशी मोजतात, यावर त्या क्षेत्रातील अर्थतज्ञ बरेच काही बोलत, लिहित असतात. त्यात अनेक तांत्रिक बाबी असतात. फाईन. पण वरचा प्रश्न तर एवढा कॉमन सेन्सिकल आहे. ज्याला आपल्याला ज्ञान कमी आहे याचे दडपण नसेल तोच असे बेसिक प्रश्न विचारू शकेल.

जेन झी आणि नंतर येणारी जेन अल्फा. प्रश्न विचारू लागली आहे आणि भविष्यात राहणार आहे. कारण ते त्यांच्या भाषेत बिनधास्त आहेत. ओरिजनल विचार क्षमतेची नसबंदी केल्या गेलेल्या प्रौढ माणसांनी या तरुण पिढीपासून खूप काही शिकले पाहिजे.माहिती, ज्ञान येत राहील.सर्वात महत्त्वाचे म्हणजे मनात प्रश्न तयार होणे. त्याहून महत्वाचे ते जाहीरपणे विचारण्याचे धैर्य ठेवणे.त्याची सवय ठेवावी लागते.नाहीतर मेंदूतील ते सेल्स कायमचे मरुन जातात.

प्रश्न विचारले पाहिजेत विशेषतः अर्थव्यवस्थेबद्दल.. जी तुमच्या आमच्या सर्वांच्या भौतिक राहणीमानावर प्रचंड परिणाम करत असते. विशेषतः अर्थव्यवस्थेबद्दल. कारण या सुटेड मंडळींनी अर्थशास्त्र कळण्यासाठी, अर्थशास्त्रावर बोलण्यासाठी खूप पुस्तक वाचावी लागतात, पीएचडी असण्याची गरज असते असा सामान्य नागरिकांचा ब्रेनवॉश केला आहे.

**संजीव चांदोरकर**

---

## ही तर फक्त सुरुवात!

**श**हरात गेल्या काही महिन्यांपासून वाढणारे अल्पवयीन मुलांचे गुन्हे ही शहराच्या विनाशाकडच्या वाटचालीची नांदी ठरत आहेत.नेमके काय चुकत आहे.काही घटक या परिस्थितीचे संपूर्ण खापर पोलिस प्रशासनावर फोडत आहेत; पण यात खरोखरच फक्त पोलीस जबाबदार आहेत का? एक सुजाण नागरिक म्हणून आपण यावर गांभीर्याने विचार करायला हवा. आपण नागरिकांनी आपल्या जबाबदाऱ्या ओळखून वर्तनात बदल केला, तर यावर नक्कीच आळा बसू शकतो.

**महत्त्वाचे मुद्दे:-**

**शहरातील भयावह वास्तव-**एका निष्पाप मुलीचा भरदिवसा,शहराच्या वर्दळीच्या आणि रहदारीच्या वस्तीत खुलेआम खून केला जातो..काय चाललंय काय आपल्या अमरावतीत? ही घटना म्हणजे कायदा व सुव्यवस्थेचा पार बोजवारा उडाल्याचे जिवंत उदाहरण आहे.

**छपरी टोळ्यांचा उगम आणि राजकीय पाठबळ-** शहरात गुन्हेगारी वाढण्यामागे छपरी टोळ्यांचा उगम हे सर्वात मोठे कारण आहे. सर्वच राजकीय पक्ष आपापल्या समर्थनासाठी अशा टोळ्यांना छुपा आधार देत असतात. राजकीय नेत्यांनी किमान आता तरी शहरातील वाढती गुन्हेगारी आणि असे निघृण खून पाहून या टोळ्यांना पाठबळ देणे थांबवायला हवे.

**नागरिकांमधील भीतीचे वातावरण:-**पूर्वी आपल्या शहरात रात्री-अपरात्री बाहेर पडताना अजिबात भीती वाटत नव्हती. आज मात्र रात्री ९:३० नंतर मुख्य रस्ता किंवा चौकात कामानिमित्त जातानाही सामान्य नागरिकाला १०० वेळा विचार करावा लागतो. जर भरदिवसा वस्तीत मुली सुरक्षित नसतील, तर परिस्थिती किती हाताबाहेर गेली आहे याची कल्पनाच केलेली बरी.

**नागरिक आणि पालकांची जबाबदारी:-** गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्याची जबाबदारी केवळ पोलिस प्रशासन आणि राजकीय





नेत्यांचीच आहे असे नाही. एक सामान्य नागरिक,पालक, शिक्षक आणि समाजातील जबाबदार व्यक्ती म्हणून आपणही या गोष्टींचा विरोध केला पाहिजे. चौकाचौकांतील टपऱ्यांवर जेव्हा अशा टोळ्या खुलेआम टवाळकी करतात किंवा व्यसनाधीन होतात, तेव्हा पोलिसांना त्याची माहिती देणे हे आपले कर्तव्य आहे.

**अल्पवयीन मुलांचे संगोपन आणि 'सॉफ्ट पॅरेंटिंग':-** अल्पवयीन मुले-मुली जेव्हा काही चुकीचे करताना दिसतात, तेव्हा समाजातील सर्व स्तरांतून त्यांना योग्य ती समज दिली गेली पाहिजे. पालकांनीही आपल्या पाल्यांना ही समज सकारात्मकतेने स्वीकारण्याची शिकवण दिली पाहिजे. आज 'सॉफ्ट पॅरेंटिंग'च्या नावाखाली मुले हाताबाहेर जात आहेत. ही बाब लक्षात येईपर्यंत खूप उशीर झालेला असेल. मुलांची हीच भरकटलेली पावले शहर खराब करण्यास आणि गुन्हेगार घडवण्यास कारणीभूत ठरत आहेत.

**कडक कारवाई आणि वचक निर्माण करण्याची गरज:-**पालकांनी आपले मूल काय करते, कुणासोबत उठते-बसते आणि त्याची संगत कशी आहे याकडे दुर्लक्ष केले, तर ही गुन्हेगारी अधिकच बळकट होईल. शहरात वाढलेल्या पानटपऱ्या, स्मोकिंग शॉप्स आणि 'आमच्या मागे अमक्या-तमक्या कंपनीचा/गँगचा हात आहे, त्यामुळे आमचे कोणी काही वाकडे करू शकत नाही' ही मानसिकता नष्ट होत नाही, तोपर्यंत अशा घटना थांबणार नाहीत. एका प्रसिद्ध मराठी चित्रपटात दाखवल्याप्रमाणे, भाईगिरी करणाऱ्या गुंडांची आणि भरकटलेल्या अल्पवयीन मुलांची जशी वाजत-गाजत चड्डीवर धिंड काढली होती, तशीच कडक कारवाई अमरावती पोलिस प्रशासनाने टोळीतील मुख्य म्होरक्यांवर (भाईंवर) चौकाचौकांत करायला हवी. अशी धिंड काढून समाजात एक मोठा संदेश आणि या छपरी वृत्तीला योग्य ती अद्दल घडवणे हीच आज एका सामान्य नागरिकाची अपेक्षा आहे.

लक्षात ठेवा,ही तर अजून सुरुवात आहे. आपल्या शहराला अशा गुन्हेगारी प्रवृत्तीचे केंद्र बनू द्यायचे नसेल, तर आजपासूनच प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने पावले उचलून एक सुरक्षित समाज घडवण्यासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

**विराज विजयराव देशमुख**

# राहुल गांधींवरील गुन्ह्यांविरोधात काँग्रेस आक्रमक

## हल्द्वानी प्रकरणी केंद्र-राज्य सरकारविरोधात संताप; राष्ट्रपतींकडे गुन्हे मागे घेण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या हल्द्वानी येथील सभेनंतर झालेल्या कथित 'मंच शुद्धीकरण' प्रकरणावरून राजकीय वातावरण तापले असतानाच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याच्या निषेधार्थ अकोला काँग्रेसने शुक्रवारी आक्रमक पवित्रा घेतला. जिल्हा व महानगर काँग्रेसच्या वतीने शेकडो कार्यकर्त्यांनी एकत्र येत सरकारच्या कारवाईचा निषेध केला.

हल्द्वानी येथील घटनेचा राहुल गांधी यांनी निषेध करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली होती. मात्र, या भूमिकेनंतर राहुल गांधी यांच्यावरच हल्द्वानी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याचा आरोप काँग्रेसने केला. विरोधी पक्षाच्या नेत्याचा आवाज दडपण्याचा हा प्रयत्न असून, सरकारची ही भूमिका संविधानविरोधी असल्याचा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला.



आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राष्ट्रपतींना निवेदन सादर केले. राहुल गांधी यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे तातडीने मागे घेण्यात यावेत, तसेच हल्द्वानी येथील कथित मंच शुद्धीकरणाच्या घटनेतील संबंधितांवर ?ट्रॉसिटी कायद्यानुसार गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. उपजिल्हाधिकाऱ्यांनी हे निवेदन स्वीकारले.

आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश तायडे, अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण आणि महानगर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र गवई यांनी केले. यावेळी प्रदेश पदाधिकारी प्रशांत पाचडे, अक्षय राऊत, विजय तिवारी, अशोक अमानकर, सुरेश गिरे, विजय देशमुख उगवेकर, कपिल रावदेव, मो. अकरम, शेख इमाम, मो. सऊद, अबूतल्हा अंसारी, खान शाहरुख कासम कुरैशी, मो. इरफान, मोईन खान, हरीश कटारिया, विनोद अंबुसकर, योगेश थोरात, श्रीकांत सरोदे, प्रशांत प्रधान, शब्बीर भाई, दीपक गवई, विनोद नालट, सुनील वानखडे, तौसीफ शेख, विशाल इंगळे, सुषमा मोरे, विजयाताई खंडारे, किशोर अरुडकर, अतुल खोटरे, मुकुंदराव सोनगडे, सुनील वासनकर, कशिष खान, मुख्तार सर, महेश तायडे, सुनील डाकुलकर, गणेश ताले, सय्यद अझरुद्दीन, राजेश गावंडे, चंद्रकांत बारताशे, तश्वर पटेल, मंगेश सुरवाडे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# महावितरणने गणेश मंडळांचे डिपॉझिट व्याजासह परत करावे!

## आ. साजिद खान पठाण यांची मागणी; मंडळांना रात्री १२ वाजेपर्यंत परवानगी द्या, हॉटेल्स, खाणावळींची वेळही वाढवा



■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांकडून महावितरणकडे जमा असलेल्या डिपॉझिटच्या रकमेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. ग्राहकांच्या थकबाकीवर व्याज आकारणाऱ्या महावितरणने गणेश मंडळांच्या ठेवीवरही व्याज देऊन ती रक्कम परत करावी, अशी स्पष्ट मागणी अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांनी केली. त्याचबरोबर गणेशोत्सवाच्या काळात मंडळांना रात्री दहा वाजताच बंद करण्याऐवजी किमान रात्री १२ वाजेपर्यंत उत्सव सुरू ठेवण्याची मुभा द्यावी, अशी मागणीही त्यांनी केली.

गणेशोत्सवाच्या नियोजनासंदर्भात जिल्हा नियोजन भवनात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस विधान परिषद सदस्य वसंतराव खंडेलवाल, मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने, जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, श्री गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष ?ड. मोतीसिंह मोहता, सिद्धार्थ शर्मा, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### उत्सव शांततेत पार पाडण्याचे आवाहन

गणेशोत्सव उत्साह, भक्ती आणि सामाजिक एकतेचा पर्व आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून उत्सव आनंदाच्या वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन आणि गणेश मंडळांनी परस्पर समन्वय ठेवावा. नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. यावेळी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था, विद्युत पुरवठा, वाहतूक नियोजन, बाजारपेठेच्या वेळा तसेच भाविकांसाठी आवश्यक सुविधांबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. आ. साजिद खान पठाण यांनी प्रशासनाने मंडळांच्या रास्त मागण्यांचा सकारात्मक विचार करून त्यावर प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. तसेच जिल्ह्यातील नागरिकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

### 'डिपॉझिट'चा हिशेबही द्या!

गणेश मंडळांना विद्युत पुरवठा घेण्यासाठी महावितरणकडे डिपॉझिट म्हणून रक्कम भरावी लागते. ही रक्कम अनेक मंडळांची अद्याप महावितरणकडे जमा असल्याचे सांगत आ. पठाण यांनी याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. ग्राहकांकडून थकबाकी वसूल करताना महावितरण व्याज आकारते. मग मंडळांनी जमा केलेल्या डिपॉझिटच्या रकमेबाबतही महावितरणने पारदर्शक भूमिका घेत व्याजासह रक्कम परत करावी, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

### रात्री दहाचा निर्बंध शिथिल करा

गणेशोत्सवात रात्री दहा वाजता मंडळे बंद करण्याच्या निर्बंधाबाबतही आ. पठाण यांनी भूमिका मांडली. गणेशोत्सव हा भाविकांचा उत्सव असून रात्री उशिरापर्यंत नागरिक गणेशदर्शनासाठी बाहेर पडतात. त्यामुळे मंडळांना किमान रात्री १२ वाजेपर्यंत उत्सव सुरू ठेवण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. गणेशदर्शनासाठी कुटुंबासह बाहेर पडणारे नागरिक रात्री उशिरा घरी परततात. अशा भाविकांना भोजनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी गणेशोत्सव काळात बाजारपेठेची वेळ वाढवावी. हॉटेल्स, खाणावळी आणि खाद्यपदार्थांची दुकानेही रात्री उशिरापर्यंत सुरू ठेवण्यास परवानगी द्यावी, अशी सूचना आ. पठाण यांनी केली.


## जाहीर सुचना

सर्वांना ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, श्री. प्रीती एकनाथ हगवणे व एकनाथ राजाभाऊ हगवणे रा. अकोला ता. अकोला जि. अकोला यांनी खालील वर्णनाची मालमत्ता टाटा कॅपिटल हाऊसिंग फायनान्स लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरीत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे अकोला, म.न.प. ता. जि. अकोला, च्या हद्दीतील प्लॉट क्र. ९ शीट क्र. ७५-अ ज्याचे क्षेत्रफळ २६५.७०चौ.मी. वर बांधलेल्या इंद्रप्रस्थ अपार्टमेंट मधील तीसऱ्या माळयावरील गाळा क्र. टी-२ ज्याचे बांधकाम क्षेत्रफळ ६८.७२चौ.मी. असून प्लॉट मधील १/८ अबिभाजित हिस्स्स्यास, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : जोशी चे घर व मधुमालती अपार्टमेंट, पश्चिमेस : बिंद्रा चे घर, ऊत्तरेस : दिनानाथ लहारीया चे घर व दक्षिणेस : गजानन विहार अपार्टमेंट. येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे जुने मुळ रजि. खरेदीखत दस्त क्र. ३९०४ दि. ०७/०८/२०१३ जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे हरविले/गहाळ झाले आहेत. त्याकरीता पो. स्टे. डाबकी रोड, अकोला येथे दि. ०२/०९/२०२६ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार, ताबा अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हि सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यासह आक्षेप नोंदवावा अन्यथा त्यानंतर कोणाचीही हरकत वा ऊजर चालणार नाही,
याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. ०४/०९/२०२६

**अधिवक्ताः संजीव रा. बोचरे,**
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४


# आज 'वैखरी व्याख्यानमाला'तून महाराष्ट्राच्या सद्य:स्थितीवर विचारमंथन

**हनुमंत पवार यांचे व्याख्यान; निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा होणार गौरव**

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

स्व. आमदार प्रतिभाताई (आक्का) तिडके जन्मशताब्दी समिती आणि 'वैखरी व्याख्यानमाला' यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, ५ सप्टेंबर रोजी भव्य व्याख्यान व निबंध स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. तिडके नगर येथील जुने दुर्वांकुर, इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंटीग्रेटिव्ह एज्युकेशनच्या प्रांगणात सायंकाळी ६ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शालेय शिक्षणमंत्री वसंतदादा पुरके, यवतमाळ, राहणार आहेत. पुणे येथील ख्यातनाम विचारवंत हनुमंत पवार हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार असून, 'महाराष्ट्राची सद्य:स्थिती आणि आपली जबाबदारी!' या विषयावर ते मार्गदर्शन करणार आहेत.

समाजातील विविध प्रश्न, महाराष्ट्राची वर्तमान परिस्थिती आणि नागरिकांची सामाजिक जबाबदारी यावर या व्याख्यानातून विचारमंथन होणार आहे. त्यामुळे या कार्यक्रमाकडे शहरातील नागरिकांसह विचारप्रेमींचे लक्ष लागले आहे. दरम्यान, 'वैखरी व्याख्यानमाले'अंतर्गत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा व स्पर्धकांचा या सोहळ्यात गौरव करण्यात येणार आहे.प्रबोधन आणि वैचारिक चळवळीला बळ देणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके तसेच आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४८०/२०२६ — प्रोसेस नं.११०७४/२०२६
चौ.ता. १७/१०/२०२६ — दिनांक : ३१/०८/२०२६

**अर्जदार :** समिक्षा महेश बोरसे रा. व्दारा महेश अशोक बोरसे, शिवाजी नगर, जुने शहर, दुर्गा माता मंदिर जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दिपक जयकृष्णा ढोरे
**पत्ता :-** रा.व्दारा महेश अशोक बोरसे, शिवाजी नगर, जुने शहर, दुर्गा माता मंदिर जवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिपक जयकृष्णा ढोरे यांचे दि. २७/०७/२०२६ रोजी शिवाजी नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३१/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**Change In Name**
I Have change My Name from
**YASHRAJ RAJAN KORPE**
-TO- **YASHRAJ RANJAN KORPE**
My Passport Number - K6322373
My Residential Address In - CHANDRIKA BULDING, JATHERPETH ROAD, MAHAJANI PLOT, Jatharpeth Akola 444005.

**Change In Name**
I Have change My Name from
**SAVITA DOBAJI DONGARE**
-TO- **PRATIBHA PRADIP INGLE**
My Residential Address In Ashok Nagar, Barshitakli Akola 444401

**Change In Name**
I Have change My Name from
**ESHKEERAT KAUR TARANJEET SINGH OBEROI**
-TO- **ESHHKEERAT KAUR TARANJEET SINGH OBEROI**
My Passport Number - N9987384
My Residential Address In Satnam kunj, Amrut Housing society, Satav Square, Birla Mandir Road, Jatharpeth Akola 444005.

**Change In Name**
I Have Change My Name
**MOHD NAASIR MOHD SAHEB**
-To-
**MOHAMMAD NASIR MOHAMMAD SAHEB**
Passport No, N0398008
ADDRESS:- HAFIZ PURA MANGRULPIR, TQ, MANGRULPIR, DIST, WASHIM
.Change in Name - Spouse Name
**ZAHORA ANJUM** -TO- **ZAHURA ANJUM**

**Change In Name**
I Have Change My Name
**ZAHORA ANJUM MOHD NAASIR**
-To-
**ZAHURA ANJUM MOHAMMAD NASIR**
Passport No, N0398015
ADDRESS:- HAFIZ PURA MANGRULPIR, TQ, MANGRULPIR, DIST, WASHIM
.Change in Name.
Mother Name,
**RABIYA BI** -To- **RABIYA BEGUM**
Father Name,
**MOHD SHAFI** -TO- **MOHAMMAD SHAFI**
Spouse Name
**MOHD NAASHIR** -TO- **MOHAMMAD NASIR**


# २० हजार हातांनी घडला गणराय

## चार ठिकाणी एकाच वेळी शाडू मातीच्या मूर्ती

■ प्रतिनिधी | अकोला ■

गणेशोत्सवाची भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा विचार यांचा अनोखा संगम शुक्रवारी अकोल्यात पाहायला मिळाला. शहरातील चार ठिकाणी तब्बल २० हजार विद्यार्थ्यांनी स्वतःच्या हाताने शाडू मातीच्या गणेशमूर्ती घडविल्या. या उपक्रमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देतानाच नव्या पिढीला संस्कृती आणि निसर्गाशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला.

अँड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्प व निलेश देव मित्र मंडळाच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला. तापडिया नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान, स्व. शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे पटांगण, जानोरकर मंगल कार्यालय आणि प्रभात किड्स स्कूल येथे एकाच वेळी कार्यशाळा घेण्यात आल्या. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मातीपासून गणरायाच्या मूर्ती साकारल्या. पीओपीच्या मूर्तीमुळे होणारे जलप्रदूषण टाळणे, घरच्या घरी विसर्जन करणे आणि विसर्जनानंतर त्याच मातीत रोपे लावणे, या संकल्पनेची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. गतवर्षी १० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यंदा सहभाग दुप्पट झाल्याने उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

### महिलांच्या उत्पादनांना 'आत्मनिर्भर महाबाजार'ची बाजारपेठ





### महिलांच्या कष्टांना बाजारपेठ

याच दिवशी तापडिया नगर येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर 'तेजस्वी आत्मनिर्भर महाबाजार' चा शुभारंभ झाला. ४ ते ६ सप्टेंबरदरम्यान आयोजित या बाजारात महिलांनी तयार केलेल्या हस्तकला, गृहउद्योगातील वस्तू, खाद्यपदार्थ व अन्य उत्पादनांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळाली. 'महिलांच्या हाताला काम, उत्पादनाला बाजार आणि कष्टाला योग्य मोबदला' या संकल्पनेतून आयोजित महाबाजारामुळे महिला उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध झाले. कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. शरद कोकाटे, प्रा. डॉ. ज्ञानसागर भोकेर, प्रा. गजानन बोबडे, कल्पना राव, अमृता सेनाड आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. गणरायाच्या भक्तीसोबत पर्यावरणाचा विचार आणि महिलांच्या कष्टांना बाजारपेठ अकोल्यातील या उपक्रमाने गणेशोत्सवाला सामाजिक परिवर्तनाची नवी दिशा दिली.


## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४७९/२०२६ — प्रोसेस नं.११०५२/२०२६
चौ.ता. १३/१०/२०२६ — दिनांक : २९/०८/२०२६

**अर्जदार :** पंकज राजेश बाळकर मो. क ९६२३८७७३४६ रा. राजेश्वर गादी कारखान्याजवळ, ज्ञानेश्वर नगर, डाबकी रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. राजेश विश्वनाथ बाळकर २. सुनिता राजेश बाळकर
**पत्ता :-** रा. व्दारा संतोष बाळकर रा. मातोश्री निवास, गुप्तेश्वर महादेव मंदिराच्या मागे, खंडेलवाल शाळेजवळ, चिंतामणी नगर, डाबकी रोड, जुने शहर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार यांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेश विश्वनाथ बाळकर याचे दि. १३/०९/२००१ रोजी व मयत सुनिता राजेश बाळकर यांचे दि. २८/०८/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १३/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४४०/२०२६ — प्रोसेस नं.१०८८०/२०२६
चौ.ता. ०५/१०/२०२६ — दिनांक : २५/०८/२०२६

**अर्जदार :** १. नंदा श्रीकांत राऊत २. अभय श्रीकांत राऊत मो. क्र. ९८२३८३२३५८ दोघेही रा. श्री. अभीनंदन होम, चायना गेट रोड, व्दारका नगरी, गोकुळ कॉलनी जवळ, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. अभिलाषा किशोर नेमाडे रा. विजयश्री अपार्टमेंट जवळ, डॉ. हेमंत जोशी यांचे हॉस्पिटलचे बाजूला, भागवत प्लॉट, दुर्गा चौक, नेकलेस रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्रीकांत लक्ष्मण राऊत
**पत्ता :-** रा.श्री. अभीनंदन होम, चायना गेट रोड, व्दारका नगरी, गोकुळ कॉलनी जवळ, जवाहर नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीकांत लक्ष्मण राऊत यांचे दि. ०२/०६/२०२६ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २५/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १२६२/२०२६ — प्रोसेस नं.१०७१५/२०२६
चौ.ता. ०७/०९/२०२६ — दिनांक : २०/०८/२०२६

**अर्जदार :** श्री. जगन्नाथ पांडुरंग काथळकर रा. विवेकानंद आश्रम जवळ, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्री. भानुदास पांडुरंग काथळकर रा. मु. पो. चतारी, विठ्ठल मंदिर जवळ, ता. पातूर, जि. अकोला. २. श्री. प्रकाश पांडुरंग काथळकर रा. बलोदे लेआउट, आरोग्य कॉलनी, हिंगणा रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. इंदू नानाआप्पा काथळकर रा. आझाद चौक, बुधवारा, अमरावती. ता. अमरावती व जि. अमरावती. ४. सौ. निर्मला वसंतआप्पा सातरकर रा. इंदिरा कॉलनी, बुऱ्हानपूर, ता. जि. बुऱ्हानपूर, एम. पी. ५. सौ. शोभाताई संभाजीआप्पा कादगे रा. समर्थ नगर, ता. कन्नड, जि. चाळीसगाव.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्री. पांडुरंग तुकाराम काथळकर
**पत्ता :-** रा.विवेकानंद आश्रम जवळ, सुधिर कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. पांडुरंग तुकाराम काथळकर यांचे दि. २९/०८/२०११ रोजी डेहनकर हॉस्पिटल, अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/०९/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयीमध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१३/२०२६ — प्रोसेस नं.१०३०९/२०२६
चौ.ता. २३/०९/२०२६ — दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्री. मनिष शारदाप्रसाद पाठक रा. बिरला रोड, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्रीमती. नेहा अश्विन शुक्ला रा. उमाशंकर अपार्टमेंट, दुसरा माळा, स्टेट बँक समोर, रामदासपेठ, बिरला रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. तारकेश्वरी शैलेंद्र पांडे रा. महाविर चौक, पेंशनपुरा, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. ३. श्रीमती. वैशाली अरविंद मिश्रा रा. ४८७ लोहार पुरा, बाजेरिया, व्हीटीसी महात्मा फुले बाजार, ता. जि. नागपूर. ४. श्री. आशुतोष शारदाप्रसाद पाठक रा. रामदासपेठ, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : व्दारकादेवी शारदाप्रसाद पाठक
**पत्ता :-** रा. बिरला रोड, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत व्दारकादेवी शारदाप्रसाद पाठक यांचे दि. १४/१२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६६**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त

### रेल्वे स्थानकाबाहेरून दुचाकी चोरी

**पुलगाव**-रेल्वे स्थानक परिसरात कामानिमित्त उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी अजितकुमार रामकुमार साद, वय २९, रा. भीमनगर, रेल्वे क्वार्टर, देवळी यांनी पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, फिर्यादीने आपली मोटारसायकल रेल्वे गेटच्या बाहेर उभी करून कार्यालयीन कामासाठी आत गेले होते. सुमारे तासाभराने परतल्यानंतर दुचाकी जागेवर आढळली नाही. रेल्वे परिसरासह बसस्थानक व पुलगाव शहरात शोध घेऊनही वाहनाचा ठावठिकाणा लागला नाही. अज्ञात चोरट्याने हिरो होंडा कंपनीची आकाशी-काळ्या रंगाची पॅशन प्लस मोटारसायकल क्रमांक एमएच ३१ सीएक्स ६६३९, अंदाजे २५ हजार रुपये किमतीची, चोरून नेल्याचे तक्रारीत नमूद आहे. पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### वृद्ध दाम्पत्याच्या घरावर चोरट्यांचा डल्ला

**दहेगाव गोसावी** - देवदर्शनासाठी बाहेर गेलेल्या वृद्ध दाम्पत्याच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्यांनी सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा सुमारे ५७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी ७० वर्षीय महिलेने दहेगाव गोसावी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.तक्रारीनुसार, महिला पतीसह देवदर्शनासाठी बाहेर गेल्या होत्या. घराला कुलूप लावून गेल्यानंतर परत आल्यावर घराचे कुलूप तुटलेले आढळले. घरातील लोखंडी कपाटाची पाहणी केली असता त्यातील दागिने व रोख रक्कम गायब असल्याचे निदर्शनास आले. चोरट्यांनी सोन्याचे लॉकेट, मनी, बांगड्या, अंगठी, इतर दागिने, चांदीचे जोडवे आणि १० हजार रुपये रोख असा ऐवज चोरून नेला. एकूण ५७ हजार ८०३ रुपयांचा माल चोरीला गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### ३० वर्षीय तरुण बेपत्ता

**हिंगणघाट**-घरातील पैसे आणि वडिलांचे बँक पासबुक घेऊन सात आणायला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला ३० वर्षीय तरुण तब्बल काही दिवसांपासून बेपत्ता आहे. शंकर बबनराव दुकरे, रा. सावळी (वाघ), ता. हिंगणघाट असे बेपत्ता तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी त्याच्या आईने हिंगणघाट पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.शंकर हा शेती व रोजमजुरीचे काम करीत होता. यापूर्वीही तो कोणाला काहीही न सांगता बाहेरगावी जाऊन काही दिवसांनी परत येत असल्याचे कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले. मात्र यावेळी तो घराबाहेर पडल्यानंतर परतलाच नाही. नातेवाइक, मित्र तसेच परिचितांकडे शोध घेऊनही त्याचा ठावठिकाणा लागला नाही. शंकरकडे मोबाईल नसल्याने संपर्कही होऊ शकलेला नाही. त्यामुळे कुटुंबीयांमध्ये चिंतेचे वातावरण असून, कोणीतरी त्याचे अपहरण करून लपवून ठेवले असावे, असा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी बेपत्ता प्रकरणाची नोंद करून शोध सुरू केला आहे.

### पायी जाणाऱ्या वृद्धाला दुचाकीस्वाराची धडक

**पुलगाव**-पायी घरी जाणाऱ्या वृद्धाला अज्ञात दुचाकीस्वाराने मागून धडक देऊन जखमी केल्याची घटना पुलगाव शहरातील गायत्री हॉटेल परिसरात घडली. सुरेश विठ्ठलराव बेलोरकर, वय ७४, असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी त्यांच्या नातेवाइकाने पुलगाव पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.सुरेश बेलोरकर हे पापडकर लेआउट परिसरातून बसस्थानकाच्या दिशेने पायी जात होते. गायत्री हॉटेलजवळ पोहोचले असता अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना मागून धडक दिली. धडक दिल्यानंतर दुचाकीस्वार घटनास्थळावरून पसार झाला. दरम्यान, एका व्यक्तीने मोबाईलवरून त्यांच्या कुटुंबीयांना अपघाताची माहिती दिली. त्यानंतर नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली.अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध पुलगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे.

### प्रवासात ८० हजारांचे मंगळसूत्र लंपास

**वर्धा**-बसने प्रवास करताना महिलेच्या दोन पर्स गायब होऊन त्यातील सुमारे ८० हजार रुपये किमतीची सोन्याची मंगळसूत्रे चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी महिलेने रामनगर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे.तक्रारीनुसार, महिला नागपूरहून एसटी बसने वर्ध्याच्या दिशेने प्रवास करीत होत्या. प्रवास सुरू करताना त्यांच्या पर्समध्ये सोन्याचे दागिने, रोख रक्कम आणि घराच्या चाव्या असल्याची खात्री त्यांनी केली होती. प्रवासादरम्यान बस बदलावी लागली. त्यानंतर त्या वर्ध्यातील साने गुरुजी नगर परिसरात पोहोचल्या. घराची चावी काढण्यासाठी पर्स शोधली असता दोन्ही पर्स गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. एका पर्समध्ये दोन तोळ्यांचे मोठे सोन्याचे मंगळसूत्र अंदाजे ६० हजार रुपये किमतीचे, तर दुसऱ्या पर्समध्ये लहान सोन्याचे मंगळसूत्र अंदाजे २० हजार रुपये किमतीचे होते. पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### नापास बियाण्यांवरून तिघांचा गोंधळ

**हिंगणघाट**-सातेफळ रोडवरील एका बियाणे प्लांटमध्ये प्रयोगशाळेत नापास झालेल्या कापूस बियाण्यांच्या पैशांवरून तिघांनी गोंधळ घातल्याची घटना २७ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी प्लांटच्या अधिकाऱ्याच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उदय निवृत्ती बनकर, दीपक पंजाबराव पवार आणि प्रदीप मुरलीधर मोरे यांनी कापूस बियाणे प्लांटकडे दिले होते. प्रयोगशाळेतील तपासणीत बनकर यांचे १ हजार ८२ किलो, पवार यांचे ७२९.५० किलो आणि मोरे यांचे २३८ किलो बियाणे नापास झाले. नापास बियाणे परत घेऊन जाण्यास सांगूनही संबंधितांनी ते नेले नाही. २७ ऑगस्टला तिघांनी प्लांट परिसरात येऊन गोंधळ घातला. तसेच शिवीगाळ करून धमकी दिल्याचा आरोप आहे. याप्रकरणी पोलिसांनी बीएनएसच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

### अनोळखी इसमाचा मृत्यू मिळाला

**वर्धा**-रामनगर परिसरात आजारी अवस्थेत आढळून आलेल्या अंदाजे ७५ वर्षीय अनोळखी इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना २९ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित इसम सामाजिक कार्यकर्ता असल्याचे सांगण्यात आले असून, काही दिवसांपूर्वी तो रामनगर परिसरात आजारी अवस्थेत आढळून आला होता.

## इतिहास पुसून विकास कशाला; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र

# ऐतिहासिक कारागृहाच्या नवीन इमारतीला अमर काळेंचा विरोध

**वर्धा/जनमाध्यम**

स्वातंत्र्यलढ्याच्या आठवणींचा साक्षीदार असलेल्या वर्ध्यातील १८६७ साली उभारण्यात आलेल्या इंग्रजकालीन जिल्हा कारागृहावर आता विकासाच्या नावाखाली हातोडा पडणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. तब्बल दीडशे वर्षांहून अधिक काळ इतिहासाची साक्ष देणारी ही भक्कम वास्तू पाडून नवीन कारागृह उभारण्याच्या हालचालींना खा.अमर काळे यांनी तीव्र विरोध केला आहे.यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून ही वास्तू पाडण्याऐवजी ऐतिहासिक वारसास्थळ म्हणून जतन करण्याची मागणी केली आहे.

नवीन कारागृहाची गरज नेमकी का निर्माण झाली,याचे उत्तर प्रशासनाने जनतेसमोर स्पष्ट करावे,अशी मागणीही आता जोर धरू लागली आहे.या जुन्या कारागृहातून कैदी पळाले आहेत का? इमारत धोकादायक ठरली आहे का? कारागृहाची जागा अपुरी पडत आहे का?याबाबत ठोस माहिती न देता केवळ नवीन इमारतीसाठी जुनी वास्तू पाडण्याचा आग्रह कशासाठी,असा प्रश्न उपस्थित होत आहे.



वाढत्या कैद्यांची संख्या आणि भविष्यातील गरज लक्षात घेऊन नवीन कारागृह उभारायचे असेल तर त्याला विरोध नाही. इंझापुर-सालोड परिसरात नवीन कारागृहासाठी जागेचा शोध सुरू असल्याचेही सांगितले जात आहे. मात्र, जुनी ऐतिहासिक वास्तू पाडण्याची काय गरज सध्याच्या कारागृह परिसरातच मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध असल्यास त्याच ठिकाणी नवीन बांधकाम करता येणार नाही का, हा प्रश्नही अनुत्तरित आहे.

स्वातंत्र्यलढ्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या कारावासाच्या आठवणी या वास्तूशी जोडलेल्या आहेत. त्यामुळे ही केवळ चार भिंतींची इमारत नसून वर्ध्याच्या इतिहासाचा जिवंत दस्तऐवज आहे. अशा वास्तूचा वारसा जपण्याऐवजी तो जमीनदोस्त करण्याचा निर्णय झाला तर तो इतिहासावरच घाला ठरेल. सरकारी जमीन खासगीकरणाच्या विळख्यात जाणार नाही ना, मध्यवर्ती भागातील मौल्यवान शासकीय जागेवर खासगी व्यावसायिकांची नजर असल्याची चर्चा असताना प्रशासनाने सर्व व्यवहार पारदर्शक ठेवावेत, अशी मागणीही खा.काळे यांनी केली आहे.

नवीन कारागृह बांधा, पण इतिहासाची कबर खोदू नका जुनी वास्तू जतन करून तिचा वारसा पर्यटन, इतिहास आणि स्वातंत्र्यसंग्रामाच्या स्मृतींशी जोडण्याचा पर्याय शासनाने गांभीर्याने विचारात घ्यावा, अशी मागणी आता पुढे आली आहे.

## मंजुरीच्या दोन वर्षांनंतरही रस्ता रखडला; संत्रा उत्पादक शेतकरी संकटात

### पेठ अहमदपूर-नवीन आष्टी-जेतापूर-लहान आर्वी मार्गाची चाळण

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

दोन वर्षांपूर्वी मंजुरी मिळूनही पेठ अहमदपूर–नवीन आष्टी–जेतापूर–लहान आर्वी लिंक रोडचे काम अद्याप रखडले आहे. चार महिन्यांपूर्वी नाल्याचे खोदकाम करून कामाला सुरुवात झाल्याचे दाखवण्यात आले; मात्र त्यानंतर काम बंद पडल्याने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत झाला आहे. रस्त्याबरोबरच भगवती नाल्यावरील मंजूर पुलाचे कामही रखडल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



नाल्याच्या खोदकामातून निघालेली काळी माती रस्त्यावरच टाकण्यात आल्याने मार्गाची अक्षरशः चाळण झाली आहे. पावसामुळे रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून शेतकऱ्यांना शेतात जाणेही मुश्कील झाले आहे. कृषी साहित्य शेतात नेणे आणि शेतमाल बाहेर काढणेही जिकिरीचे बनले आहे.

परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या संत्र्याच्या बागा असून आता संत्र्याची तोडणी सुरू होण्याची वेळ आली आहे. मात्र रस्ताच वाहतुकीस योग्य नसल्याने संत्रा बाजारपेठेत नेणार कसा, असा संतप्त प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. रस्ता वेळेत झाला नाही तर संत्र्याचे नुकसान होऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढण्याची भीती आहे.

या प्रश्नावर गंगाधर मडावी, रामदास देशमुख, बंडू देशमुख, शेख कदीर, साहेबराव लांडे, मनिष लांडे, प्रवीण परणकर आणि त्र्यंबक कुकडे यांच्यासह शेतकऱ्यांनी आमदार सुमितभाऊ वानखोडे यांना निवेदन दिले.रस्त्याचे काम तातडीने सुरू करा; अन्यथा उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल’, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## डोळे जपायचे की उत्सव; लेझर लाईटवर जिल्हाधिकाऱ्यांचा हातोडा

### आदेश धाब्यावर बसवल्यास थेट कारवाई

**वर्धा/जनमाध्यम**

सण-उत्सवांच्या नावाखाली मिरवणुकांमध्ये होणारा लेझर लाईटचा जीवघेणा झगमगाट आता बंद होणार आहे. दहीहंडी, पोळा, तान्हा पोळा आणि सार्वजनिक गणेशोत्सवाच्या काळात वर्धा जिल्ह्यात लेझर लाईट, हाय-पॉवर लेझर बीम तसेच लेझर शोच्या वापरावर जिल्हा प्रशासनाने पूर्णपणे बंदी घातली आहे.

नागरिकांच्या डोळ्यांच्या सुरक्षेसह कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम १६३ अन्वये हे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. ४ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २०२६ या कालावधीत संपूर्ण वर्धा जिल्ह्यात हा आदेश लागू राहणार आहे.

मिरवणुकीत वापरले जाणारे हाय-पॉवर लेझर बीम डोळ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकतात. तीव्र प्रकाशकिरणांमुळे डोळ्यांच्या रेटिना आणि कॉर्नियाला गंभीर इजा होण्याचा धोका असतो. उत्सवाचा आनंद घेताना नागरिकांच्या डोळ्यांवर संकट ओढवू नये, यासाठी



प्रशासनाने कठोर पाऊल उचलले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही. संबंधित यंत्रणांना आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या असून नियम मोडणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईचा इशारा जिल्हाधिकारी यांनी दिला आहे.

## मध्य प्रदेशातून दारूची तस्करी; तिघे जेरबंद

### सियाझ कारमधून तब्बल १.९४ लाखांची विदेशी दारू जप्त

**वर्धा/जनमाध्यम**

मध्य प्रदेशातून विदेशी दारूची तस्करी करून वर्ध्याकडे आणणाऱ्या तिघांना सेवाग्राम पोलिसांनी सापळा रचून पकडले. दत्तपूर येथील उड्डाणपुलाजवळील सर्व्हिस रोडवर गुरुवारी ही कारवाई करण्यात आली. आरोपींकडून विदेशी दारूसह तब्बल ९ लाख ९४ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी दत्तपूर परिसरात पवनारकडून वर्ध्याकडे येणाऱ्या सर्व्हिस रोडवर नाकेबंदी केली. यावेळी एमएच १५ एफएफ ०३०९ क्रमांकाच्या मारुती सुझुकी सियाझ कारला अडवून तपासणी केली असता कारमध्ये मोठ्या प्रमाणात विदेशी दारू आढळून आली

या प्रकरणात अनिकेत उमेश दुरतकर (२२, रा. आर्वी नाका, वर्धा), प्रशिल बंडुजी गेडाम (२२, रा. नालवाडी, वर्धा) आणि अंकुश रामदास भट (२२, रा. पवनार) यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.पोलिसांनी कारमधून रॉयल स्टॅग, ऑफिसर्स चॉईस, ऑफिसर्स चॉईस ब्लू, मॅजिक मूव्हमेंट, रॉयल चॅलेंज आणि इम्पिरियल ब्लू या ब्रँडची विदेशी दारू तसेच किंगफिशर बिअर जप्त केली. जप्त दारूची किंमत सुमारे १ लाख ९४ हजार ९५० रुपये, तर कारची किंमत ८ लाख रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सेवाग्राम पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील मंडलिक यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

## खदानीतील बेअरिंग चोरले

**वर्धा/जनमाध्यम**

येळाकेळी येथील खदानीवरून स्टोन क्रशर मशीनचे महागडे बेअरिंग आणि पोकलेन मशीनचा लोखंडी पत्रा असा एकूण ९० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेल्याची घटना ३१ ऑगस्ट रोजी घडली. या चोरीचा छडा सावंगी मेघे पोलिसांनी अवघ्या दोन तासांत लावत दोन आरोपींना अटक केली. याप्रकरणी सावंगी मेघे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे



गांभीर्य लक्षात घेऊन ठाणेदार विनोद गिरी यांनी गुन्हे शोध पथकाला आरोपींचा माग काढण्याच्या सूचना दिल्या. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे प्रविण समाधान इंगळे वय २९ रा. येळाकेळी आणि नयन महिपालसिंग बंडवाल वय २९ रा. खेरडा यांना ताब्यात घेण्यात आले.चोरीची कबुली दिल्यानंतर त्यांच्या ताब्यातून खदानीजवळ लपवून ठेवलेला ९० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलिस हेड कॉन्स्टेबल संजय पंचभाई करीत आहेत.

## अल्पवयीनांच्या हातात बाईक; सिंदी पोलिसांचे डोळे बंद

### अपघात होण्याची वाट पाहताय का? पालकांसह पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह

**सिंदी रेल्वे/जनमाध्यम**

शहरातील रस्त्यांवर अल्पवयीन मुलांकडून दुचाकी चालविण्याचा धोकादायक प्रकार खुलेआम सुरू आहे. वाहतूक नियमांची अक्षरशः पायमल्ली होत असताना सिंदी पोलिस प्रशासन नेमके कोणाची वाट पाहत आहे, असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. एखादा मोठा अपघात होऊन जीव गेल्यानंतरच पोलिसांना जाग येणार का, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमध्ये उमटत आहे.

शहरातील मुख्य रस्ते, शाळा आणि महाविद्यालय परिसरात अल्पवयीन मुले बिनधास्तपणे दुचाकी घेऊन फिरताना दिसतात. त्यातही भरधाव वेग, हेल्मेटचा अभाव,



एकाच दुचाकीवर तिघांचा प्रवास आणि वाहतूक नियमांना केराची टोपली दाखविण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. या बेदरकारपणामुळे स्वतः अल्पवयीन मुलांसह रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांच्याही जीविताला धोका निर्माण झाला आहे.

**पालकांची मूक संमती की बेफिकिरी?**

मुलांच्या हट्टापायी त्यांच्या हातात दुचाकी देणाऱ्या पालकांची जबाबदारीही निश्चित होणे गरजेचे आहे. वाहन चालविण्याचे वय आणि नियम माहीत असतानाही अल्पवयीन मुलांना वाहन देणाऱ्या पालकांवर कारवाईचा बडगा उगारला तरच या प्रकाराला आळा बसू शकतो.

**अपघातानंतर कारवाईचा फार्स नको**

पोलिस प्रशासनाकडून अधूनमधून वाहतूक नियमांबाबत जनजागृती केली जाते. मात्र प्रत्यक्ष रस्त्यावर नियम तोडणाऱ्यांवर किती कारवाई होते, हा प्रश्न कायम आहे. अल्पवयीन बाईकस्वारांवर वेळीच कारवाई न झाल्यास उद्या एखाद्या कुटुंबावर मोठे संकट कोसळण्याची शक्यता आहे.

त्यामुळे सिंदी पोलिसांनी आता केवळ बघ्याची भूमिका न घेता शहरात विशेष तपासणी मोहीम राबवावी. अल्पवयीन वाहनचालकांसोबतच त्यांना वाहन देणाऱ्या पालकांवरही नियमानुसार कठोर कारवाई करावी. अपघाताची वाट पाहण्याऐवजी पोलिस प्रशासनाने आजच कारवाईचा दंडुका उगारावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**नावात बदल**

माझे पूर्वी GULAM MUSTAFA NAGANI असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील GULAM MUSTAFA YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: - शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर S5098506 वरील माझे GULAM MUSTAFA MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील GULAM MUSTAFA YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर U9927806 वरील माझे NAUSHIN BANU NAGANI असे नाव होते. माझ्या बँक खाते व आधार कार्ड वरील NAUSHIN GULAM MUSTAFA NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पूर्वी GULAM MUSTAFA MOHAMMAD YUSUF NAGANI असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील GULAM MUSTAFA YUSUF NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: - शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पूर्वी NAUSHIN BANU GULAM MUSTAFA NAGANI असे नाव होते. माझ्या आधार व पासपोर्ट वरील NAUSHIN GULAM MUSTAFA NAGANI नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: - शास्त्री नगर आर्णी जिल्हा यवतमाळ ४४५१०३**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर M003368 वरील माझे KHALIDA BI असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील KHALIDA SHER KHAN PATHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता : महादेवपुरा जिल्हा वर्धा ४४२००१**

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर M0789930 वरील माझे SHERKHA HANIPKHA PATHAN असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील SHER KHAN HANIF KHAN PATHAN नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता: महादेवपुरा जिल्हा वर्धा ४४२००१**

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २७९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. ५८०/२०२६ ने.ता.२७.१०.२०२६

**अर्जदार -**
१. श्री.बळवंत माणिकराव महल्ले, वय ६६ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा.दुर्गवाडा, ह.मु.४६/११, उत्कर्ष सयानी रोड, खेड गल्ली प्रभादेवी, मुंबई
२. सौरभ बळवंतराव महल्ले, वय ३५ वर्षे, धंदा - व्यवसाय, रा.दुर्गवाडा, ह.मु.फ्लॅट एल-२३२, नॉर्थ एवेन्यू रोड, पोतोहार नगर, सांताकृझ वेस्ट, मुंबई

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार नं.१ ची पत्नी तर अर्जदार नं.२ ची आई **नामे कल्पना बळवंतराव महल्ले** हे दि.**०३.०९.२०२१** रोजी **हिंदुजा हॉस्पीटल, मुंबई** येथे मयत झालेले आहेत. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ३१.०८.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

**दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.)क्र.२४२/२०२६ ने.ता.०८.१०.२०२६

**अर्जदार :**
१. किशोर एकनाथ चांदणे
२. एकनाथ लालुजी चांदणे, दोन्ही रा.सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. शशिकला ज्ञानेश्श्वरराव खंडारे, रा.रिध्दपूर बेलोरा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४. नालुबाई माणिकराव इंगोले, रा.सिध्दार्थ नगर, अमरावती, ता.जि.अमरावती
५. रुख्मा विनोद तायडे, रा.शिरजगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **शकुंतला एकनाथ चांदणे** यांचा मृत्यू दि.**१९.०५.२०२६** रोजी सामान्य रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ हा मुलगा आहे. अर्जदार नं.२ हे पती, अर्जदार नं.३ ते ५ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **०२ सप्टेंबर २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१७५०/२०२६
**मिना अधिक चार -वि- निरंक**
पुढील ता.२३.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Meena Kisan Wankhade, Aged about 76 Yrs. Occu.: Nil R/o Narsingpur, Tq.Dist.Amravati.
2. Sharad Krushnarao Wankhade, Aged about 62 Yrs. Occu.: Retired R/o State Bank Colony, Hingna Road, Nagpur, Tq.Dist.Nagpur
3. Ramesh Krushnarao Wankhade, Aged about 57 Yrs. Occu.: Retired R/o Gorakshan Road, Akola, Tq. Dist. Akola
4. Sangeeta Dharmendra Gawai, Aged about 52 Yrs. Occu.: Housewife R/o Kabir Nagar Housing Colony, Raipur, Chhatisgarh
5. Anita Manohar Thorat, Aged 53 Yrs. Occu.: Nil R/o Gadge Nagar, Nagpur

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Kisan Narsaji Wankhade हे दिनांक 09.08.2025 रोजी **नरसिंगपूर, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Meena Kisan Wankhade+4 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Meena Kisan Wankhade+4 वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३१.०८.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## पाहिजेत

**अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्था**
**अभिनव शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित**
**अभिनव विद्यालय, जनुना, ता.नांदगांव खंडेश्वर**
**जि.अमरावती**

| अ. क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | वर्ग | शैक्षणिक पात्रता | वेतनश्रेणी /मानधन | अनुदान प्रकार | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | विशेष शिक्षण सेवक (क्रिडा) | ०१ | ९,१० करीता | B.Sc. (Math) B.P.Ed. MS-CIT | शासकीय नियमानुसार | १०० % अनुदानित | सेवानिवृत्तीमुळे रिक्त पद |

वरील पदाकरीता पात्रताधारक ईच्छुक उमेदवारांनी दिनांक १३.०९.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता अर्ज व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रासह मुलाखतीसाठी स्वखर्चाने अभिनव विद्यालय, जनुना, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे उपस्थित रहावे. अनुभव असणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य देण्यात येईल.

**अध्यक्ष / सचिव**
**अभिनव शिक्षण संस्था,**
**अमरावती**

**कु.अनुजा रेखा हरिभाऊ ब्राम्हणे**
**मुख्याध्यापिका,**
**अभिनव विद्यालय, जनुना,**
**ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती**

---

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की माझे पक्षकार नामे, **सुरज कैलाश खांडेकर** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - दर्यापूर, प्लॉट क्र.११०/१ ता.दर्यापूर आणि जि.अमरावती

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **सुरज कैलाश खांडेकर** हे **कृष्णराव लक्ष्मीनारायण शिवणकर** यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तदनंतर सुरज कैलाश खांडेकर यांनी Nido Home Finance Ltd. येथे गृहकर्जासाठी अर्ज केला असता सदर मिळकतीचे पुर्वीचे मूळ खरेदी खत दि.३०.०९.२०११ रोजीचे दस्त क्र.२४१६ मूळ खरेदीखत गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, राष्ट्रीयकृत, खाजगी, पतसंस्था, सहकारी, इतर बॅंक बोजा, सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बॅंक गहाण, बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **१४** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Nido Home Finance Ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार ठरल्याप्रमाणे खरेदीखत नोंदवून झाल्यावर वरील नमुद मालमत्ता गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर सुचना देत आहे.

ठिकाण- ता.आणि जि.अमरावी
दि.०३.०९.२०२६

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)**
**अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१८७०/२०२६**
**शितलदास + १ विरुध्द निरंक**
**पुढील ता.०७.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Shitaldas Aayaldas Tehalani**
Age 52 years. Occu.: Business
R/o. Near Nanakani Dharamashala, Nanak Nagar, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati
2. **Shiva Rameshlal Tahalani**
Age 34 years. Occu.: Business
R/o. Nanak Nagar, Rampuri Camp, Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :-** NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Aayaldas Hotchand Tehalani** हे दिनांक **२०.०१.२०१०** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार Shitaldas Aayaldas Tehalani + 1** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shitaldas Aayaldas Tehalani + 1** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०३.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

---

# मराठा विवाह मंडळाची दि.६ सप्टेंबरला आमसभा

**अमरावती/प्रतिनिधीः-** मराठा समाजातील प्रसिद्ध सामाजिक संस्था मराठा विवाह मंडळ व वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.६ सप्टेंबरला दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. मराठा विवाह मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. गणेश पाटील यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सभेत मंडळाच्या पुढील ध्येयधोरण व अन्य विषयावर चर्चा करण्यात येईल.

मंडळाच्या नारायण नगर बगीचा, रुख्मिणी नगर येथील कार्यालयात आयोजित या सभेला मंडळाच्या सदस्यांनी उपस्थित रहावे तसेच दररोज दुपारी ४ ते ६ यावेळेत उपवर युवक युवती आणि पालकांनी उपवर मुलामुलींची नोंदणी करून मंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापुरे यांनी केले आहे.

---

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की माझे पक्षकार नामे, **प्रवीण प्रभाकर मानेकर आणि कांचन प्रवीण मानेकर** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - राजापेठ, प्रगणे-बडनेरा, प्लॉट क्र.६/२ याचे एकुण क्षेत्रफळ ९२० चौ.फुट पैकी नझूल शिट क्र.६५ ता.आणि जि.अमरावती

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **प्रवीण प्रभाकर मानेकर व कांचन प्रवीण मानेकर** हे **रामा दामोधर पाटील** यांच्याकडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तसेच **रामा दामोधर पाटील** यांना **श्री.श्याम उर्फ घनश्याम दामोधर पाटील** यांनी बक्षीस पत्राद्वारे दिली आहे. वरील नमुद मालमत्ता ही वारसाने-वडिलोपार्जित मिळालेली आहे. सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बॅंक गहाण, बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Piramal Finance Ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार ठरल्याप्रमाणे खरेदीखत नोंदवून झाल्यावर वरील नमुद मालमत्ता गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर सुचना देत आहे.

ठिकाण- ता.आणि जि.अमरावती
दि.०४.०९.२०२६

शिक्का

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

---

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

---

महाराष्ट्र शासन

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),(अ.व.प्र.क्र.४) अमरावती यांचे कार्यालय,**
**जिल्हा - अमरावती**
**दुरध्वनी क्र.०७२१-२६६३४४९**
Email-SLAOUWP4@gmail.com
**क्र.मं.अ./उपजि/भू.सं./अ.व.प्र.क्र.४/कावि-२००/२०२६ दि.२०.०८.२०२६**

# "कलम-११" अधिसूचना

**(भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)**

**भूसंपादन प्रकरण क्र.७३/४७/२०२५-२६**
**मौजा- वासलापूर ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती**

ज्याअर्थी, भुमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ **(२०१३ चा ३०)** यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना महसूल व वन विभाग क्र.**संकीर्ण-११/२०१४/प्र.क्र.७७/अ-२, दि.११ सप्टेंबर २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे.)** त्याद्वारे असे अधिसुचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेनुसार समुचित शासन असलेल्या अमरावती जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन **(यात यापुढे जिचा निर्देश उक्त जमीन असा करण्यात आला आहे.)** सार्वजनिक प्रयोजनासाठी **(यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे.)** आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या **अनुसूची-दोन** मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोटकलम-१ च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भुमीसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत).

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमुद करावा.)

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल,

परंतु, आणखी असे की. कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी यांच्याकडून भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ **(यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे)** यांच्या नियम १० च्या उपनियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अ.व.प्र.क्र.४, अमरावती** यांना पदनिर्देशित करीत आहे.

तसेच मा.जिल्हाधिकारी, अमरावती यांचे परिपत्रक **क्र.** अ.का/प्र.अ/भूसंपादन/कावि-३१८/२०२५ दिनांक ०८.०७.२०२५ अन्वये भुसंपादन प्रस्तावाशी निगडीत कलम ११ अधिसुचनेची कार्यवाही संबंधित भूसंपादन अधिकारी यांचे स्तरावरुन करण्याकरीता आदेशित करण्यात आले आहे.

### अनुसूची-एक
### जमिनीचे वर्णन
**मौजा- बासलापूर तालुका - चांदूर रेल्वे, जि.- अमरावती**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/ गट नंबर | अंदाजित क्षेत्र हे.आर.मध्ये |
|---|---|---|
| १. | १० | ०.१५ |
| २ | १५ | ०.२० |
| ३. | १६ | ०.८१ |
| ४. | १७/१, १७/२ | ०.६९ |
| ५. | १८ | ०.२८ |
| ६. | १९ | ०.४० |
| ७. | २० | ०.२१ |
| ८. | २१ | ०.२५ |
| ९. | २२ | ०.००३ |
| १०. | २५ | ०.०००१ |
| ११. | ६७ | ०.०९ |
| **एकुण क्षेत्र हे.आर.** | | **७.१९** |

### अनुसूची-दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नांव** - **वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत मुख्य जोड कालवा-२ चे कामाकरीतावैनगंगा नळगंगा नदीजोड**

**प्रकल्प कार्याचे वर्णन** - **वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत मुख्य जोड कालवा-२ चे कामाकरीतावैनगंगा नळगंगा नदीजोड**

**सामाजिक मिळणारे** - वैनगंगा नळगंगा नदीजोड प्रकल्पांतर्गत मुख्य जोड-कालवा-२ कामाचे निर्मितीमुळे जवळपासच्या क्षेत्रात पाणी पातळीत वाढ होऊन सिंचनासाठी पिण्यासाठी पाणी उपलब्ध होईल. तसेच मत्स्य व्यवसाय, पशु संवर्धन यामध्ये वाढ, कुटीर उद्योगास फायदा व रोजगार निर्मिती इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधा उपलब्ध झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात भर पडून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होणार आहे.

### अनुसूची-तीन
**बाधित व्यक्तिंचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**
**विस्थापनाची आवश्यकता नाही. सबब माहिती निरंक**

### अनुसूची-चार
(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)

**सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश**

विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती यांचे पत्र क्र.सहआ/पुनर्व/समअ/भुस-२/१०-कावि/१०२३/२०२६ दिनांक २७.०७.२०२६ अन्वये नियम २०१३ च्या प्रकरण २ (सामाजिक आघात निर्धारण) व प्रकरण ३ (अन्न सुरक्षा विषयक तरतुदी लागू होत नाहीत. त्या अनुषंगाने प्रस्तावित प्रकल्पास नव्याने सूट देण्याची आवश्यकता नाही.

### अनुसूची-पाच
**(नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील)**

**अ.** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम - प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही.
**ब.** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता - निरंक
**क.** ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील. - निरंक

**टीप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) अ.व.प्र.क्र.४ अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरिक्षण करता येईल.**

**दिनांक - २०.०८.२०२६**
**ठिकाण - अमरावती**

**(प्रसन्नजीत चव्हाण)**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)**
**(अ.व.प्र.क्र.४) अमरावती**

**(जिमाका/अम/जाही/१०२/२०२६)**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



## संतांचे विचार आत्मसात केल्यास देश नंदनवन होईल : डॉ.पुलकुंडवार

**मोर्शी-** विदर्भातील संत गाडगेबाबांनी आपल्या कृतीतून स्वच्छतेचा संदेश दिला, तसेच अंधश्रद्धा चुकीची असल्याबाबत जनजागृती केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीते'च्या माध्यमातून गावातील शेवटच्या टोकावरील माणसापर्यंत आपले विचार पोहोचविण्याचा प्रयत्न केला. आजही ग्रामगीतेवर लोकांची श्रद्धा असून, तिचे पठण करणारी अनेक मंडळी उपलब्ध आहेत. या संतांचे विचार आत्मसात करून त्यानुसार आचरण केल्यास देशाचे नंदनवन व्हायला वेळ लागणार नाही, असे प्रतिपादन ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत राज्यस्तरीय मूल्यमापन तपासणीसाठी मोर्शी तालुक्यातील पार्डी ग्रामपंचायतीची पाहणी करण्यात आली.या कार्यक्रमाला पोपटराव पवार, मल्लिनाथ कलशेट्टी, श्रीधर दुबे, गिरीश भालेराव, शारदा गायधने, प्रशांत पाटील, सागर मनोहरे, तहसीलदार सागर ढवळे, गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, पार्डीच्या सरपंच वर्षा वानखडे, उपसरपंच प्रवीण ठवळी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. याशिवाय डिजिटल बोर्ड, मृत व्यक्तीच्या नावाने वृक्षारोपण आणि घरावर क्यूआर कोड यांसारखे नाविन्यपूर्ण उपक्रमही राबविण्यात आले आहेत. या उल्लेखनीय कामगिरीच्या आधारे राज्यातील सुमारे २८ हजार ग्रामपंचायतींपैकी १२ पात्र ग्रामपंचायतींची राज्यस्तरीय तपासणीसाठी निवड करण्यात आली आहे.ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय समितीने पार्डी ग्रामपंचायतीमार्फत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध विकासकामांची पाहणी करून मूल्यमापन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पार्डीचे उपसरपंच प्रवीण ठवळी यांनी केले. संचालन गजानन चौधरी यांनी, तर आभार गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम यांनी केले.पार्डी ग्रामपंचायतीच्या सरपंच वर्षा वानखडे, उपसरपंच प्रवीण ठवळी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी माधुरी देवघरे तसेच ग्रामस्थांनी अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केले.

पार्डी ग्रामपंचायतीच्या या उल्लेखनीय कामगिरीसाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) बालासाहेब बायस,गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रीती खटिंग, विस्तार अधिकारी पंचायत सुधाकर भिवगडे,भोजराज पवार तसेच पंचायत समिती व ग्रामविकास विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व परिश्रम महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

### बच्चू कडूंच्या संकल्पनेला तोंडगावात मूर्त रूप

# १.४९ कोटींची डिजिटल शाळा विद्यार्थ्यांच्या सेवेत

## ग्रामीण शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड; ९९ विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज शाळेचे लोकार्पण

**तोंडगाव-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरातील विद्यार्थ्यांप्रमाणे आधुनिक आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात, या उद्देशाने आ. बच्चू कडू यांनी राज्यमंत्री असताना मांडलेल्या संकल्पनेला तोंडगाव येथे मूर्त रूप मिळाले. १ कोटी ४९ लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेच्या नवीन डिजिटल इमारतीचे लोकार्पण बुधवारी परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत करण्यात आले.



अचलपूर विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी बच्चू कडू यांनी ११ शाळांची निवड करून डिजिटल शाळा उभारणीचा उपक्रम पुढे नेला. या प्रक्रियेत केवळ पायाभूत सुविधा उभारण्यावर भर न देता शिक्षक, पालक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्यांचा सहभाग वाढविण्यात आला. उत्कृष्ट डिजिटल शाळांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासदौरे तसेच राज्यातील गुणवत्तापूर्ण शाळांमधील शिक्षक व मार्गदर्शकांसोबत संवादाचे उपक्रमही राबविण्यात आले.

तोंडगावच्या नव्या शाळेत सध्या ९९ विद्यार्थी व चार शिक्षक असून डिजिटल स्क्रीन, शुद्ध पिण्याचे पाणी, परसबाग यांसारख्या सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक प्रभावी व अनुभवाधारित शिक्षणाची संधी मिळणार आहे.

दरम्यान, याच कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पाणी वापर संस्थेच्या ५० लाख रुपये खर्चाच्या नवीन इमारतीचेही लोकार्पण करण्यात आले.तोंडगावची डिजिटल शाळा ही केवळ नवीन इमारत नसून ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची समान संधी देण्याच्या दिशेने उचललेले पाऊल आहे. संकल्पना, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यातून साकारलेला हा उपक्रम ग्रामीण शिक्षणाच्या बदलत्या स्वरूपाला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

कार्यक्रमाला उपस्थित सरपंच आशा चरपे, मुख्याध्यापक कालिंदीनी उघडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजय मोहोड, धनराज जाधव, अभिजीत पडोळे, गजानन जाधव व सर्व सदस्य कृषी उत्पन्न बाजार समिती चे संचालक संदीप चरपे, सेवा सहकारी सोसायटी चे अध्यक्ष प्रशांत अपराधे, सर्व शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

### 'गावची शाळा हे गावाचे वैभव असते'

'गावच्या शाळेत शिकणाऱ्या पोरांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. त्यांचें भवितव्य घडवण्यासाठी त्यांना शहरात जावे लागू नये, ही आपली भूमिका आहे. गावची शाळा हे गावाचं वैभव असते. म्हणून केवळ इमारत बांधून थांबायचे नाही, तर त्या शाळेत तंत्रज्ञान आणायचे, शिक्षकांना नवे प्रयोग करण्याची संधी द्यायची आणि पालक-गावकऱ्यांना सोबत घेऊन शिक्षणाचे वातावरण बदलायचे. ग्रामीण भागातल्या पोरांमध्ये गुणवत्ता कमी नाही; त्यांना संधीची गरज आहे. ती संधी त्यांच्या गावातच मिळावी, यासाठी डिजिटल शाळांचा हा प्रयत्न आहे.'

**-बच्चू कडू**

## तलाठ्याच्या चुकीमुळे शेतकरी ठरला भूमिहीन; ॲग्रीस्टॅकवरील नोंद गायब

### कारला शिवारातील प्रकार, तहसीलदारांकडे दुरुस्तीची मागणी

**अंजनगाव सुर्जी/ वार्ताहर**



तालुक्यातील कारला गावच्या शिवारात शेतकरी मनोज काठोळे यांच्या जमिनीची ॲग्रीस्टॅक पोर्टलवरील नोंद तलाठ्याच्या चुकीमुळे काढून टाकण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या चुकीमुळे काठोळे यांना शासन दप्तरी 'भूमिहीन' शेतकरी म्हणून दाखविले जाण्याची शक्यता निर्माण झाली असून शेतकरी चिंतेत सापडला आहे. प्राप्त माहितीनुसार, अंजनगाव सुर्जी शहरातील शेतकरी मनोज काठोळे यांची कारला शिवारात गट क्रमांक २१७ आणि २५२ मध्ये शेती आहे. गट क्रमांक २१७ मधील नोंदीत काही तांत्रिक चूक असल्याने त्यांनी ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित तलाठ्यांकडे विनंती केली होती. मात्र दुरुस्ती करताना तलाठ्याने २१७ मधील नोंद दुरुस्त करण्याऐवजी गट क्रमांक २५२ मधील संपूर्ण Farmer ID ची नोंदच ॲग्रीस्टॅक पोर्टलवरून गायब केली. या गंभीर चुकीमुळे महसूल विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. शेतकरी मनोज काठोळे यांच्या म्हणण्यानुसार २१७ गटातील नोंद दुरुस्त करा म्हणून सांगितले होते, पण तलाठ्यांनी माझा २५२ गटाचाच Farmer ID डिलीट केला. आता ॲग्रीस्टॅकवर माझी जमीनच दिसत नाही. मी भूमिहीन कसा झालो?' असा सवाल शेतकरी मनोज काठोळे यांनी उपस्थित केला आहे.

शेतकऱ्यांच्या जमिनीची नोंद अशा चुकीच्या पद्धतीने हटवली जात असेल तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आपली जमिनीची नोंद तातडीने ॲग्रीस्टॅकवर पूर्ववत करावी आणि संबंधित तलाठ्यावर कारवाई करावी, अशी लेखी मागणी शेतकरी मनोज काठोळे यांनी अंजनगाव सुर्जीचे तहसीलदार यांच्याकडे केली आहे.या प्रकरणी तहसील प्रशासन काय कारवाई करते याकडे आता संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

> शेतकरी मनोज काठोळे यांच्या तक्रारीची चौकशी करण्यात येईल जर काही चुकी झाल्यास संबंधित कर्मचाऱ्याला लेखी जाब विचारण्यात येईल तसेच शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याबाबत दखल घेतली जाईल.
>
> **पुष्पा सोळंके (दाभेराव),**
> तहसीलदार

## विद्यापीठात कोणतीही पदभरती नाही

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये थेट मुलाखती द्वारे मोठी पदभरती सुरु असल्याची पोस्ट इंस्टाग्राम या समाज माध्यमांवर marathi.latestjobs याद्वारे प्रकाशित झाली आहे.सदर जाहिरातीमध्ये कनिष्ठ लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, शिपाई, ग्रंथालय परिचर इत्यादी पदे असून थेट मुलाखत २१ सप्टेंबर, २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता असल्याचे त्या पोस्टमध्ये नमूद केले आहे. सदर पोस्ट ही खोटी असून विद्यापीठ प्रशासनाने अशा प्रकारची कुठलीही जाहिरात दिलेली नाही. तसेच विद्यापीठात अशी कुठलीही पदभरती सध्या नाही. तरी सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

## पोटे पाटील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**अमरावती/ प्रतिनिधी**

पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय, अमरावती येथील विद्यार्थ्यांनी बँकिंग परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी सुमित मस्के यांची नाबार्ड (NABARD) येथे डेव्हलपमेंट असिस्टंट या पदावर, तर विद्यार्थी सुखदेव माळी यांची आयडीबीआय बँकेत (IDBI Bank) ज्युनियर असिस्टंट मॅनेजर या पदावर निवड झाली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनत, चिकाटी व गुणवत्तेच्या जोरावर हे यश संपादन केले असून, त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांसाठी मिळणाऱ्या मार्गदर्शनाचीही प्रचिती आली आहे. त्यांच्या निवडीबद्दल महाविद्यालयातर्फे दोन्ही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आल. तसेच त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.



सुखदेव माळी IDBI Bank | सुमित मस्के NABARD

## वैष्णवी इंगळे यांना वनस्पतीशास्त्रात आचार्य पदवी



**अमरावती-** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने वैष्णवी अनिलराव इंगळे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी अर्थात आचार्य पदवी बहाल करण्यात आली आहे. त्यांनी 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती येथील प्रबळ ॲलर्जीनजन्य बुरशीजन्य वायुकणांमधील ऋतुनुसार होणारे बदल' या विषयावर सखोल संशोधन करून आपला शोधप्रबंध विद्यापीठास सादर केला. श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय अमरावती येथील संशोधक विद्यार्थिनी असलेल्या वैष्णवी इंगळे यांनी आपल्या संशोधनामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती परिसरातील वातावरणात आढळणाऱ्या विविध प्रकारच्या ॲलर्जीनजन्य बुरशीजन्य वायुकणांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून आपला प्रबंध संशोधक पर्यवेक्षक प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडे सादर केला होता. भविष्यातील आरोग्यविषयक उपाययोजनांसाठी त्यांच्या संशोधनाचा उपयोग होऊ शकतो.त्यांच्या या संशोधनात्मक कार्याची दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने वैष्णवी इंगळे यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी म्हणजेच आचार्य पदवी बहाल केली. त्यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, पुढील संशोधनासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्यासह समस्त कार्यकारिणी तसेच प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख तसेच शिवाजी विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन कोरपे, संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ.दिलीप हांडे, डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.ए.टी.देशमुख, विभागप्रमुख डॉ. दिनेश खेडकर, डॉ गणेश हेडावू तसेच महाविद्यालयातील समस्त प्राध्यापक गण, आपले आई वडिल तसेच पती गौरव इंगळे आणि समस्त मित्र परिवाराला दिले आहे. वैष्णवी इंगळे यांच्या यशाबद्दल त्यांचे अमरावती विद्यापीठ मित्र परिवार, शिव परिवार, युवक बिरादरी परिवार, मराठी पत्रकार संघ परिवार, तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन केले जात आहे.

## सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयात राज्यस्तरीय 'अभिवक्ता' वकृत्व स्पर्धा उत्साहात

### मुंबईच्या प्रांजल तानपुरेची प्रथम क्रमांकाची बाजी!

**अमरावती/ का.प्र**

येथील सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या 'पर्सनालिटी डेव्हलपमेंट क्लब' आणि संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या 'विद्यार्थी विकास विभाग' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय 'अभिवक्ता' वकृत्व स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. संपूर्ण महाराष्ट्रातून आलेल्या ६४ गुणवंत वक्त्यांच्या वैचारिक मंथनाने ही स्पर्धा गाजली.स्पर्धेच्या अंतिम निकालात मुंबईच्या प्रांजल तानपुरे हिने आपल्या उत्कृष्ट वाक्चातुर्याच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला.तिला रोख



रु.१००००/- , सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले.नाशिकच्या निर्मिती वैद्य हिने द्वितीय, तर अकोल्याच्या निकिता दुबे हिने तृतीय क्रमांक प्राप्त केला. त्यांना अनुक्रमे रु ७०००/- आणि ५०००/- तसेच सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात आले.याशिवाय पंढरपूरचे आदित्य टोळे आणि अकोल्याचे आनंद महल्ले यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.त्यांना प्रत्येकी रु १०००/- , सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात आले.या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पंढरपूर, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम आणि परभणी यांसारख्या महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून एकाहून एक सरस अशा ६४ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेचा पारितोषिक वितरण व समारोप सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जगदीश गुप्ता होते. याप्रसंगी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर आणि डॉ. निखिलेश नलोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.तसेच सिपना अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. खेरडे, डीन ऑफ स्टूडेंट अफेयर डॉ.पी आर मळसने आणि स्पर्धेचे परीक्षक डॉ. शीतलबाबू तायडे, डॉ. जागृती व्यास व देवेंद्र प्रभुणे हे मंचावर उपस्थित होते.स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ राधिका केला प्राध्यापक समन्वयक यांनी विषेश परिश्रम घेतले. तसेच सदस्य अमेय खेलवाडे, नेहल आसोपा, ईश्वरी शेरेकर, तन्मय व्यास, रुचिता मेंढे, सारांश अग्रवाल, श्रीरंग टोपरे, हर्ष पैठणकर आणि श्रावणी रोटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दिव्यांग मुले कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत-आ.बच्चू कडू

### मूकबधिर विद्यालयात डिजिटल श्रवणयंत्र वाटप

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

मासोद (ता. चांदूरबाजार) येथील टोंगलापूर फाटा परिसरातील सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित निवासी मूकबधिर विद्यालयात दिव्यांग मूकबधिर विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या उद्देशाने डिजिटल श्रवणयंत्र वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी विधान परिषद सदस्य तथा दिव्यांग मंत्रालयाचे जनक आ. बच्चू कडू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात वैराग्यमूर्ती कर्मयोगी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.यावेळी आ.बच्चू कडू म्हणाले की, विशेष दिव्यांग मुलांना योग्य वयात अचूक साधनांची मदत मिळाल्यास ते जीवनातील कोणत्याही क्षेत्रात मागे राहणार नाहीत. तज्ञ ऑडिओलॉजिस्ट लक्ष्मण डी.मोरे यांनी विद्यार्थ्यांच्या श्रवण क्षमतेचे वैज्ञानिक पद्धतीने निदान करून त्यांच्या कानाच्या तपासणी अहवालानुसार डिजिटल श्रवणयंत्रांचे अचूक कॅलिब्रेशन व फिटिंग केले. केवळ श्रवणयंत्र वाटप न करता त्याचा योग्य वापर, निगा, स्पष्ट ध्वनीचा अनुभव तसेच दैनंदिन वापर करताना पालक व शिक्षकांनी घ्यावयाची काळजी याबाबत त्यांनी तांत्रिक मार्गदर्शन केले.

या उपक्रमासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य केंद्राचे समन्वयक निलेश पुनसे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाला संस्थेचे सचिव राहुल म्हाला, प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखरजी मोहोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन भाग्यश्री शेंडे यांनी केले. प्रास्ताविक वाचा उपचार तज्ज्ञ विनोद तगलपल्लेवार यांनी केले, तर आभार मोहन मोरे यांनी मानले.

मूकबधिर विद्यार्थ्यांना कार्यक्रमातील प्रत्येक बाब समजावी यासाठी प्रीती कडू यांनी संपूर्ण कार्यक्रम सांकेतिक भाषेत समजावून सांगितला. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, वसतिगृह अधीक्षक, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला तसेच दैनंदिन जीवनातील संवादक्षमतेला मोठी मदत होणार असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली.

## जी. एच. रायसोनी युनिव्हर्सिटीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिपसह प्लेसमेंट

### तृषा हिला साडेचार लाखांचे पॅकेज

**अमरावती/ का.प्र**

जी.एच. रायसोनी युनिव्हर्सिटी अमरावतीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या क्षमतांच्या जोरावर कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उत्तम रोजगार मिळवला आहे. आतापर्यंत युनिव्हर्सिटीतील १४२ विद्यार्थ्यांची देशातील नामांकित कंपन्यांमध्ये इंटर्नशिपसाठी निवड झाली आहे. यातील बीटेक सीएसई शाखेच्या विद्यार्थिनी तृषा आग्रे यांना सर्वाधिक साडेचार लाख रुपयांचे पॅकेज मिळाले आहे.



विद्यार्थ्यांना पदवीसोबतच रोजगार मिळावा, या संकल्पनेतून युनिव्हर्सिटी दरवर्षी कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रिया आयोजित करते. यात देशभरातील विविध क्षेत्रांतील नामांकित कंपन्या सहभागी होतात. यावर्षी डिजिटल हीरोज प्रायव्हेट लिमिटेड, कोरलेंस प्रायव्हेट लिमिटेड, इग्नाइट सोल्युशन्स, इनअमीगोस फाउंडेशन, ड्रोना पे प्रायव्हेट लिमिटेड, वुमन फर्स्ट इंडिया फाउंडेशन, शी कॅन फाउंडेशन, नवे पंख फाउंडेशन, युनेसा फाउंडेशन, ग्रामीण विकास सोसायटी, मार्पु प्रायव्हेट लिमिटेड, क्वांटम आयटी सोल्युशन्स, सुपर७७ प्रायव्हेट लिमिटेड, इंडिया रीडिफाइंड प्रायव्हेट लिमिटेड आदी कंपन्यांनी सहभाग घेतला. इतर क्षेत्रांतील कंपन्याही प्लेसमेंटसाठी येत आहेत. विद्यार्थ्यांना चांगला रोजगार मिळावा यासाठी युनिव्हर्सिटीतर्फे प्रशिक्षण सत्रेही आयोजित केली जातात. त्यामुळे प्लेसमेंट प्रक्रियेदरम्यान विद्यार्थी चांगली कामगिरी करून अधिक पॅकेजवर रोजगार मिळवू शकतात.

## वच्छलाबाई इंगळे यांचे निधन



**काटपुर-** येथील वच्छलाबाई महादेवराव इंगळे (९२ ) यांचे वृद्धापकाळाने सोमवार ३१ ऑगस्टला निधन झाले. त्यांचे पश्चात चार मुली,जावई व नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.त्यांच्यावर काटपुर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी आप्तस्वकीय, व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४८ कोटींचा दंड, तरी वसुलीचा 'हिशेब' अपुरा?

## -गाजीपूर फाईल्सचा पीआरसीसमोर पंचनामा

गाजीपूर-रुदाळी खाण फाईल्स

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील पोपटखेड गट ग्रामपंचायतीतील मौजे गाजीपूर येथील अतिरिक्त गौण खनिज उत्खनन प्रकरणातील तब्बल ४८ कोटी रुपयांच्या दंडवसुलीचा आणि आदिवासी जमिनीचा मुद्दा महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायत राज समितीसमोर (पीआरसी) उपस्थित झाल्याने या प्रकरणाला पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त झाले आहे. दंडाची रक्कम निश्चित झाल्यानंतरही वसुलीची प्रक्रिया कोणत्या टप्प्यावर आहे, प्रशासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आणि पुढील कायदेशीर कार्यवाही काय असणार, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आल्याची माहिती आहे.

गाजीपूर प्रकरण केवळ अतिरिक्त उत्खननापुरते मर्यादित नसून आदिवासींच्या जमिनीच्या कथित वापरासह खाणकामाशी संबंधित व्यवहार, गैरआदिवासी व्यक्तींच्या कथित हस्तक्षेपाच्या तक्रारी आणि परिसरातील बेकायदा ब्लास्टिंगबाबतच्या तक्रारींमुळेही चर्चेत आले आहे. या सर्व बाबींची सत्यता अधिकृत कागदपत्रे, महसूल अभिलेख आणि सक्षम प्राधिकरणाच्या चौकशीतून स्पष्ट होणे अपेक्षित आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायत राज समितीने अकोट पंचायत समितीच्या मागील पाच वर्षांतील कामकाजाचा गुरुवारी आढावा घेतला. विविध विभागांच्या योजनांची अंमलबजावणी, विकासकामे, निधीचा विनियोग, प्रशासकीय कार्यवाही आणि प्रलंबित प्रकरणांची माहिती घेत असतानाच गाजीपूर प्रकरणाचा मुद्दा समोर आल्याचे समजते.

एका नागरिकाने गाजीपूर येथील अतिरिक्त गौण खनिज उत्खननासंदर्भातील बाबी समितीसमोर मांडल्याची माहिती आहे. त्यामध्ये विशेषतः ४८ कोटी रुपयांच्या दंडाची वसुली प्रलंबित असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला.

महसूल प्रशासनाने एखाद्या प्रकरणात दंड निश्चित केल्यानंतर संबंधित रक्कम वसूल करण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया राबवावी लागते. संबंधितांना नोटीस, सुनावणी, आदेश, अपीलची संधी तसेच लागू असलेल्या नियमांनुसार पुढील वसुलीची कार्यवाही केली जाते. गाजीपूर प्रकरणात दंडाची रक्कम निश्चित झाल्यानंतर प्रत्यक्ष वसुली किती झाली, किती रक्कम बाकी आहे आणि प्रकरण कोणत्या कायदेशीर टप्प्यावर आहे, याबाबत अधिकृत माहिती महत्त्वाची ठरणार आहे. ४८ कोटी रुपयांचा दंड हा मोठा शासन महसूल असल्याने त्याच्या वसुलीतील प्रत्येक टप्पा पारदर्शक असणे आवश्यक आहे.

गाजीपूर प्रकरणात आदिवासींच्या जमिनी आणि त्यांच्या नावावर असलेल्या कथित खाणकामाच्या व्यवहाराबाबतही तक्रारी मांडण्यात आल्याची माहिती आहे. आदिवासी व्यक्तींच्या नावावर जमीन किंवा परवाना असताना प्रत्यक्ष उत्खननाचे व्यवस्थापन कोण करते, आर्थिक व्यवहार कोणाच्या माध्यमातून होतात आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ कोणाला मिळतो, याची स्वतंत्र पडताळणी झाल्यास या आरोपांमागील वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकते. विशेषतः जमीनमालकी, खाणपट्टा अथवा परवाना, उत्खनन परवानगी, रॉयल्टी भरणा, वाहतूक नोंदी आणि आर्थिक व्यवहार यांची सांगड घालणे महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र, केवळ तक्रार किंवा आरोपावरून कोणालाही दोषी ठरवता येत नाही. सक्षम प्राधिकरणाची चौकशी आणि उपलब्ध पुराव्यांवरूनच अंतिम निष्कर्ष निघू शकतो.

### आदिवासी जमिनीचा कथित गैरवापर, खाणकामातील कथित हस्तक्षेप आणि अन्य तक्रारींवर प्रशासनाकडे स्पष्टीकरणाची मागणी

#### गैरआदिवासींच्या कथित हस्तक्षेपाची चौकशी आवश्यक?

खाणकामाच्या प्रत्यक्ष व्यवहारावर गैरआदिवासी व्यक्तींचे नियंत्रण असल्याच्या तक्रारीही समितीसमोर मांडण्यात आल्याचे समजते. हा आरोप खरा असल्यास संबंधित व्यवहाराची कायदेशीरता तपासण्याची आवश्यकता आहे. यासाठी खाणकामाशी संबंधित परवाने कोणाच्या नावावर आहेत, उत्खननाची प्रत्यक्ष जबाबदारी कोणाकडे आहे, आर्थिक व्यवहार कुणाच्या खात्यातून होतात, खनिजाची वाहतूक कोण करतो आणि शासनाला देय असलेली रॉयल्टी अथवा अन्य शुल्क कोणी भरले, याची तपासणी महत्त्वाची ठरू शकते.

#### ब्लास्टिंगच्या तक्रारींनाही गांभीर्य-

गाजीपूर परिसरात कथित बेकायदा ब्लास्टिंग होत असल्याच्या तक्रारींचाही उल्लेख समितीसमोर झाल्याचे सांगण्यात येते. उत्खननासाठी स्फोटकांचा वापर होत असल्यास त्यासाठी आवश्यक परवानग्या, सुरक्षा उपाययोजना आणि लागू असलेल्या नियमांचे पालन झाले आहे का, याची पडताळणी संबंधित सक्षम यंत्रणांकडून होणे आवश्यक आहे.

तक्रारी प्राप्त झाल्या असल्यास त्यावर प्रत्यक्ष पाहणी, पंचनामा अथवा अन्य कायदेशीर कार्यवाही झाली का, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे.

#### पाच वर्षांच्या कारभाराचाही आढावा-

पीआरसीने अकोट पंचायत समितीच्या मागील पाच वर्षांच्या कारभाराचा विभागनिहाय आढावा घेतला. विविध योजनांची अंमलबजावणी, निधीचा वापर, विकासकामांची स्थिती आणि प्रलंबित बाबींची माहिती घेण्यात आली. ग्रामीण व आदिवासी भागातील शाळांमध्ये पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, वीजपुरवठा आणि क्रीडांगण यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना कागदोपत्री नव्हे तर प्रत्यक्ष सुविधा उपलब्ध होणे आवश्यक असल्याचे समितीने स्पष्ट केल्याचे समजते.

#### पीआरसी परतली अन् तहसील कार्यालयात चर्चेला उधाण!

दरम्यान, पंचायत राज समितीचा दौरा आटोपल्यानंतर अधिकारी पुन्हा तहसील कार्यालयात परतले. त्यावेळी एसडीओ आणि तहसीलदार यांच्या चेहऱ्यावरची उतरलेली छटा आणि बैठकीनंतरचे गांभीर्य याचीच चर्चा तहसील कार्यालयाच्या आवारात रंगली असल्याचे बोलले जात आहे. समितीसमोर झालेल्या सवाल-जवाबाचा धसका महसूल यंत्रणेने घेतल्याची कुजबुज दिवसभर कार्यालयात सुरू होती.

# कलालकुंडातील डोहात बुडून शिक्षकाचा मृत्यू

## चिखलदरा सहलीवर गेलेल्या ६५ शिक्षकांमध्ये खळबळ

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निसर्गरम्य कलालकुंड येथील धबधबा परिसरातील खोल डोहात बुडून अमरावतीतील एका शिक्षकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी, ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेचारच्या सुमारास घडली. विपीन (वय ३५, रा. अमरावती) असे मृत शिक्षकाचे नाव आहे. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून, रात्री उशिरापर्यंत अमरावतीच्या आपत्ती व्यवस्थापन पथकाकडून त्यांचा शोध घेण्याचे काम सुरू होते.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अमरावती शहरातील एका नामांकित शाळेतील महिला व पुरुष असे सुमारे ६५ शिक्षक पर्यटनासाठी चिखलदरा येथे गेले होते. दरम्यान, त्यांनी कलालकुंड येथील धबधबा परिसराला भेट दिली. यावेळी काही शिक्षक पाण्यात उतरून आनंद घेत होते. याचदरम्यान विपीन कोरे हे धबधबा परिसरातील खोल पाण्यात बुडाल्याचे निदर्शनास येताच सहकाऱ्यांमध्ये एकच गोंधळ उडाला. घटनेची माहिती तत्काळ चिखलदरा पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतल्यानंतर अमरावती येथील आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या बचाव पथकाला पाचारण करण्यात आले. सायंकाळपासून बचाव पथकाकडून डोहात शोधमोहीम राबविण्यात आली. मात्र, रात्री उशिरापर्यंत विपीन कोरे यांचा मृतदेह हाती लागला नव्हता. अंधार आणि खोल पाण्यामुळे बचावकार्यात अडथळे येत होते. घटनेची माहिती मिळताच शिक्षकांसह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

### रात्री उशिरापर्यंत शोधमोहीम सुरू

# ईशानी आनंद अचलपूरच्या नवीन पोलीस उपविभागीय अधिकारी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांची पुणे येथे बदलली झाल्यानंतर रिक्त असलेल्या जागेवर मुंबई येथून आयपीएस ईशानी आनंद यांची अचलपूरच्या पोलीस उपविभागीय अधिकारी पदी नियुक्ती करण्यात आली. त्यांची ही पहिलीच पोस्टिंग आहे. आयपीएस ईशानी आनंद यांनी नुकताच आपला कार्यभार सांभाळला आहे.



# वडापावच्या वादातून सशस्त्र टोळक्याची घरावर धडक

## घरात घुसून मारहाणीचा आरोप

### -ऑटो-दुचाकीची तोडफोड

**अमरावती/प्रतिनिधीः-** वडापावचे पैसे मागितल्याने झालेल्या किरकोळ वादानंतर यशोदानगर क्रमांक १ परिसरात सशस्त्र टोळक्याने एका व्यावसायिकाच्या घरावर धडक दिल्याची घटना घडली. चाकू, तलवारी आणि लाठ्या हातात घेऊन ८ ते १० जणांनी घरात घुसून मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. हल्लेखोरांनी घराचा दरवाजा फोडण्याचा प्रयत्न करीत घरासमोर उभ्या असलेल्या ऑटो व दुचाकीची तोडफोड केल्याने सुमारे ३५ हजार रुपयांचे नुकसान झाले.

याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी तुषार ज्ञानेश्वर दुपारे (वय २०, रा. यशोदानगर क्र. १, गल्ली क्र. २) यांच्या तक्रारीवरून नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबरच्या रात्री तुषार दुपारे हे वडिलांसोबत वडापावच्या दुकानात काम करीत होते. यावेळी दोन युवक नाश्ता करण्यासाठी दुकानात आले. नाश्ता केल्यानंतर ते पैसे न देता निघून जात असल्याने तुषार यांनी त्यांच्याकडे पैशांची मागणी केली. याच कारणावरून दोन्ही बाजूंमध्ये वाद झाला. संबंधित युवकांनी तुषार व त्यांच्या वडिलांना शिवीगाळ करून मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर ते तेथून निघून गेले. दुकानातील वादानंतर काही वेळातच तुषार यांच्या मोठ्या भावाचा फोन आला. घरात अनेक जण घुसले असून त्यांच्या हातात चाकू, तलवारी व लाठ्या असल्याची माहिती त्याने दिली. हल्लेखोर घरातील सदस्यांना शिवीगाळ करीत मारहाण व जीवे मारण्याच्या (पान २ वर)

# नागरिकांच्या समस्या निवारणासाठी दररोज वेळ राखीव


## अभ्यागतांसाठी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत भेटी अनिवार्य

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील सर्व शासकीय व महसूल विभागाच्या कार्यालय प्रमुखांनी नागरिकांच्या अडचणी व तक्रारींचे तात्काळ निवारण करण्यासाठी दररोज दुपारी ३ ते ५ या वेळेत अभ्यागतांना भेटणे अनिवार्य करण्यात आले आहे. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशांनुसार निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी परिपत्रक जारी केले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुद्रांक जिल्हाधिकारी तसेच भूमी अभिलेख विभागाच्या अधिकाऱ्यांनी दररोज दुपारी ३ ते ५ ही वेळ नागरिकांच्या भेटीसाठी राखीव ठेवणे आवश्यक आहे. राखीव वेळेत विभाग प्रमुखांनी शक्यतो स्वतः उपस्थित राहून नागरिकांची निवेदने, तक्रारी ऐकून त्यावर नियमानुसार योग्य ती कारवाई करावी लागणार आहे. ज्या प्रकरणांचे तात्काळ निवारण शक्य नाही, त्यांची नोंद घेऊन विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे बंधनकारक राहील.

अत्यावश्यक शासकीय बैठका किंवा (पान २ वर)

# शर्वरी हत्याकांडातील आरोपीला ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रविनगर नाल्याच्या पुलाजवळ १७ वर्षीय विद्यार्थिनी शर्वरी गणेश हाडके हिची दिवसाढवळ्या चाकूने वार करून हत्या करणारा आरोपी आनंद नंदकिशोर भड (वय २२, रा. पोही, मूर्तिजापूर) याला न्यायालयाने ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. हत्येनंतर बडनेरा रेल्वे स्थानक गाठून हावडा रेल्वेने गोंदियाला पळून गेलेल्या आरोपी आनंदला राजापेठ पोलिसांनी गोंदिया येथून ताब्यात घेत अमरावतीत आणले. शुक्रवारी कडेकोट पोलीस बंदोबस्तात त्याला न्यायालयात हजर करण्यात आले.



पोलिसांच्या प्राथमिक तपासात धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. अंबाविहार परिसरात राहणाऱ्या शर्वरीने सुमारे दोन महिन्यांपूर्वी आनंदशी बोलणे बंद केले होते. मात्र, आनंद तिच्याशी संपर्क साधण्याचा सातत्याने प्रयत्न करीत होता. शर्वरीच्या नव्या मित्रासह तिच्या कुटुंबीयांनी याबाबत आनंदच्या आई-वडिलांकडे तक्रारही केली होती. त्यानंतर (पान २ वर)

# रस्ते, घरकुल, आरोग्य, पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडवा

## खासदार बळवंत वानखडे यांचे निर्देश

**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्र शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध योजनांच्या माध्यमातून निधी देण्यात येतो. या निधीचा योग्य विनियोग करून ग्रामीण जनतेचे जीवन सुकर करावे. यात प्रामुख्याने पांदण रस्ते, घरकुल, आरोग्य यासोबतच पाणी पुरवठ्याच्या समस्या सोडविण्यावर भर देण्यात यावा, असे निर्देश खासदार बळवंत वानखडे यांनी दिले.



जिल्हा नियोजन भवनात वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा पार पडली. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण पोटे, गजानन लवटे, प्रविण तायडे, (पान २ वर)

# जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी दिलीप भोपळे अविरोध

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अमरावती जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या आणि पाच जिल्ह्यांमध्ये आपल्या शाखांचा विस्तार असलेल्या जनता सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी अंजनगाव सुर्जी तालुक्यातील जेष्ठ नेते दिलीप नारायणराव भोपळे यांची अविरोध निवड करण्यात आली आहे.बँकेच्या संचालक मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत अध्यक्ष पदाच्या निवडीचा विषय होता. सर्व संचालकांनी एकमताने दिलीप भोपळे यांच्या नावाला पसंती दर्शवली. त्यामुळे त्यांची अविरोध निवड जाहीर करण्यात आली.

दिलीप भोपळे यांचा राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात मोठा अनुभव आहे. ते अंजनगाव सुर्जी भाजपचे माजी तालुकाध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तसेच पांढरी (खा.) ग्रामपंचायतीचे माजी सरपंच म्हणूनही त्यांनी गावाच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे.गेल्या अनेक वर्षांपासून ते जनता सहकारी बँकेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. बँकेच्या कारभाराचा त्यांना सखोल अभ्यास असून, त्यांच्या याच दीर्घ अनुभवाचा फायदा बँकेला होईल, या विश्वासाने संचालक मंडळाने त्यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे.दिलीप भोपळे यांची अध्यक्षपदी निवड झाल्याची बातमी समजताच अंजनगाव सुर्जी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. नवनिर्वाचित अध्यक्ष दिलीप भोपळे यांनी सर्व संचालकांचे आभार मानले असून, बँकेला अधिक प्रगतीपथावर नेण्यासाठी आणि शेतकरी व सर्वसामान्य ठेवीदारांच्या हितासाठी काम करणार असल्याचे सांगितले.



# मनपा उर्दू शाळेत शिक्षकाने केली अमानुष मारहाण, ५ विद्यार्थी जखमी

**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिकेच्या उर्दू शाळेत शिक्षकाने विद्यार्थ्यांना अमानुषपणे मारहाण केल्याचा धक्कादायक आणि संताप जनक प्रकार समोर आला आहे. मधल्या सुट्टीत मैदानावर खेळत असलेल्या ६ ते ७ विद्यार्थ्यांना कथितरित्या शाळेत बोलावून एका शिक्षकाने वाळलेल्या लाकडाच्या फांदीने इतके बेदम मारले की, एका विद्यार्थ्याच्या हाताला फ्रॅक्चर झाले असून पाच अन्य विद्यार्थी किरकोळ जखमी झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या हात, पाय आणि कमरेवर मारहाणीच्या खुणा असल्याचे समोर आले आहे.या घटनेने महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. हा प्रकार अराफात कॉलनीच्या नूर नगर परिसरात असलेल्या (पान २ वर)



# दर्यापूरातील निर्मल उज्ज्वल बँकेत पैशांचा तुटवडा?

## -दोन महिन्यांपासून दर्यापूर शाखेचे काम ठप्प

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील निर्मल उज्ज्वल सहकारी बँकेच्या शाखेत गेल्या दोन महिन्यांपासून पैशांचा प्रचंड तुटवडा जाणवत आहे. बँकेकडे ठेवीदारांना देण्यासाठी रोख रक्कमच नसल्याने शाखेचे दैनंदिन व्यवहार पूर्णपणे ठप्प पडले आहेत. त्यामुळे आपल्या आयुष्यभराची जमापुंजी काढण्यासाठी ठेवीदारांना बँकेच्या चकरा माराव्या लागत आहेत.

आज (दि.४) दर्यापूर येथील माजी नगरसेवक राजाभाऊ राजगुरे हे त्यांची मुदत ठेव म्हणजेच एफ.डी. परिपक्व झाल्याने पैसे काढण्यासाठी बँकेत आले होते. मात्र शाखा व्यवस्थापकांनी बँकेत पैसे उपलब्ध नाहीत, त्यामुळे आज विड्रॉल करता येणार नाही.असे सांगितल्याने एकच गदारोळ उडाला. राजगुरे यांनी याबत संताप व्यक्त करत इतर ठेवीदारांना माहिती दिली. काही वेळातच काही ठेवीदार बँकेच्या आवारात जमा झाले. 'आमचे पैसे आम्हाला परत द्या' अशी ओरड करीत (पान २ वर)




# शिंदे सेनेची विदर्भस्तरीय दहीहांडी रद्द

## -डफरीन पीडितांना देणार आर्थिक मदत



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय जनता पार्टी आणि युवा स्वाभिमान पार्टीने आपली दहीहांडी रद्द केल्यानंतर आता शिवसेना शिंदे गटाने जन्माष्टमीनिमित्त ९ सप्टेंबर रोजी राजकमल चौकात आयोजित केलेली आपली दहीहांडी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भात माहिती देताना शिंदे गट शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संतोष बद्रे यांनी सांगितले की, काही दिवसांपूर्वी डफरीन रुग्णालयात (पान २ वर)

# तिवस्यात विद्युत खांबावर स्पार्किंगमुळे आगीचा भडका

## डिस्ट्रिब्युशन बॉक्स जळून खाक

**तिवसा/प्रतिनिधीः-** विद्युत खांबावर असलेल्या डिस्ट्रिब्युशन बॉक्स मध्ये झालेल्या स्पॉर्किंगमुळे आगीचा भडका होऊन पाहता-पाहता बॉक्स जळून खाक झाल्याची घटना ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तिवसा-सातरगाव रोडवरील श्री देवरावदादा हायस्कूल जवळ घडली.आगीचा भडका झाल्यानंतर आगीचे लोळ खाली पडत असल्याचे दृश्य पाहण्यासाठी विद्यार्थ्यांसह अनेक नागरिकांची मोठी गर्दी झाली होती.मात्र सुदैवाने खालील दुकाने थोडक्यात बचावली.

प्राप्त माहितीनुसार, तिवसा ते सातरगाव रोडवर देवरावदादा हायस्कूलचे गेट आहे आणि या गेटजवळ असलेल्या विद्युत खांबावरून काही ठिकाणी वीज पुरवठा कार्यरत असून त्याठिकाणी देण्यात आलेल्या डिस्ट्रिब्युशन बॉक्स मध्ये अचानक ३ सप्टेंबर रोजी स्पॉर्किंग झाली.त्यामुळे त्याठिकाणी (पान २ वर)

